
# हाकारा



र्ष ७वे अंक पहिला जानेवारी ते मार्च १९८६

कष्टकरी जनता, भुषण भारता, वंदन करितो पददलिता।

# हाकारा



महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक

## अनुक्रमणिका

संपादकीय १

कविता : धरण आलं ग... २
**मेधा पाटकर**

धरण आहे नावाचं मोटं।
आम्हाला डोळाभर पाण्याची भेट ३
**मेधा पाटकर**

नर्मदा धरणग्रस्तांचे पुनर्वसन ८

मुलाखत : तुमरो गांव धरणुं जातलो ९
**लक्ष्मण कुलकर्णी**

जंगल-भारत आणि महाराष्ट्र १२
**दिनानाथ मनोहर**

जंगल संरक्षण की भक्षण : शहादे तालुका १३
**छाया सुरतवंती**

मुलाखत : लोकांचा सहभाग हवा! पण कसा? १४
**रमाकांत रामचंद्र**

वननीती : एक प्राथमिक मसुदा १७
**शरद कुलकर्णी**

समाजपरिवर्तनासाठी सामाजिक वनीकरण २१
**विनोद सावे**

राष्ट्रीय पडिक जमीन विकास मंडळ २३

पडिक जंगल जमिनीवर वनसंवर्धन २४

पुस्तक परिक्षण : पर्यावरणाची दशा व दिशा २५
**प्रकाश गोळे**

वनसंवर्धनात आदिवासींना सहभागी करा २९

एका काडीची क्रांती ३१
**प्रकाश लवेकर**

आमूं आहिं वाघ्रा पिलू ३२
**सुषमा सोनक**

वृत्त विशेष ३४

परिषद वृत्त : महिला कायदा शिबिर ३७

चला बाई चला एकजुट करा ३९
**शुभदा देशमुख**

नको गुलामीचे जीणे ४१
**छाया सुरतवंती**

नयना प्रेरणा ठरो ४२

वर्ष सातवे : अंक पहिला
३१ जानेवारी १९८६
परिषद/हाकारा संयुक्त
आजीव २०० रुपये
वार्षिक २० रुपये
सुटा अंक किंमत : ५ रुपये

पत्रव्यवहाराचा पत्ता :
रा. के. मुटाटकर, सचिव
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
आनंदपार्क ६४/३, औंध
पुणे ४१० ००७

**संपादक मंडळ**
जगदीश गोडबोले
शरद कुलकर्णी
राजाभाऊ राजगडकर
**संपादक**
रामचंद्र मुटाटकर
**कार्यकारी संपादक**
सुषमा सोनक
**संपादन सहाय्य**
रमाकांत पाटील
**मुखपृष्ठ रचना**
मिलन खानोलकर

प्रकाशक :
प्रा. रा. के. मुटाटकर
सचिव, महाराष्ट्र मानव विज्ञान
परिषद, पुणे यांनी
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद,
पुणे यांचेसाठी
कल्पना मुद्रणालय
४६१/४, सदाशिव पेठ,
टिळक रोड
पुणे ४११ ०३०
येथे छापून प्रसिद्ध केले.

## संपादकीय

अन्न, इंधन, निवारा, औषधी यासारख्या प्राथमिक गरजांसाठी आदिवासी पुर्वापार जंगलावर अवलंबून रहात आलेला आहे. त्याच्या देवदेवताविषयक कल्पनादेखील जंगलाशीच निगडीत आहेत. जंगलाशी नाते जोडलेल्या त्याच्या या संस्कृतीत ना मालकी हक्काची कल्पना आहे ना रोखीचे अर्थकारण. आदिवासी संस्कृती माणसाला सामुहिक जीवन जगायला शिकवते. वैयक्तिक साठेबाजी करायला नाही.

मात्र भारताच्या वसाहतीकरणापासून जंगल हे औद्योगीकरणाला व वसाहतवाद्यांच्या चैनीच्या जीवनपद्धतीचा कच्चा माल पुरवणारे एक साधन झाले. ब्रिटीश निघून गेल्यावरही व्यापारी वननितीचे हेच स्वरूप कायम राहिले. आणि आज, स्वतंत्र भारतात; इतर कोणतेही कसब आत्मसात करू न शकलेला, ब्रिटीश सरकार, शेट-सावकार, आदिवासी संस्थानिक या सर्वांकडून नागवला गेलेला सामान्य आदिवासी आपल्या प्राथमिक गरजा पुरवण्यासाठी मोळीविक्या चोर गणला जाऊ लागला आहे. तसेच, आता दुर्गम विभागात बांधल्या जाणाऱ्या मोठमोठ्या धरणप्रकल्पांमुळे आपल्या पूर्वापार निवासापासून तो हलवला जातो आहे. योग्य पुनर्वसनाच्या अभावी, अपरिचित औद्योगिक संस्कृतीत भुकेकंगाल उखडलेपणाची अवस्था त्याच्या वाट्याला येते आहे. आदिवासींच्या दृष्टिकोनातून जंगल व मोठ्या धरणांकडे पहाताना, आपले राष्ट्रीय धोरण भांडवली विकासाचाच कसा पाठपुरावा करते आहे याचा प्रत्यय येतो. इतरांच्या तुलनेत राजकीयदृष्ट्या असंघटित व दुर्बल आदिवासीला सहजासहजी डावलणे शक्य होते.

देशातील पर्यावरणाचा प्रश्न दिवसेंदिवस उग्र स्वरूप धारण करतो आहे. या बदललेल्या परिस्थितीत आदिवासींचे जंगलावरचे सर्व पूर्वापार हक्क कायम राहणे संभाव्य वाटत नाही. वनसंवर्धनाशिवाय तरणोपाय नाही अशी आता वेळ आली आहे. पण वनसंवर्धन कुणासाठी? कशा प्रकारचे, ते कुणी करायचे? या पार्श्वभूमीवर आपले प्रश्न एकमेकांशी कसे जोडले आहेत व कुठल्या व्यापक वास्तवाचा ते भाग आहेत हे ओळखण्याची निकड आहे. जो जो विचार करावा तो तो लोकांच्या स्थानिक गरजांभोवती भांडवली हितसंबंध जपणाऱ्या राष्ट्रीय धोरणाचा विळखा वाढत चाललेला दिसतो. आता स्थानिक लोकांनी संघटित झाल्याशिवाय त्यांचे प्रश्न तडीस जाणार नाहीत व प्रचलित राष्ट्रीय धोरणाची दिशा व गती बदलल्याशिवाय आपण तरणार नाही ही जाणीव लोकांमधून व त्यांना संघटित करणाऱ्या कार्यकर्त्यांतून आकारले आहे.

या अनुषंगाने, हाकाराच्या या अंकाची मांडणी केलेली आहे. नर्मदेवरच्या धरणांमुळे विस्थापित होणाऱ्या स्थानिक आदिवासींमध्ये पुनर्वसनाच्या न्याय हक्कासाठी झगडायचा जे संघटन होते आहे त्याचा वृतांत मेधा पाटकरांच्या लेखामध्ये आहे. तसेच राष्ट्रीय पातळीवर, नव्या वननीतीचे धोरण काय असावे याचा एक प्राथमिक मसुदा श्री. शरद कुळकर्णी यांनी तयार केला आहे. या मसुद्याबाबत वाचकांनी आम्हाला आपल्या सूचना, प्रतिक्रिया पाठवाव्या. या संवादातून आपल्याच विचारांना स्पष्टता येण्यास मदत व्हावी.

●

# धरण आलं ग........

धरण आलं ग धरण आलं
घर जमीन नि गाव बुडालं ।।

आदिवासी आम्ही जंगलची प्वारं
चुलीला लाकूड पोटाला ज्वार ।
धरण आलं ग धरण आलं
जंगल गेलं नि शेत बुडालं ।।

राबुनराबुन हे घर बांधलं
कोसावरूनही पाणी वाहिलं ।।

धरण आलं ग धरण आलं
कसलं घर नि कुठं शिवार ।।

सरकार म्हणतं, " गाव उठवा,
कशाला सगा नि कशा सोयरा ? "
धरण आलं ग धरण आलं,
" मरून जावो हा तडवी भिल "
धरण आहे नावाचं मोठं
कुणाला बिजली शेतात पाट ।
धरण आलं ग धरण आलं
आम्हाला डोळाभर पाणी भेटलं ।।

येऊ द्या आता धरणाचं पाणी
ओळखू आम्हीही साहेबी वाणी ।
गावाला गाव नि मन जुळलं
एकीचा बांधच कामाला यील ।।

—मेधा पाटकर

# घरण आहे नावाचं मोठं ।
# आम्हाला डोळाभर पाण्याची भेट ॥



नर्मदातीरावरच्या भिलांना खुद्द शहाद्या धडगावचे आदिवासीदेखील ' जंगली ' म्हणून ओळखतात. सरदारसागर धरणामुळे, सातपुड्यातील अक्राणीमहाल, अक्कलकुवा तालुक्यातील हे लोक विस्थापित होत आहेत. त्यांच्या गावागावातून पाड्यापाड्यातून फिरून, आदिवासींना हाकारा घालत केलेली अशीही एक नर्मदापरिक्रमा.

सातपुड्याच्या सातव्या रांगेच्या कुशीतलं जुनाना, एक गाव. कुठल्याही आदिवासी गावासारखं वरवर विस्कळीत वाटणारं, तरी आतून सांधलेलं, दुमदारही. घरं सुमारे सत्तर-चार पाड्यांत विखुरलेला. टेकड्यांमागून लपंडाव खेळत असल्यासारखी. जंगलात म्हटलं तरी साऱ्या डोंगरभागात जंगल फक्त टकलावरल्या केसांसारखं तुरळकच. जाड सागवानी लाकडांची प्रशस्त घरं सोडाच, त्यांचा एखादा वासाही झाकू न शकण्याइतपतच जंगल.

गावात शिरलो तेव्हा गाव तसं पहुडलेलंच. घराशेजारी, कुठेकुठे, बाईबापडा खुड्डकमुड्डक कामात. वाटेत, नर्मदा-काठी भेटलेल्या ढोरक्याबरोबर कारभारी छेल्यादादाला निरोप दिलेला. दुसऱ्यांदा. कारभारी गावचा म्होरक्या. त्याला टाळून गाव त्रयस्थाला सामोरं जाणं कठीणच. चर्चाविचारात तर बऱ्याच ठिकाणी कारभाऱ्याचाच कारभार. जुनान्यात पाटील, कारभारी भाऊभाऊ. घरंही शेजारीच पण तोंडं दोन दिशांना. त्याची काळजी आधीच घेतली होती. पाटलाच्या मुलाला बरोबर ठेवून, वेगळा निरोप पाठवून. तरी गाव झटक्यात सामोरं येईना. पाड्यापाड्यांकडे पोरं पिटाळली. काही दुरूनच, आमच्याऐवजी आमच्यापेक्षाही त्यांच्या अधिक ओळखीच्या ' भया 'मागे पळतापळता निरोप घेऊन गेली.

## हे तिहेरी फेरे

बघताबघता पाड्यापाड्यांतून गाव गोळा झालं. " हाजा होय के ? " म्हणत, आमच्यातल्या एकेकाला न्याहाळत विचारपूस. बऱ्याच जणांची नावानिशी, मागील भेटीच्या आठवणीसह चौकशी केली. सोंज्याची बाई मागच्या वेळेस खूप आजारी होती. धडगावला दवाखान्यात, चार डोंगर रांगा ओलांडून नेलं नव्हतंच. झिन्यादादाचं अतिक्रमणाचं शेत वरच्या पाड्यावर असल्यामुळे त्याला तिथे, इथे दोन घरं राखणं जड जात होतं. वगैरे वगैरे. जुनी, चुरगळलेली नोटीस घेऊन आलेला पाल्यादादा तेवढ्यात मागूनच निघून जाऊ लागला. मी जोरदारशी बोलता बोलताच पाहिलं नि उठले. मागच्या वेळेसच त्याची नोटीस पाहाण्याचं ठरलं होतं. मग ? परततोय् का ? विचारलं. म्हणाला, " बाय, तू कोयलं करीन आवलो. पूण आमुहू काय मुंदू, गाव डुबण्यं कि नाय ? " म्हणजे ? पुन्हा पहिल्यापासून सांगावं लागणार ? तेवढ्यात, मागेच उभा राहिलेला जोरदार पुढे झाला. " काय रे, पुन्हापुन्हा काय विचारतो बाईला ? ती एवढी गावात चालचालून आली तरी पटत नाही होय ? ' आमुहू ' म्हणू नको, ' मेहे ' म्हण. आम्हाला नाय तुझं पटत. " तो चूप झालाही. पण मलाच चूप

बसवेना. खोदत गेले. कळलं, "हापेश्वरच्या मंदिराचा महाराज सांगत होता, नर्मदामातेवर धरण बगैरे सगळं झूट आहे." महाराज मंदिराच्या शिवारातही प्रेमाने बघतही नसेल पण त्याचं (देवाच्या साक्षीने म्हटलेलं !) वाक्य कोरलं गेलं होतं. आमच्यावरचा विश्वास, आजवरच्या साऱ्या सरकारी घोषणा लिखाणावरचा अविश्वास आणि महाराजाला दुरूनच वाहून ठेवलेली श्रद्धा अशा तिहेरी फेऱ्यात त्याचा विचार अडकला होता. जोरदारनेच मग त्याचा ताबा घेतला. "पाल्या, अरे त्या महाराजाचं ऐकतोस ? आम्ही सारे गाववाले आता तयार झालोयत् तर तू एकटा...बाई, आम्ही अडाणी. असेच बसून रहातो म्हणून डुबूनच जातो नाहीतर काय ? आता नाही बमणार. कलेक्टरला पण विचारणार, बाबा रे आमचं घर घेतोस, जमीन घेतोस. आता आमची हाडकंच विकायची राहिलीयत्, तेवढी तरी राहू देत..."

## सरकारच सर्वाधिक कायदेभंग करतं तेव्हा ?

सरदार सरोवर धरणामुळे बुडणाऱ्या धुळ्याच्या अक्राणी तालुक्यातल्या २४ गावांपैकी एक सुरुंग सोडलं तर बाकी सारी जंगलं जमिनीवरची. 'जमिनला जमिन' आणि 'घरला घर', 'माणसा-गुरांसाठी पाणी चारा' एवढंच लोकांच्या मनात स्पष्ट. तलाठी असो की कलेक्टर, बिचारे हात जोडून प्रकल्पग्रस्त त्याला पुन्हा पुन्हा सांगत असतात, नर्मदा वॉटर डिस्प्यूट्स ट्रायब्युनल ॲवॉर्ड की न्यायाधीरण, कुठलाच कायदा लोकांना माहीत नाही, सांगितला गेलेला नाही. सांगू म्हटलं तर सरकारी अधिकाऱ्यांचीच पंचाईत. कारण ॲवॉर्डनुसारच करायचं म्हटलं तर लोकांच्या लक्षात बरंच काही येणार. एक : गुजरातमध्ये धरणक्षेत्रात जायची इच्छा नसल्यास, महाराष्ट्रातच पुनर्वसन – तेही सर्व तत्त्वे, अटी पाहून – करणं हे सरकारचं कर्तव्य आहे. ("गुजरातमध्ये गेलात तर खातेदाराला कमीत कमी ५ एकर जमीन, शाळा, दवाखाना बगैरे वगैरे मिळेल" असं अर्धसत्यच अधिकारी सांगत असले तरीही.) दोन : ॲवॉर्डनुसार प्रत्येक खातेदाराला कमीत कमी ५ एकर जमीन असं म्हटल्यास, त्याच्या अंमलबजावणीसाठी अतिक्रमणदारांची (अक्राणीतील जवळजवळ सर्वच शेतकऱ्यांची) निदान १९७८ पूर्वीपासून कसणाऱ्यांची, सरकारी ठरावाने मान्य झालेली जमीन मालकी महसूल खात्यातर्फे मान्य करणे व प्रत्येक शेतकऱ्याला इच्छेनुसार खातेफोड करून देणे हे सरकारचे कर्तव्य ठरते. तीन : घरं, सामानसुमान, नवीन जागी हलवणे सरकारी खर्चाने करावे लागणार व तेही त्यासाठी गावोगाव पोहोचणारे रस्ते बांधून. चार नवीन वसाहतीच्या ठिकाणी शाळा, दवाखाना पंचायतघर, बियारण–साठवण केंद्र, सभाचावडी, मोठ्या रस्त्याला जोडणाऱ्या वाटा, पिण्याचे पाणी, गुरांना तलाव सारंच द्यावं लागेल. महाराष्ट्र सरकारकडेच. सरदार सरोवर बाधित. इतर दोन (गुजरात व मध्य प्रदेश) राज्यांपेक्षाही पुनर्वसनासाठी अधिक सुसंगत, स्वतंत्र यंत्रणा असूनही लोकांना हक्कांची जाणीव दिली जात नाही. ते सरकारच सर्वाधिक कायदेभंग करू इच्छिणारं असल्यानेच, असंच म्हणावं लागेल की नाही ? पुरोगामित्वाचं पीस खोवून घेण्यासाठी किंवा लोकशक्तींच्या दबावाखाली एखाद्या विषयावर पुरोगामी कायदा करायचा आणि तो मोडण्याच्या पळवाटाही आपणच शोधत राहायचं, असा याच नाही, अनेक बाबतींत प्रकार.

## कायदा काय म्हणतो ?

तरीही धुळ्यातील सरदार सरोवराच्या १०/११ हजार लोकसंख्येच्या साऱ्या तेहतीस विस्थापित गावांमधल्या पाड्या पाड्यावर आता कायदा पोहोचलाय. दूरवर विखुरलेले पाडे आता या प्रश्नावर एकत्र आलेयत. ते सरकारला विचारणार, विचारूही लागले आहेत. कायदा नेमकं काय म्हणतो ? महाराष्ट्रात आम्हाला कुठे बसवणार ? सरोवरात बुडणाऱ्या १२००० हेक्टर्स जमिनीला नाही तर आमच्या पुनर्वसनासाठी जंगलजमीन देण्यालाच १९८० चा जंगलसंरक्षण कायदा कसा काय लागू पडतो ? पैशाविना खातेफोड आणि जंगलजमिनीचे महसूलीकरण न करणारा तलाठी नि फॉरेस्टवाला गुन्हेगार की आम्ही ?

## अंधार जरा बाजूला सरकल्यागत

धनखेडीतलं पहिलं घर, नर्मदातटावरूनच दिसलं तेव्हा सूर्य बाजूच्याच मणिबेली गावापलीकडे, जणू त्याच्याच पार वडगावमध्ये बांधल्या जाणाऱ्या सरदार सरोवर धरणाला धरून धरूनच, खाली उतरत होता. आम्ही मात्र घरापुढच्या कुंपणाचे चारदोनच बांबू आणि बांबूच्याच तीन फुटी 'माली' वर ठेवलेली

दोन चार मडकी नि 'तुंबडी' दिसताच, शंभर कि. मी. चा सारा थकवा पाठीवरच्या बॅगेत कोंबून गावाचं टेकाड चढू लागलो. पहिलीच वेळ असल्याने, पाटलाकडे जावं की कारभाऱ्याकडे याचा, लोकांच्या मदतीने अंदाज घेतला. मुंगो पाटील तरुण, अलीकडेच वडिलांकडून पाटीलकी घेतलेला; तरी "त्याच्यानेच मिटिंग बोलावणं होणार." हे साऱ्यांकडूनच ऐकलं. वाटेतल्या दोन्ही पाड्यावर ओळखी करून, सर्वांनी धरणाबद्दल बोलायला बसायचंच हे पटवूनच पाटलाघरी पोहोचलो. त्याची जवळच नेलमध्ये दिलेली, माहेरी आलेली बहीन मिठाबाई हसून स्वागत करू गेली तेव्हा भरत चाललेला अंधारही जरा बाजूला सरकल्यागत वाटलं.

तीन पाड्यातली १०–१२ माणसं तरी गोळा झालीच. एकाच्या शेतातच, ज्वारीचे खुंट खुपणार नाहीत अशा बेताने बसलो. सूर्याच्या साक्षीविना मिटिंग वगैरे, सर्वांनाच नवीन होतं. केवळ कुणी शहरवाले एवढ्या दुरून आले, हाच मुद्दा एकत्र आणणारा असावा. पण त्याहूनही मुख्य विचार झाला, मुंगोदादाचा. तो सिंगोळीपाड्यावरच्या शेतात गेला आहे, म्हणून मिटिंग आज नको असं ठरलं. उद्या सकाळीच सूर्य उगवण्याच्या आधी त्याला बोलवून घ्यायचंही. एकदा निर्णय झाल्यावर मात्र मंडळी जरा ऐसपैस बसली. न्याहाळता न्याहाळता, विचारत. इतर गावात कायकाय बोलणं झालं ते काही जण जाणत होते. नर्मदाकाठंकाठं चालतानाच निरोप घेतले-दिले जातात; कधी मोळगीच्या बाजारातही, म्हणाले.

धनखेडीत बहुतेक सगळे वसावा. भिलोरीतच मोकळे-पणी बोलत गेले. भाषेच्या भिन्नतेचा नसता बागुलबोवा नाही. बोलताना एका जागी फार वेळ बसणंही त्यांना कठीण. बघता बघता आपल्या समोरचा माणूस आपल्या शेजारी पोहोचलेला दिसायचा. एखाद्या बाबतीत सगळ्या गावाचा विचार काय असं विचारताच फार मोठ्या जबाबदारीच्या भावनेने व काहीशा गोंधळानेही, काही निवडक जण, स्वतःच गावच्या प्रतिनिधित्वाची जाणीव असलेले, १५–२० फुटांवर जाऊन उभे राहायचे. काय उत्तर द्यावं, या चर्चेत मनोमन गुंगून जायचे.

## गोलमाल हे भाई सब गोलमालच

तेवढ्यात मिन्या रामजी भिल बऱ्याच चोपड्या नि कागद घेऊन आला. बघताच लक्षात आलं, माळावरच्या गंजक्या पेटीत चुरगळलेल्या अशीच कोंबलेली सारी कागद पत्रं उचलून घेऊन आला असणार. बोलणं तोडू नये वगैरे नसते सोपस्कार न मानता सरळ आमच्यापुढे धरता झाला. "माझी जमीन किती आहे सांगा." वाड्याची १ एकर १२ गुंठे, दराबारीची २ एकर ० गुंठे वगैरे सातबारातून पाहून सांगितले. मुद्दा होता, जमिनीच्या भरपाईचा. ज्यातील १० घरं गुजरातेत गेली आणि ९६ खातेदारांना तिथेच जमिनी मिळाल्या त्या मणिबेलीतल्या व या धनखेडीतल्या लोकांना घराची नि जमिनीची भरपाई मिळालीय. मिन्याभाऊला ना त्याच्या जमिनीचं नेमकं माहीत, ना तिला मिळालेला भाव. पैसे बँकेत ठेवलेयत क्षेत्रफळ म्हणजे नेमकं काय आणि कुठे, किती तेही मिन्याभाऊ सांगू शकत नव्हता. गावात एकराची भाषा बोलणारेच कमी. थोडंफारच पण शिक्षण घेतलेलेही तीन तडवी कुटुंबां वे प्रमुखच. वसावा त्यांचा कधीकाळी सल्ला घ्यायला जातातही, पण अंतर ठेवूनच; मिन्याभाऊची सारी पावतीपुस्तकं पाहिल्यावर लक्षात आलं, भरपाईचा काही भाग मुदतीच्या खात्यात, काही चालू खात्यात ठेवलेला. त्यामागचे कारण व टक्केवारीचे गणित ना त्यांना माहीत, ना कागदोपत्री कुठे लिहिलेले. मुदतीच्या ठेवीच्या पावतीवर किती वर्षांची ठेव, तोही उल्लेख नाही. शिक्षितही सरकारी कारभारात अशिक्षित ठरतो म्हणतात, तेच. मिन्याच्या वडिलांच्या नावावर ते निधन पावले तेव्हा असलेल्या जमिनींची भरपाई मिन्या व त्याचा भाऊ दमण्या यांच्या नावे, एकत्र-खात्यावर ठेवलेली. दोघांनी एका वेळी ठरवून, एकत्र अंगठे देऊनच पैसे काढता येतील, हे सांगताच भोवतीच्या चारपाच जणांसह मिन्या नि दमन्या घटकाभरापूर्वी चिंता चेहऱ्यावरून बाजूला सारत हसू लागले.

## शाळा नाही शिक्षण नाही, आमचा गोम्या अंगठा मारी.

अशा प्रकारे शिस्तशीर पैशाचे व्यवहार, तेही चार भक्कम भिंतीतल्या कुठल्या ऑफिसात ही गोष्टच त्यांच्या कल्पनेबाहेरची. उडीद, ज्वार, तूर, लाल मिरची यातून 'दाल रोटू' पुरतं स्वावलंबन असताना विक्रीचे एकूण व्यवहारच फार माफक करणारे वसावा, आपट्याची पानं, चारोळी असे चार दोन जंगल उत्पन्नाचे प्रकारही कधीमधीच बाजारात जाऊन विकणारे.

सारा प्रकार त्यांच्या सांगण्यावरून लक्षात आला. भरपाईचे पैसे ठरवताना, ठेवीत घालताना त्यांचा सहभाग तर नाहीच. पुनर्वसनासाठी नेमलेल्या जिल्हा सल्लागार समितीवर घेतलेला शेजारच्या गावचा पुढारी त्यांचा खरा पुढारी नव्हेच. भरपाईच्या पैशांची खात्यांमध्ये विभागणी करताना, ऑफिसमध्ये त्यांना बोलावलं होतं खरं, पण बरेच अधिकारी बसलेले, बोलणं मराठीत. आदिवासींना समजणाऱ्या भाषेत, समजावून समजावून सांगणारे कर्मचारी मिळणार तरी कुठून ?

**बसवले कसले ? फक्त हलवले गेले.**

अक्कलकुवा तालुक्यातील ९ गांवांपैकी मणिबेलीतले गुजराथी भाषा बोलणारे, गुजराथमध्ये पोरी दिलेले व तिथल्या पोरी आणणारे तडवी स्वखुषीने गुजरातमध्ये वसवले गेले. वसवले कसले, फक्त हलवले गेले. जमीन दिली, ती कधी न कसलेली जंगलजमीन, मोठमोठी खोडे जमिनीत रुतलेली. ती काढून पहिली नांगरणी करण्यापुरताच ट्रॅक्टर नि मजुरीचा मिळून खर्च १५०० रु. एकरी.

सरपंच, उपसरपंच प्रथम जमीन ताब्यात घेतल्यावर आता जमीन नाकारून झगड्यासाठी उभे राहिलेले. बाकी, 'आता बोलून काय उपयोग' म्हणून कामाला लागलेले. मूळ गावातली जमीनही सध्यातरी कसायला मिळतेय, त्याच समाधानात राहणारे.

**प्रत्येक चर्चेच्या वेळी ह्या दाराआडच उभ्या असतात.**

नारणभाईंच्या पत्नीने लगबगीने चहा ठेवायला घेतला. ही बाई फार हुशार. दहा-बारा पुरुषांशी आम्ही बोलत असताना जरा मागे बसूनही, पार पाडणारी. नोटीस किती वर्षांपूर्वी आली, घर हलवायला किती दिवस लागले, सारेच अडलेले प्रश्न ती पूर्ण करत असे. मऊशार राखेने घासूनघासून त्यांच्या पद्धतीने चकचकीत केलेल्या कपांची मांडणी तिची पटकन झाली. पण कापसाच्या रोपांच्या काटक्या काटक्या गोळा करताना डोळ्यात पाणी आणून म्हणाली, "पाहा बाई, आता ही पाळी आली आमच्यावर. तू मणिबेलीत लाकडांच्या राशी पाहिल्या होत्यास ना ? आता इथे तर नावालाही जंगल नाही, तर लाकूडफाटा कुठचा ?...आम्ही जंगल तोडतो, म्हणतात बाई. पण मग कुणी मोठे मोठे लोक पाणी घेतात, कुणी घरं बांधायला भुई घेतात. आम्ही जंगलसंपत्ती पण घ्यायची नाही का ? आमच्याकडे पैसे नाहीत म्हणूनच, नाही का ?" न्यायाच्या शाब्दिक गप्पा, संकल्पना, संपत्ती वाटपाचं गणित तिने तिचं तिचंच मांडलंही होतं.

अट्टीला, जुनाल्याला, भरडला बायांशी जरा जास्त बोलणं झालं. 'धुळयाच्या बगीच्यात चाले जन्ता गाडी' अशी गावाच्याच सीमेआडून पाहणाऱ्या नवलाईची आणि 'जल्मी सुताऱ्या गर बांदारो। बेवाणी वेचीने डंड भरावो ॥' (जन्मभर पुरणारं घर सुताऱ्या बांध। विहिणीला विकून ( जंगल खाल्याला ) दंड भरेन थांब ॥) अशी वास्तववादीही गाणी एकाच सुरात तासन्तास गटागटाने गाणाऱ्या बायका पहाटे ३ लाच जात्यावर बसणाऱ्या. दिवसभर जात्यासारख्याच गरगरत कामात राहणाऱ्या तेही मुलांच्या नहाण्या–धुण्यास फारसा वेळ न देता प्रत्येक चर्चेच्या वेळी दाराआड किंवा बांबूच्या तट्ट्यामागे ( भिंतीमागे ) त्या पोरांसकट उभ्या असायच्याच. एखादीच म्हातारी काठीसकट मधोमध येऊन ऐकत बसायची. ती बोलू लागताच इतर कुणी गप्प करायचं म्हणून सभेनंतर माझ्याजवळ येऊन आपल्या कारभारी झालेल्या पोराचं कौतुक करायची.

मोकळ्या झाल्या तरी गाव कुठे जाणार, कसा जाणार याबद्दल बाया गोंधळलेल्याच. त्यांची मोठ्यात मोठी चिंता, आपल्या दूर गेलेल्या पोरी कशा भेटतील, ही. जुनान्याच्या पाटलाची पोरगी भुशाच्या खर्डीला दिलेली. जुनानाही उठणार नि भुशाची खर्डीही. पोरं कुठे जाणार नि माय कुठे ?

**विकास प्रकल्पांना आव्हान**

सरदार सरोवरात बुडणाऱ्या महाराष्ट्रातील ३३ गावांच्याच ३३ कोटी कहाण्या सांगता येतील. 'नर्मदा आमची विहीर' समजून, दुरून वाटावं तशा धार्मिकतेशिवायच ह्या आदिवासींनी या डोंगरदऱ्यात आपलं थोडकंच जीवन जपलेलं. तेही आता उद्ध्वस्त होणार. धरणाच्या फायद्या-तोट्याचं गणित मांडताना, या गोष्टीचा विचारच केलेला दिसत नाही. टाटा कन्सल्टन्सीतर्फे केले गेलेले सरदार सरोवर धरणाचे आर्थिक मूल्यमापन हे याचा उत्तम नमुना आहे.

६००० कोटी रु. चा हा प्रकल्प (एका अंदाजानुसार, ८००० कोटींवरही जाईल असा), पण तिन्ही प्रकल्पग्रस्त

राज्यांपैकी महाराष्ट्र व मध्यप्रदेश या दोन्हींमध्ये प्रकल्प ग्रस्त कुटुंबांचे सर्वेक्षण तर झालेले नाहीच, पण पर्यावरणाच्या दृष्टीनेही अभ्यास झालेला नाही. आजवरच्या 'उकाई'चा अलीकडचा, गुजराथेतलाच धरून अनेक प्रकल्पांच्या फायद्याबद्दलची आश्वासनं प्रत्यक्षात न उतरल्याचं सर्वच जाणतात. जिथे पाणी व वीज या फायद्याचे प्रमाण अपेक्षेप्रमाणे घडले आहे, तिथेही न्यायाच्या निकषावर प्रकल्प तपासून पाहिलेलेच नाहीत. किती पाणी वा किती वीज कुठल्या आर्थिक गटांना मिळाली हा प्रश्न विचारल्याविना ते शक्य नाही. पाणी प्रकल्पामुळे रोगराई, जमिनीच्या प्रतीवरचा परिणाम इ. गोष्टी तर आहेतच. या दृष्टिकोणातून आजच्या मोठमोठ्या विकास-प्रकल्पांना आव्हान देण्याची गरज आहे. नर्मदा विकास प्रकल्पामधील तीस लहानमोठ्या धरणांच्या निमित्ताने हे सर्व विचार कुणाच्याही मनात उभे राहतील, राहिले पाहिजेत. त्यासाठी काही गोष्टींची मात्र निश्चित आवश्यकता आहे. एक, तांत्रिक तज्ज्ञांची. सरकारी विनंतीवर व मदतीने कार्य करणारे नव्हेत तर स्वायत्त तज्ज्ञांच्या गटाची. विकासकार्यासाठी झटणाऱ्या लोकांमध्ये निश्चित स्थान असलेल्या व जोखीम घेण्यास तयार अशा सामाजिक संस्थांमार्फतच हे घडले तर अगदीच योग्य होईल. दुसरं म्हणजे, निव्वळ आयोजित प्रकल्पांचे फायदे-तोटे तपासून नव्हे तर जास्तीत जास्त व्यावहारिक, फायदेशीर असे पर्याय सुचवूनच, हे आव्हान स्वीकारल्यासारखे होईल.


## न्याय्य पुनर्वसनासाठी आग्रह

सरदार सरोवर धरणामुळे विस्थापितांच्या न्याय्य पुनर्वसनासाठी आग्रह धरताना वरील अधिक मूलगामी बाबींचा विसर पडता नये. सरदार सरोवराचे 'जीवन' (पाणी) ज्यावर अवलंबून आहे अशा अजून सुरुवात न झालेल्या, मध्यप्रदेशातील नर्मदा सागर धरणाविषयी तर हे प्रश्न तावडतोबीने विचारले जायलाच हवेत. मात्र पुनर्वसनासाठी द्यावयाच्या लढ्याचेही महत्त्व यामुळे कमी होत नाही. उलट पुनर्वसनाची शक्यता, त्यातील अडचणी याही प्रकल्पाच्या योग्यतेने (Viability) बाबतच्या निर्णयाचा महत्त्वाचा निकष मानला जावा हे पाहाणे योग्य ठरेल. जसे पर्यायी जमीन कुठल्याही कारणामुळे मिळवता येत नसेल, तर जमिनीवर तुलनेने अलीकडेच स्थायिक झालेल्या आदिवासींना पुन्हा 'फिरत्या शेती' (Shifting cultivation) वर ढकलणं हा अन्याय नव्हे, गुन्हाच ठरला पाहिजे. आज पुनर्वसनाची बाब श्रीशैलम, सिंगरौली, उकाई, कोयना कुठल्याच प्रकल्पांमध्ये पूर्ण गांभीर्याने हाताळलेली दिसत नाही, सरदार सरोवराबाबतही तीच दिशा ठरणार अशी चिन्हं आहेत. एरव्ही, सर्व (तीनही राज्यांतल्या) विस्थापितांच्या पुनर्वसनास आयोजित त्यापेक्षाही अधिक खर्च निव्वळ या प्रकल्पांवरील अधिकारी/तज्ज्ञ यांच्याच वसाहतीवर झाला नसता! पुनर्वसनाच्या नियमित आढाव्याचे काम सरकारी संस्थेवर महाराष्ट्रात सोपवलेच गेले नसते! वगैरे वगैरे.

## एकीचा बांध घालू ऽ ऽ

हे सारे म्हणताना, पुनर्वसनाचा प्रश्न उचलून धरणाऱ्या संस्थांचीही एक बांधिलकी आवश्यक आहे. बांधिलकी, हा प्रश्न नेटाने अखेरपर्यंत धसास लावण्याची बांधिलकी, विकासाच्या नावाखाली विस्थापन वाढत असताना, या प्रश्नाच्या महत्त्वाशी, बांधिलकी, तंत्रज्ञ व समाज–संघटक यांच्या सहकार्याशी बांधिलकी, क्षुल्लक मानापमानाच्या पलीकडे, निव्वळ प्रश्नाशी. याच बांधिलकीच्या आधारावर एका धरणाशी संबंधित पुनर्वनाच्या कार्यास राष्ट्रीय पुनर्वसन धोरणाकडे, व विस्थापनाची योग्य दखल घेऊन, इतर निकषांच्या बरोबरीने, यातूनही विकास-प्रकल्पांच्याच पर्यायांकडे नेता येईल.

—मेधा पाटकर
'सेतू'
बी–४ केदार अपार्टमेंटस्
एच. एल. कॉमर्स कॉलेजमागे
अहमदाबाद ३८०००८



# नर्मदा धरणग्रस्तांचे पुनर्वसन धुळे जिल्हा नर्मदा धरणग्रस्त सहाय्यक समितीचे निवेदन



गुजराथमध्ये भडोच जिल्ह्यात बांधल्या जाणाऱ्या विशाल सरदार सरोवराच्या धरणामुळे गुजराथ, महाराष्ट्र व मध्यप्रदेशातील दोनशेहून अधिक गावे पाण्याखाली जाणार असून त्यात महाराष्ट्रातील धुळे जिल्ह्यातील अक्कलकुवा व धडगाव तालुक्यातील जवळपास ३३ गावांचा समावेश आहे. यामुळे ७००० हून अधिक लोक विस्थापित होतील.

ह्या विस्थापित होणाऱ्या आदिवासी कुटुंबांना पुनर्वसनाच्या नियम व सवलती तसेच त्यादृष्टीने नेमलेल्या नर्मदा न्यायाधिकरणाची कल्पना नसून आतापर्यंतच्या पुनर्वसनाचे काम जागतिक बँकेशी झालेल्या करारातील तत्त्वानुसार झालेले नाही त्यामुळे अनेक आदिवासी कुटुंबांचे कायम नुकसान होणार आहे. त्या अनुषंगाने धुळे जिल्हा नर्मदा धरणग्रस्त सहाय्यक समितीतर्फे प्रसिद्ध निवेदनात डॉ. रा. सु. चौधरी, डॉ. मु. ब. शहा, श्री. भाई मदाने, श्री. बाहरू सोनवणे, श्री. जनार्दन महाराज, श्रीमती विजया चौक व इतरांनी शासनाकडे मागण्यांचे निवेदन पाठविलेले आहे.

यामध्ये ( १ ) जागतिक बँकेशी झालेल्या करारातील तसेच नर्मदा न्यायाधिकरणाच्या निवाड्यातीलसुद्धा पुनर्वसनाबाबतच्या सर्व तरतुदींचे पालन कसोशीने, पूर्णपणे, आणि सर्व गावांसाठी तसेच त्या गावातील सर्व कुटुंबांसाठी करावे.

( २ ) कुटुंब, धरणग्रस्त, भूधारक या शब्दांच्या अर्थाविषयी व व्याप्तीविषयीच्या अपूऱ्या तरतूदी बदलून सवयस्क पण अविवाहीत, विधवा आणि घटस्फोटित मुलींचे वेगळे कुटुंब मानावे. तसेच धरणाच्या पाण्याने वेढली जाणारी किंवा दुर्गम होणारी गावे, घरे, जमिनी यांचासुद्धा समावेश धरणग्रस्तांमध्ये करण्यात यावा आणि भूधारक याचा जमिनीचा कायदेशीर मालक असा संकुचित अर्थ न धरता दारिद्रय, अज्ञान इ. मुळे ज्यांनी आपल्या मालकी हक्कांच्या नोंदी सरकार दफ्तरी करून घेतल्या नाहीत परंतु वर्षानुवर्षे जे जमिनी कसत आले आहेत, ज्यांना गैरकायदा अतिक्रमक दर्शविले आहे त्यांनाही भूधारक मानण्यात येऊन संबंधितांना त्याचे फायदे—सवलती मिळाव्या.

( ३ ) विस्थापितांचे आयुष्यमान उंचावेल या जागतिक बँकेबरोबरच्या तत्त्वानुसार प्रत्येक भूमिहीनासही कमीत कमी ५ एकर जमीन देऊन पुनर्वसन व्हावे.


( ४ ) प्रत्यक्ष पुनर्वसनाच्या सर्व सोयी म्हणजे नवी गावे, घरे, न्यायाधिकरणाने मंजूर केलेल्या सुखसोयी व वहिती जमिनी तसेच नव्या ठिकाणी रोजगार हमी ॲग्रीसिल्व्ही योजना या सर्वांची प्रत्यक्षात पूर्ण व्यवस्था झाल्याखेरीज कुठलेही गाव किंवा बस्ती किंवा कुटुंब मूळ जागेवरून हलवू नये, स्थलांतर करू नये. त्याला धोका होईल असे धरणाचे काम हाती घेऊ नये.

( ५ ) आदिवासींचे पिढ्यान् पिढ्या पहाड—जंगलाशी असलेले नाते लक्षात घेऊन त्यांचे पुनर्वसन पहाडाजवळ व्हावे. त्यासाठी जरूर तर केंद्र शासनाकडून जमीन

[ पान ११ पहा

# तुमरो गांव धरणुं जातलो

अक्राणी महाल तालुक्यातल्या नर्मदाकाठच्या भूशा या गावच्या लोकांशी श्री. लक्ष्मण कुलकर्णी यांची झालेली ही बातचित. लोक भिलोरीत बोलत होते, अन् राजबर्डी आश्रमशाळेचे जहांगीर गुरूजी ती गोष्ट मराठीत सांगत होते. भुशा गाव सरदारसरोवर धरणाखाली जाणाऱ्या अनेक गावांपैकी एक.



- तुमचं गाव धरणाखाली जाणार आहे ?

जी.

- अशी सगळी मिळून किती गावं बुडतील ?

लई हाइत. अकराणीमंदी आमच्या लगतची बीस-बाइस गावं आन् आक्कलकुव्यामंदी चार सा हाइत, या जंगलातली समदी पच्चीसतीस हाइत.

- गावं पाण्याखाली जाणार आहेत हे तुम्हाला कधी कळलं ?

आता धाबारा बरिसं लोटली, आसं...

- हे तुम्हाला कसं कळलं ?

सरकारी माणसं आली नवं ? टरक येत्यात, जीपगाड्या बी लई फिरत्यात. हितं या जंगलात कशापाई खेपा टाकत्यात अशी धागधुग आमच्या प्वटात. तं तेंनी सफेद चुना फासला आन् समदे फातर ठोकून दिले. तं आमी त्येस्नी पुसलं. मंग त्ये बोलं कां हतं पानी फुगनार हाय अन् पल्याड मोटा बंधारा घालाचा हाय, आसं.

- या अगोदर, धरण व्हायचं आहे, याची तुम्हाला कुणी कल्पना दिली नव्हती ?

नाय, काय नाय. पर मंग सरकारी माणसं आलं आन् खोपटाचे खांब, वासे, कौल, कुडं समदं मापाय लागली. तुमची जिमीन केवडी हाये, जिमिनीची किंमत काय, ह्ये बी चवकशी क्येली पाटलाला आन् सांगावा दयेला ' गावकन्यानला सांगा, समदा गाव पान्याखाल जानार, आसं. मंगं पाड्यापाड्यातून आमची लोकं उतरून आलं. लिखापढीचं काम हाय' नीटच्च लिबलं पायजे आसं आयकत बसली; मंगं त्यान्ला आपापल्या खोपटाकडे लावून दयेलं.

- हा सर्व्हे कुठल्या खात्याने घेतला ?

फारिश्ट. सतरा टायमाला सर्वे घ्येतला. मंग राजपिपलाचे, गुजरात सरकारचे माणसे आलं. त्येंनी परतून सर्वे मोजली. इकडच्या सरकारनं मापलं त्ये खरंखोटं तपास लावलं.

- मग सर्व्हेवाल्यांची अन् तुमची काय बातचित झाली ?

मंजी त्येंनी आमास्नी सांगलं कां तुमाला गुजरातेत हलवत्याल. पैली मोजमोपली क्येली आन् मंग सांगलं कां तुमाला जिमिनीचा आन् घराचा पैका भेटंल.

- आपला गाव पाण्याखाली जाणार हे ऐकून लोकांना काय वाटल ?

आता काय सांगावं दादा तुमाला ? सरकार पैकं दिल, समद दील. पर आमचं ह्ये घरदार, गांव तो आज्या-पणज्याचा हाये हितूनं दूर जायाचं आसं कानावर पडलं तवापास्नं आमच्या डोळ्याचं पाणी सुकलं नाय, गाव सोडाचा ह्यो निस्ता सोचइचार क्येला तरी बी डोळ्यांतून पानी निगतं. काळजामदी धडधड वाजतं आन् हातपेर निस्ते थंड पडत्यात. आमाला घरादाराचं पैकं मिलल म्हनुन सांगलं पर बाकी काय नाय इचारपूस क्येली. : निस्तं तुमी गुजरातेत हलून जायाचं आसं सांगून दिलं तं आमचे लोक सांगाय लागले " आमी धरनात डुबून जाव,

नाय तं जहर खावन मरून जाव, नाय तं सरकार आमच्या प्वटावर गोळ्या मारून खतम करून देव, पर आमी गुजरातमंदी जायाला कबूल नाय.

- पाटील, आदिवासी विकासाच्या योजना इथल्यापेक्षा गुजराथेतच चांगल्या असल्या तर? तिथं जास्त सुखसोयी असल्या तर?

मोठाम्‌मोठा गुजरात हाये दादा आन् नांगाम नांगा माराष्ट्र. आमाला बराबर ठावं हाय. आमची हयात हतंच ग्येली. आमी माराष्ट्र सरकारकडे शाळा मागली. नाय दिली. रस्ता काढून मागला. तो बी नाय दिला. आमी बाजाराला वीस मैल चालत जातू. कुनी बीमार पडला तरी बी उपाव नाय. आमास्नी सांगत्यात तुमी धरनाखाली जानार. तुम्हाला आता काय नाय भेटनार." समदं ठावं हाय.

गुजरात देस ब्येस हाय. आमीबी सोताच्या डोल्यानी देखला हाय. हतं तं न्हान न्हान पोरं बी बिडी वढत्यात पर गुजरातेत फलाटावरबी बिडीचं थोटूक बी सापडाचं न्हाय. तरनी पोरं गल्यामंदी रेडू घालून फिरत्यात बाजारात. ततं तं रेल्वे फलाटावर योकच मोट्टा रेडु व्हता. आन् तोच बाजत हुता. आन् आमचे लोक तं दारुमंदी पार बुडले हाअित. पर गुजरातमंदी दारू फ्येकून देत्यात. समदं खरं हाय. बराबर हाया ते लोक इतके श्याने हाअित. आन् आमी येड्यावानी जंगली माणहे. आमाला पोरगी देयाला ते तयार नाअित.

- तुम्ही गुजरातमध्ये जाऊन आला आहात?

व्हय. आमाला सर्वेवाल्यानी सांगलं कां योकवार तुमी गुजरातेत जाऊन या. जिमीन बगा. मंग आमी काका बाबा गेलु. जिमिन काळीशार व्हती. बागायती करून घ्येनार असं सांगलं हुतं. पर आता उजाड. पानीबी नाय. तं पायप घालत्याल असं सांगलं. जंगलबी नाय भेटलं. तवा चुलीला काटकीबी भेटाची नाय. बाया-पोरं कुटंकुटं हिंडत्याल? गायमातेला चारा बी नाय भेटणार. पानीबी नाय. अशी दशा हाये.

आन् लोक? आमच्यासारकंच आदिवाशी हाईत. पर आमी पेयाला पानी मागलं तं वरून पानी वाडले. आता दादा तुमीच निवाडा द्या. लोक आमाला पानीबी वाडत नाय तं आमच्यासंगं रोटीबेटी कसं करत्याल? आमी गपचिप न्हावं ततं—आन् मुकाट बसावं?

- तुम्हा लोकांचे लग्नसंबंध नर्मदाकिनाऱ्याच या गावांमध्ये जुळतात का?

नाय तं. मंजी असं हाय

दादा, नर्मदातीरचे तं आमचेच काकाबाबा हाइत. तेंची लेक म्हंजी आमची बोणहीच हाये. ही माजी आया. हिला राजबर्डीवरून आन्ली माज्या बानं. आन् माजी लाडीबी तिकुडचीच हाये. धडगावकडची. आमी तं खालून शायद्यावरूनबी सुना आणतुं. आन् आपल्या पोरी बी ततं देतू. धडगाव, रोषमाळ, राजबर्डी, शायदा, मुंगबारी, दरा ये समदं चालतं. पर नर्मदेपल्याड गुजरातेत तं आपला समाज नाय. ही भानगड हाय.

- आता तुमच्या पंचवीसतीस गावांपैकी कुणीच गुजराथेत जायला तयार नाहीत का?

अक्कलकुव्यातली चार पाच गावं हाइत. ततं तडवी समाज हाये; गुजरातेत बी तडवी हाइत. तं त्येंची खुशी हाय गुजरातेत जायाची. पर आमचीच कबुली नाय; आमचा नर्मदा इकास, सबापती, आमदार, मंत्री समद्याचं सांगनं हाये का तुमाला गुजरातमंदी जिमीन भेटंल. तुमी तिकडं जावा. आता आमचा सवाल हाय, ह्यो संसार तो देवानच ठिवला हाय. लाडीला माटी आन् माटीला लाडी, हे तो देवानीच पक्का जमवला हाय. काय सरकार आमची पोरगी करून घेनार आन् आपली पोरगी देनार हाय? आमची गाईबैलंबी इकून टाकावी आमी, जिमीन ततं भेटल आमाला म्हनून? अन् दुसऱ्यानं वाडलेलं पानी प्यावं?

- आजवर तुम्हाला काय हवं अशी सरकारमधून विचारपूस झालीच नाही?

धरनाचं पानी आलं, आलं, म्हून पेल्यानं बोंब पडली तवा आमी लइ भ्येलो. प्वटात गोळा उठला. आमी मनलं, पानी आलं तं पार जंगलात घुसून जाव. पर घुसाला जंगलबी बाकी नाय. धाबारा वरिसं लोटली. कुनी काय इच्यारलं नाय. निस्तं यिउन गुजरात गुजरात हाकारा कराचं. पर आता आमी गपमीट नाय बसणार. धडगाव हादरून देव. तं आता आमची जबानी घेत हाअित. 'कुटं जायाचं तुमाला' आसं पुसत हाअित.

● मग आता तुमची जमिनीबाबतची मागणी काय आहे?

गांव तं उठणार. तं आमाला तलोदा, अक्कलकुव्याकडं लावून द्या, आमची मागणी हाय. गायगुराला चारा-पानी भेटल. सरपणाला लाकुडफाटा भेटल. जिमिन बी ठिक हाय आन् रोटीबेटी आजपातूर चाललं तसं चालू न्हाइल. आमचे लोक हाअित ततं. आमाला प्वटात घ्येत्याल.


● पण तळोदा अक्कलकुव्याकडे जमीन आहे?

हाय तं. अमलीबारी, इशागव्हाण, गुल्याआंबा गावांतून जिमिन हाये. आमाला नर्मदा हापिसवालेच बोललं. मंग आमी जिमिन बगुन आलुं. दोन साल लोटले. मंग काय कळी फिरली काय जाणुं? मग सांगलं का आता ततं जिमिन शिल्लक नाय. तुमाला भेटाची नाय. तुमाला गुजरातमंदीच हललं पायजे.

● आता यापुढे तुम्ही काय करणार?

मिटिंग आन् सर्वे तं बारमाह चालू हाअित. सारकी मिटिंग बलावत्यात आन् धडगावला हाजरी भरावी लागतू. आमी तं लई बिटलुं. पर आता आमी परत्येक मिटिंगमदी सांगतुया. माराष्ट्रात जिमिन देवा. हितं जिमिन नाय भेटली तर आमी डुबून घेव. तुमच्या गोळया खाव, पर आमी आपला देस, आपली माणसें सोडून हलणार नाअी. तुमी कंच्याबी पाड्याला जावा. कंच्याबी गावाला जावा. लोक तुमाला हयेच सांगत्याल. दुसरी बात नाय सांगणार.

**लक्ष्मण कुळकर्णी**
मानवशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे



पान ८ वरून ]

उपलब्ध करून घ्यावी. तेथे वस्तीच्या प्रमाणात गुरचरण खळयाची जमीन उपलब्ध करून द्यावी.

( ६ ) स्थलांतर/पुनर्वसन करताना पूर्ण गाव, पूर्ण वस्ती स्थलांतरित करावी. हे स्थलांतर आणि पुनर्वसन करताना महाराष्ट्र किंवा गुजराथ यापैकी त्यांना हव्या त्या राज्यात दबाव न आणता त्यांच्या मर्जीनुसार त्यांना जाऊ द्यावे.

( ७ ) न्यायधिकरणाच्या निवाड्याप्रमाणे धरणग्रस्त जमिनीच्या मोबदल्यात द्यावयाच्या जमिनी लागवडीलायक असाव्यात. जेथे उणिवा असतील तेथे शासनाने खर्च करून त्या लागवडीलायक करून द्याव्या. पाटाचे पाणी उपलब्ध करून द्यावे आणि धरणग्रस्त जमिनीची गुजराथ राज्याकडून मिळणारी किंमत हीच पर्यायी सर्व जमिनींची किंमत मानण्यात यावी. धरणग्रस्तांची घरे हलविताना बांधकामाचे साहित्य व सर्व सामान शासकीय खर्चाने पोहचविण्यात यावे.

( ८ ) पुनर्वसन योजना/अंमलबजावणी कार्याची माहिती अपेक्षित वेळापत्रकासह जागतिक बँकेच्या योजनेनुसार प्रशिक्षित अधिकाऱ्यांकडून धरणग्रस्तांना समजेल अशा भाषेत, जास्तीत जास्त प्रसार, प्रचार होईल अशा पद्धतीने द्यावी. अशी सर्व माहिती संबंधित सामाजिक संस्थांनाही द्यावी.

( ९ ) या सर्व कार्याची त्याची परिणामी तपशीलवार व कुटुंबनिहाय सामाजिक-आर्थिक पाहणी व मूल्यमापन, सेवाभावी व सामाजिक संशोधन कार्य करणाऱ्या स्वायत्त संस्थांमार्फत सातत्याने होऊन त्यातील उणिवा त्वरित दूर व्हाव्या. तसेच धुळे जिल्हा पातळीवरील प्रकल्प सल्लागार समितीवर अक्कलकुवा, धडगाव येथे स्थापन झालेल्या नर्मदा धरणग्रस्त समित्या व साहाय्यक समित्यांना आणि या कामात सहाय्य करणाऱ्या इतरही सामाजिक संस्थांना प्रतिनिधित्व देण्यात यावे.

●

# जंगल – भारत व महाराष्ट्र

दिनानाथ मनोहर

भारतातील नागरी समाज व्यवस्था जसजशी विकसित होत गेली, पसरत गेली तसतशी जंगलतोड होत गेली हे खरं असलं तरी मुस्लिम व हिंदू राजांनी जंगले, पहाड टेकड्या ह्यांनी व्यापलेल्या व आदिवासींची वस्ती असलेल्या दुर्गम भूभागांना धक्का लावला नाही. ब्रिटिश सत्ता भारतात पाळेमुळे धरू लागली आणि समाजातील उत्पादन संबंध, आर्थिक संबंध झपाट्याने बदलू लागले, लोकसंख्याही वाढू लागली. ब्रिटिशांनी १८६०–६५ पर्यंत मन मानेल तसा जंगलांचा नाश केला. ह्या जंगल-विनाशामुळे जेव्हा आदिवासी समाजव्यवस्थेतच ताणतणाव निर्माण होऊ लागले, आदिवासीमध्ये बंडे होऊ लागली त्यामुळे आणि वनरक्षणाच्या वाढत्या जाणिवेमुळे ह्या जंगलतोडीच्या प्रक्रियेला आळा बसला. ब्रिटिश नीतीचा पाया जरी वनसंवर्धन होता तरी स्थानिक लोकांच्या गरजा पुऱ्या करण्याचा दृष्टिकोण त्यात नव्हता. इंधनाच्या वाढत्या कमतरतेची जाणीव सत्ताधाऱ्यांना निश्चित होती. १८७० ते ८० ह्या काळात लिहिल्या गेलेल्या गॅझेटियर्स-मध्ये जंगल विनाशाच्या वाढत्या व्याप्तीबाबत पडसाद उमटले आहेत. ब्रिटिशांनी जनतेच्या गरजा नाकारून केवळ शासनाच्या गरजा पुरवून जंगले राखण्याचा प्रयत्न केला पण जंगले नष्ट होतच राहिली. पहिल्या व दुसऱ्या महायुद्धात ह्या विनाशाला अधिकच गती प्राप्त झाली.

## ब्रिटिश वननीतीच लागू ठेवली

भारत स्वतंत्र झाल्यावर भारतीय शासनाने ब्रिटिश वननीतीच लागू ठेवली वाढत्या उद्योगधंद्यांच्या औद्योगिक गरजा पुऱ्या करणे व जास्तीत जास्त आर्थिक लाभ मिळवणे हीच भारत शासनाची वननिति राहिली आहे.

पाचव्या योजनेच्या ड्राफ्टमध्ये वनोत्पादने व औद्योगिक लाकडाच्या उत्पादनाची वाढ ह्यासाठी प्रयत्न करणे हा योजनेचा प्राथमिक उद्देश असल्याचे म्हटले आहे. वनसंरक्षणावरील भर कमी करून, जास्त उत्पन्न देणारी वने निर्माण करण्याच्या कार्यक्रमावर भर देणे, नैसर्गिक जंगलांमधील वृक्षांची तोड करून देण्याच्या झाडांची वने योजनाबद्ध मार्गांनी वाढवणे साधले पाहिजे असे सुचविण्यात आले.

## केवळ ११ टक्केच वनाच्छादित जमीन

भारतातील एकूण २२ टक्के जमीन वनाच्छादित आहे असे सांगण्यात येत असेल तरी सॅटेलाइटने घेतलेल्या फोटोवरून हे प्रमाण केवळ ११ टक्केच असावे असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. आज भारतात अधिकृतरीत्या ज्या भूभागाला जंगल म्हणण्यात येते अशा ८३० लाख हेक्टर्सपैकी ४८० लाख हेक्टर्स जमिनीवर काहीही झाडे नाहीत. म्हणजेच एकूण ३०५० लाख हेक्टर्स जमीनीतील केवळ ३५० लाख हेक्टर्स जंगलाच्छादित आहे, आणि हेही जंगल झपाट्याने नाहीसे होत आहे. हिमालयातील ९००० फूट उंचीपर्यंतचे जंगल साफ झाले आहे ही वृक्षाराजी १२००० फूटापर्यंत आहे, असे धरले तरी हिमालयात आता फारसे जंगल शिल्लक नाही आणि असे असतानाही जंगले नष्ट करणाऱ्या उद्योगाना अत्यंत अल्पदराने सरकार वनोत्पादने देत आहे. ओरीएन्ट पेपर मील आमलाई १९६४ मध्ये सुरू झाली. ह्या मीलशी मध्यप्रदेश सरकारने वीस वर्षांचा करार केला. ह्या करारान्वये मीलला ३६ नये पैसे टनाने बांबू विकत देण्याचा सौदा झाला. बल्लारशहा मीलची कहाणी फारशी वेगळी नाही. अत्यन्त अल्प मोबदल्यात वनविनाश करणाऱ्या ह्या पेपर मील्सनी आपल्या भोवतालच्या क्षेत्रा-तील वने उजाड केली आहेत. आणि आता आसाम-मधून बांबू आणित आहेत. अशा मातीमोल भावात ह्या उद्योगाना वनोत्पादने देणे, लोकांच्या इंधनांच्या गरजा पुऱ्या करण्यासाठी प्रयत्न न करणे ह्यामुळे झपाट्याने जंगले साफ होत आहेत. कमीत कमी दरात जास्तीत जास्त वनस्पती मिळवणे हा उद्योगाचा प्रयत्न असतो आणि ह्या प्रयत्नांना राजकीय पुढारी व नोकर-शाही साथ देते. सतत होणाऱ्या बदल्या, चांगल्या कामाची कदर नसणे, वाईट कामाबद्दल शिक्षा न होणे, राजकीय व पैश्याचा दबाव ह्या साऱ्या प्रकारांनी नोकरशाही अकार्यक्षम झाली आहे. हे खरे असले तरी

मुख्यतः आपल्या वननीतीचे एकच उद्दिष्ट राहिले आहे आणि ते म्हणजे सरकारी तिजोरी भरणे आणि उद्योगपतींना, व्यापारीवर्गाला प्रचंड फायदा करून देणे.

### वनविनाश करण्यात सामान्य माणसाचाही हात

अर्थात ह्या वनविनाशाला केवळ शासन उद्योगपती ठेकेदार, भ्रष्ट अधिकारी व नोकरवर्गच जबाबदार आहे असे नाही. सामान्य माणसानेही ह्यात हातभार लावला आहे. जंगलाच्या सान्निध्यात असलेल्या आदिवासींचे, जगलाशी असलेले नाते तोडले गेले, वनोत्पादित कंदमुळेच फळे, फुले, ह्यापासून त्यांना वंचित केले, तेव्हा जगण्यासाठी त्यांनी जंगल जमिनीवर शेतीसाठी अतिक्रमण करावयास सुरुवात केली. ह्याशिवाय जंगलाच्या परिघावर असलेल्या लहान मोठ्या शहरगावांतील लोकांची जळणाची गरज पुरवण्यासाठीही आदिवासी जंगलतोड करू लागले. लोकांची इंधनासाठी लागणाऱ्या लाकडांची गरज पुरी करणे ही आपली जबाबदारी आहे असे वनखाते मानत नाही त्याची किंमत वनविनाशाने द्यावी लागत आहे. आदिवासींना उपजिवीकेसाठी साधन नसणे व गाव-शहरांतील लोकांना जळणासाठी काही सोय उपलब्ध नसणे ह्याचा एकत्रित परिणाम म्हणजे आदिवासीकडून जंगलतोड हे लक्षात घेतले पाहिजे. आज भारताची एकूण अशी परिस्थिती आहे की जळणासाठी वापरण्यात येणारा गॅस रॉकेल ह्यांच्या पुरवठ्यात वाढ झाली नाही वा काही कारणाने खंड पडला तर अशी स्थिती येईल की इंधनासाठी दंगली उसळतील. कदाचित अशी स्थिती निर्माण होईल की गरिबांजवळ खायला धान्य असेल पण शिजवायला इंधन नसेल.

### पाण्याच्या प्रत्येक थेंबाचा उपयोग करा

शासनाच्या वननीतीचा भारतातील जंगलावर जो परिणाम झाला आहे त्यामुळे. महाराष्ट्राची स्थितीही तशीच आहे. एकूणच महाराष्ट्रात पावसाचे प्रमाण मर्यादित काही भूभाग सोडले तर जमीनही मध्यम दर्जाची त्यामुळे महाराष्ट्रात जमिनीच्या प्रत्येक इंचाच्या व पाण्याच्या प्रत्येक थेंबाचा योग्य उपयोग करून घेणे गरजेचे आहे. पण तरीही जंगलतोडीत महाराष्ट्र मागे नाही. महाराष्ट्रातील एकूण जमिनींच्या केवळ २१·४९ टक्के जमिनीवर जंगल आहे, हेच प्रमाण मध्यप्रदेशाच्या बाबतीत ३८·९३ टक्के

[पान १६ पहा

# जंगल संरक्षण की भक्षण ?

## शहादे तालुका

छाया सुरतवंती

देशामध्ये कमीत कमी ३५% जंगल राहिले तरच निसर्गाचे संतुलन राहाते हा मुद्दा आता सर्वमान्य झालेला आहे. यातूनच जंगल वाचवण्यासाठी केलेल्या कडक कायद्यांचे समर्थन होऊ शकेल. परंतु ज्याने राखायचे तोच खातो आहे हेच वारंवार दिसत आहे. यावर उपाय काय ?

पूर्वी जंगल खूप घनदाट होते म्हणून शहाद्यात पाच सॉ मील्स होत्या. आता जंगल फक्त एक चतुर्थांश राहिले. पण सॉ मील्स तेवढ्याच. यापैकी काहींना वारंवार दंडही झालेले आहेत. अशा सॉ मील्स बंदच का करू नयेत ? नाहीतर जंगल संरक्षण करणारे खरोखर जंगलाचे रक्षण करत आहेत का सॉ मीलवाल्यांकडून हप्ते गोळा करीत फिरत आहेत हा प्रश्न मनाला छळत राहातो. नाहीतर पूर्वी शहादा, धडगाव, तोरणमाळ भागात एकच रेंजर होता आणि आज दहा रेंजर ऑफिसर व त्यांचा स्टाफ असूनही टेकड्या अधिकाधिक बोडक्या होत जाताहेत. हे कसे घडते ?

संबंधित खात्याचे अधिकारी व कर्मचारी हे स्मगलर्स बरोबर असतात हे अगदी ढळढळीत आढळते आहे. नुकत्याच घडलेल्या या घटनाच पाहा. चोरट्या लुटीचे लाकूड सोडावे वा सोडू नये यावरून तलावडी येथे, शहादा तालुक्यात रेंजर व फॉरेस्टर यांच्यातच जोरदार मारामारी झाली. केस आता कोर्टात प्रविष्ट आहे.

अशी अनेक उदाहरणे आहेत. लेखी तक्रार केली तरी सब डि एफ ओ चौकशीचे नाटक करतो. फाईल महिनोन् महिने त्याच्या टेबलावर पडूनच राहाते.

नुकताच एक ट्रक शहादा डेपो येथे जमा झाला आहे. या भागातून लाकूड गेले. सागवानी लाकूड सर्रास जाते. पण मालकावर मात्र कारवाई नाही.

स्मगलर्स आदिवासींना डोक्यावरून वहाता येतील अशी लाकडे आणायला लावतात. बाजारभावात ज्याची किंमत चारशे रुपये असते, त्याकरता त्याच्या हातावर वीस रुपये ठेवतात, व दलाली स्मगलिंगमधून स्वतः हे लाकूड रु. २००/– धनफुटाने विकतात.

[पान १६ पहा

# लोकांचा सहभाग हवा : पण कसा ?

मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य. श्री. एस. बी. कुलकर्णी व वनसंरक्षक श्री. खेडकर यांची श्री. रमाकांत रामचंद्र यांनी घेतलेली ही मुलाखत.

प्रश्न : सामाजिक वनीकरणाचा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी कशाची गरज आहे ?

कुलकर्णी : हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी दोन गोष्टी पाळायला हव्यात. लागवडीच्या ठिकाणी गावकऱ्यांनी गुरे लावता कामा नये व आगी लागता कामा नये. पण या प्रश्नाच्या तपशीलात शिरायला तुम्ही ह्या खात्यालाच भेट देणे योग्य.

प्रश्न : वनीकरण करण्यासाठी व्यक्ती वा स्वयंसेवी संस्थांना पडिक जमीन देण्याची सुधारित योजना आहे. तिची अंमलबजावणी आपण कशी करणार ?

कुलकर्णी : या जमिनी देण्याबाबत दोन निकष लावावे लागतील. ज्या माणसांकडे व्यवस्थापन व आर्थिक क्षमता आहे अशांनाच ही जमीन वाटता येईल. मात्र अंगठा छाप खेड्यातील माणसांची हे काम करण्याची क्षमताच नसेल तर ते तरी काय करणार ? रोपे तयार करणे, लागवड, निंदण अशी सर्व कामे ते कशी काय संभाळणार ? त्याचा हेक्टरी जवळ जवळ ७॥ हजार खर्च येईल. तेव्हा साधारणपणे ७५–८० हजार रुपये बाळगणाराच हे काम अंगावर घेऊ शकेल.

प्रश्न : मग यातूनही श्रीमंतांनाच अधिक फायदा होइल व गरीब वगळले जातील असं नाही का होणार ? याकरता कमी जमीन तुम्ही नाही देऊ शकणार का ?

कुलकर्णी : कमीत कमी दहा हेक्टर जमीन ही मागणी लोकांतूनच आली आहे.

प्रश्न : या जमिनींकरता आजवर किती अर्ज आलेत व कशा प्रकारच्या व्यक्तींकडून आलेत ? यापैकी किती मंजूर झालेत ?

कुलकर्णी : आजवर ३०० अर्ज आले आहेत. त्यात ५०–१०० चांगली माणसं आहेत. म्हणजे सुशिक्षित डॉक्टर, इंजिनिअर इत्यादी. काही खाजगी कंपन्या आहेत.

प्रश्न : स्वयंसेवी संस्थांनी जर अशा प्रकारची मागणी केली तर त्याबाबत तुमचा दृष्टिकोण काय राहील ?

कुलकर्णी : अशा संस्थेला रोपं कशी तयार करावी याबाबत वगैरे आम्ही मार्गदर्शन करू. सामाजिक वनीकरण खात्याकडून रोपं मिळतीलही. आगीपासून व गुरांपासून त्यांचं रक्षण करावं लागेल. पण या अगोदर संस्थेने, आपल्याकडे व्यवस्थापन क्षमता आहे, आर्थिक क्षमता आहे हे सर्व पटवून द्यावं, तर आम्ही त्यांना रिकमेंडही करू.

प्रश्न : अभयारण्यांमुळे विस्थापित होणाऱ्या आदिवासींचा प्रश्न आपल्या खात्यातर्फे कसा हाताळला जातो ?

कुलकर्णी : आम्ही फक्त अभयारण्य अमुक ठिकाणी करणं योग्य होईल हे शासनाला कळवतो व शासनाने मंजुरी केल्यावर अभयारण्याची योजना राबवतो. पण आदिवासींचा प्रश्न तर महसूल खात्याकडे सोपवला जातो. जिल्हाधिकारीच लोकांना पर्यायी जमीन देतो.

प्रश्न : या विस्थापितांच्या पुर्नवसनाच्या आपल्या काही योजना, कामात सवलती वगैरे आहेत का ?

कुलकर्णी : नाही. धरणग्रस्तांच्या बाबतीत वगैरे असतात तशा पुनर्वसन विषयक आमच्या काही योजना नाहीत.

प्रश्न : आजकाल सर्वत्र मोठ्या प्रमाणावर जंगलतोड चाललेली आहे. याला प्रचंड औद्योगीकरणाइतकाच आदिवासी कारणीभूत आहे अशी ओरड होते. याबाबत तुमचा दृष्टिकोण काय ?

कुलकर्णी : अन्यधान्य, इंधन, निवारा याकरता आदिवासी जंगलावर अवलंबून राहातो. विदर्भातील निस्सार पद्धतीनुसार त्यांना या सवलती मिळत. पण आदिवासींच्या लोकसंख्येत भरमसाठ वाढ झाली व निस्तारासाठी राखलेली जंगलं संपुष्टात आली. मग महसूल खातं म्हणू लागलं आता इथं जंगलच शिल्लक नाही व जमीन अतिक्रमणाचा प्रश्न उभा झाला. आता तर आदिवासींचा दाब राखीव जंगलावरच येतो आहे. खरं तर या आदिवासींनीच सरकारला सांगायला हवं होतं की आता जंगल संपलय, लागवड करा. पण त्यांनी

तसं काही केलं नाही. आदिवासींचे जंगलनाशाचे मार्ग पण फार भयंकर आहेत. मोठमोठी झाडं ते करवा घेऊन जाळतात. करवा म्हणजे—झाडाच्या बुंध्याशीच एक मोठा छेद घेतात व अशी जंगलाच्या मध्यावरचीच झाडं साफ करून तेथे तुरबीर लावतात. ही जी सर्व तोड होते ती त्यांच्या स्वतःच्याच फायद्यासाठीच होते. तसेच धुळे नाशिक भागात तर आदिवासी रात्री केवढीतरी तोड करतात. व जवळच असलेल्या पुणे आग्रा रोडवर ती आणतात. ट्रकच्या ट्रक रस्त्याने जातात व जंगल साफ होतं.

आता एव्हरग्रीन फॉरेस्टमध्ये तर जंगल मारायची त्यांची वेगळीच पद्धत दिसते. मी ढेबेवाडीला गेलो होतो. तिथं तर हे लोक झाडाच्या पूर्ण फांद्याच तोडून टाकतात अन् मग एकदा झाड वाळलं की ते जाळून टाकून मग शेती करतात.

आता औद्योगिक कारणांकरता तोड होते. पण त्यातून लोकांना त्यांच्या गरजेच्याच वस्तू पुरविल्या जातात. इमारतींसाठी लाकूड मिळतं, लोकं पेपर वाचतात.

प्रश्न : आमचा प्रश्न असा आहे की लोकं आपापल्या गरजांमधून जंगलतोड करत असतात. महसुलाकरता खातं जंगल तोडतं, वा औद्योगीकरणामुळे व मोठमोठ्या प्रकल्पांमुळे जी जंगलतोड होते. या वेगवेगळ्या कारणांनी जंगल साफ होतच राहातं, तर यापैकी जंगलाचा नाश होण्याचे सर्वांत गंभीर कारण कुठले ?

कुळकर्णी : हे पाहा जेव्हा शास्त्रीयरीत्या तोड होते, तेव्हा त्याला आम्ही खरं तर तोड म्हणतच नाही. कारण आम्ही तोड करतो तशी लागवड पण करतोच.

प्रश्न : पण सर्वत्र तोड होते तेवढ्या प्रमाणात लागवड होतेच असं नाही.

कुळकर्णी : ज्यावेळेस आम्ही लागवड करतो तेव्हा हेक्टरी ३००० झाडे लावतो. मी तर असं म्हणेन की फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनने जो साग लावलाय त्यातून राष्ट्राला केवढं उत्पादन मिळतं. सागाचा आपण बाजार-भाव पाहिला तर एका स्क्वेअर घनफुटाला २००/– रु. पडतात, मात्र बेहडा, बिहडा जे आपण जंगल लावतो त्याला काहीच भाव येत नाही. ते नुस्तं जळाऊ लाकूड. एका मेट्रिक टनाला फक्त ५००/– रु. येतात.

तसंच धरणाखाली जे जंगल जातं त्याला आम्ही नुकसान म्हणणार नाही. कारण ज्या भागात पाणी जातं त्याचा उत्पादनावर केवढा तरी परिणाम होतोच. शिवाय हा झाला नॅशनल पॉलिसीचा विषय ! त्यांनी सांगायचं व आम्ही करायचं, एवढीच या संदर्भात राज्यसरकारची भूमिका असू शकते.

प्रश्न : जंगल जमिनीवरील अतिक्रमणे नियमित करण्यासंबंधीचा महाराष्ट्र सरकारच्या कायद्याच्या अंमल-बजावणीबाबत अनेक तक्रारी आहेत.

खेडकर : एकतर अतिक्रमणे कायदेशीर आहेत की नाही हे ठरवणे हाच खरा महत्त्वाचा मुद्दा आहे. तो तत्त्वतः मान्य केला व शासनाने जमीन देणार हे जरी जाहीर केलं तरी प्रत्यक्षात अतिक्रमण रीतसर व्हायला फार वेळ लागतो. लोकं अनेकदा नावंगावं बदलतात. दुसरीकडेच स्थायिक होतात. यासारख्या बारीकसारीक बाबी तपासून घ्याव्या लागत असल्यामुळे या सर्व प्रोसेसला फार वेळ लागतो त्याला इलाज नाही.

वनखात्यावर नेहमी आरोप होत असतो की जंगल कमीकमी होत गेलं त्याला खातंच जबाबदार आहे. पण खरं सांगायचं तर लोकांनी जंगलाचं उत्तरदायित्व कुठे घेतलं ? आता एक विचित्र पेच आमच्यापुढे आहे. पूर्वीसारखं लोकांना जंगल आपलसं वाटेनासं झालय. लोकांमधल्या जंगल बचावाच्या जुन्या परंपरा मोडीत निघाल्या आहेत. आणि लोकशिक्षणाची निकड आताच आम्हाला वाटते आहे. तर लोकांना इनव्हाल्व्ह करणं म्हणजे काय हा प्रश्न आम्हीच तुम्हाला विचारला पाहिजे.

...लोकांना सहभागी करण्यासंबंधाने आता निरीड या संस्थेचा पालघर तालुक्यातील अनौपचारिक शिक्षणा द्वारा सामाजिक वनीकरण व परिवर्तनाचा प्रयोग माझ्या डोळ्यांपुढे आहे. खात्याने या व अशा इतर प्रयोगाची दखल घ्यायला हवी.

खेडकर : मला तर वाटतं की लोकांनी निवडून दिलेले हे जे लोकप्रतिनीधी आहेत त्यांनी किमान १००० हेक्टर जंगल लावण्याची जबाबदारी घ्यावी. लोकांनीच त्यांना हे भाग पाडावं. लोकप्रतिनीधींनी आपली जबाब-दारी स्वीकारायला लावली नाही तर 'We will become experts in relief not in prevention.

प्रश्न : प्रिव्हेन्शनच्या संदर्भात जंगलसंरक्षणाबाबत तुमच्या काय योजना आहेत ?

खेडकर : आम्ही फार कडकपणे संरक्षणाचा मार्ग आखणार आहोत. पाण्याची पाइपलाइन, रस्ता, विजेची लाइनसुद्धा आम्ही जंगलातून जाऊ देत नाही. लोक आमच्यावर आरोप करतात की, तुम्हाला आदिवासींना मागासच ठेवायचे आहे. पण प्रत्येक गावात वीज/रस्ते आले म्हणजेच विकास झाला असे धरायचे का ? १५/२० कि.मी. चालणारा आदिवासी आता दोन दोन तास दोन किलोमीटर चालण्यासाठी बसची वाट पाहतो हा विकास समजायचा का ? एकादा जंगलात रस्ता झाला, वेगाने वाढणारी वाहने शिरली की जंगल सफाचाट होणार, या सर्वांचा चार काय चाळीस गार्डसही काहीच प्रतिकार करू शकणार नाहीत.

प्रश्न : आपण सर्वजण विकासाच्या सर्वच सोयींचा उपभोग घेतो आहोत, व जंगल रक्षणाकरता त्यांनी सर्व गोष्टींचा त्याग करावा यात विरोधाभास नाही का ?

खेडकर : ते खरं, मला दिसतं ते असं—आदिवासींची संस्कृती मोठ्या प्रमाणावर विघटित झालेली आहे. ही फार अस्वस्थ करणारी गोष्ट आहे.

कुळकर्णी : खरं तर या सगळ्यावर माझं म्हणणं असं आहे की, शेतांचे सर्व बांध आहेत त्यावर झाडं लावली पाहिजेत, हे शेतीवाडी करणारे लोक आहेत त्यांनाही सहभागी करून घेता यावं, तरच जमिनीचा ओल राहील. रशियाने असाच राष्ट्रीय कार्यक्रम हाती घेतला व तो यशस्वी करून दाखवला.

प्रश्न : या सर्व योजनांपासून स्थानिक माणूस येनकेन प्रकारेण आमच्याकडे वंचितच रहातोय त्याचं काय ?

खेडकर : आता जुनं जाउ द्या हो. ते आपण उगाळू नये. जंगल का गेलं, स्थानिक माणूस कसा डावलला गेला याची चर्चा नको. आता जमीन कशी वृक्षाच्छादित करायची हाच विचार.

या नव्या जंगलावर स्थानिक जनतेचा, गावाचाच पहिला हक्क राहिला पाहिजे. आमच्या नशिबाने अजून पॉइंट ऑफ नो रिटर्न आलेला नाही. पण आपण जर बेदरकारीत कारभार रेटीत राहिलो तर दहापंधरा वर्षात इथं वाळवंट होऊन जाईल.

पण आता जंगलाच्या बाबतीत उद्‌भवणारा प्रश्न हा की, आपण जी स्वतःची शेती, बाग करतो तिथं आपला स्वार्थ असतो. ही माझी जमीन हे फिलींग असतं पण जंगलची जमीन मात्र पोरकीच राहाते. अन् याकरता आता नुसत्या सरकारी खाक्याने काही हाती लागणार नाही, हे सत्य आहे. बाहेरींल जागृती व आमच्यात सरकारातच हळूहळू पडत चाललेला बदल या दोन्हींना एकत्र आणता आलं तरच काही प्रयत्न साध्य होतील.

●

पान १३ वरून ]

आहे तर केरळमध्ये २८·९९ टक्के आहे. भारतातील सर्वात जास्त वेस्ट लॅण्ड—पडीक जमीन असलेल्या तीन राज्यांत महाराष्ट्र एक आहे. झपाट्याने कमी होणाऱ्या जंगलामुळे पावसावर, नद्यांतील पाण्याच्या पुरवठ्यावर, भूगर्भातील पाण्याच्या पुरवठ्यावर परिणाम झाला आहे. दरसाली राज्यातील कुठल्याना कुठल्या जिल्ह्यात दुष्काळी परीस्थिती असतेच. बिहार, उत्तर प्रदेश, बंगाल ह्या राज्यांत गंगा, यमुनेसारख्या महानद्या आहेत, सुपीक काळ्या मातीचा भूभाग आहे. महाराष्ट्रासारख्या राज्याला खरे तर जंगलाच्छादित भूभाग व शेतीखालील भूभाग ह्यांच्यातील प्रमाण निश्चित करून, जंगलाच्छादित भूभागाचे निश्चित प्रमाण शाबूत राखणे अत्यंत गरजेचे आहे. महाराष्ट्र वननियोजनाचा प्रश्न शेतीव्यवस्थेच्या, जलसिंचनव्यवस्थेच्या व ग्रामीण लोकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. ह्याकडे डोळेझाक करून भागणार नाही.

---

पान १२ वरून ]

**जंगल संरक्षण की भक्षण ?**

जो ट्रक तोडणी, भरणी, वहातूक या सर्व खर्चासहित ८००० रुपयांत भरला जातो त्या मालाची खरी किंमत असते चाळीस हजार. पण जंगल संरक्षक अधिकाऱ्याचा आशीर्वाद असल्यावर भीती बाळगायचे कारण काय ?

याकरता आपल्या जंगलाचे संरक्षण आपणच करायचे आहे ही जाणीव आपणच आता मनाशी धरायची आहे. नुसत्या सभा मिटिंगा घेत फिरून काम भागायचे नाही, तर जंगल संरक्षणाच्या कमिट्या नेमायच्या आहेत. चिपको सारखे आंदोलन उभारायचे आहे. जिथे जिथे अशा प्रकारची जंगलतोड होते आहे त्या गावागावांतल्या तरुण तरुणींनी त्वरित आवाज उठवायला हवा आहे. जंगल परिषदेशी त्वरित संपर्क साधून साखळी जोडायला हवी आहे. शासनाने हवाई पेरणी करून फक्त ८% फायदा झाला आहे. आहे ते जंगल वाचविल्याने आपल्याच जीवात जीव येणार आहे.

●

# वननीती : एक प्राथमिक मसुदा

शरद कुलकर्णी

## पार्श्वभूमी

देशभरातील जंगलवासी व आदिवासींमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये वनविषयक धोरणाचा पुनर्विचार व्हावा या दृष्टीने विचारविनिमय सुरू होता. विशेषतः हिमालय भागातील पर्यावरणाच्या दृष्टीने संवेदनाशील भागांमध्ये पर्यावरण संतुलन राखण्याच्या उद्दिष्टाने वनसंवर्धन व वनरक्षण यांना प्रोत्साहन व अन्न, सरपण, चाराविषयक लोकांच्या गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीने वनविषयक धोरणाचा पुनर्विचार व्हावा असे या कार्यकर्त्यांचे सर्वसाधारण मत होते. १९८० च्या वनधोरण-विषयक मसुद्यामध्ये आदिवासींच्या जंगलविषयक हक्कांवर गदा आणण्याच्या तसेच जंगलांचे बेछुट व्यापारीकरण करणाऱ्या अनेक तरतुदी करण्यात आल्या होत्या. याविरुद्ध अनेक कार्यकर्ते एकत्र आले. या मसुद्यावर झालेली टीका व लोकजागृतीमुळे हा मसुदा संसदेत मांडण्यात आला नाही. या मर्यादित यशावर समाधान न मानता प्रचलित वनविषयक धोरण व त्याची अंमलबजावणी याचा अभ्यास व संशोधन त्यांनी सुरू ठेवले. विशेषतः १९८० नंतर पर्यावरण संतुलन रक्षणासंबंधी लोकजागृतीचे प्रयत्न सुरू झाले. केंद्रातील खात्यांच्या पुनर्रचनेनंतर वनखात्याचा समावेश पर्यावरण खात्यात करण्यात आला आहे. प्रतिवर्षी सुमारे ५० लाख एकर पडीक जमीन वृक्षावरणाखाली आणण्याच्या महत्त्वाकांक्षी योजनेसाठी सरकारने पडजमीन विकास मंडळाची रचना केली आहे.

या बदलत्या परिस्थितीत आदिवासी, जंगलवासीमध्ये काम करणाऱ्या देशभरातील निवडक २५ कार्यकर्त्यांची एक बैठक आदिवासी जाणीव जागृती केंद्राने १३–१५ डिसेंबर १९८५ च्या दरम्यान कशेळे, जि. रायगड येथे आयोजित केली. या बैठकीत पर्यायी वननीतीचे स्वरूप व वैशिष्ट्ये यांची चर्चा करण्यात आली. या चर्चे आधारे पर्यायी वनविषयक धोरणाचा मसुदा पुढीलप्रमाणे तयार करण्यात आला आहे. यावर कार्यकर्ते व तज्ज्ञांमध्ये व्यापक चर्चा व्हावी अशी अपेक्षा आहे.

## प्रास्ताविक

मोठ्या प्रमाणावरील बेछुट जंगलतोडीमुळे भारतातील पर्यावरण संतुलन पूर्णतः बिघडलेले आहे. पुरांमुळे होणारी प्रचंड हानी ही आता नित्याची बाब झाली आहे. कोट्यवधी रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या धरणांमध्ये गाळ साचल्यामुळे या धरणांपासून मिळणाऱ्या फायद्यांना जनतेस वंचित व्हावे लागत आहे. सरपणाच्या तुटवड्याचा प्रश्न आ वासून उभा आहे. सरपणाच्या तुटवड्यामुळे घरगुती वापरासाठी व विक्रीसाठी सरपण गोळा करण्यासाठी स्त्रिया व लहान मुले यांना कराव्या लागणाऱ्या कष्टांना परिसीमा नाही. अत्यावश्यक वनोत्पादनांच्या पुरवठ्यात घट होते आहे. दुसऱ्या बाजूला वनोत्पादनांची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढते आहे. कागदाचा खप दिवसेंदिवस वाढत आहे. कृत्रिम धाग्यांच्या उत्पादनात लगद्यासाठी लाकूड मोठ्या प्रमाणावर लागते. रॉकेलच्या सतत वाढणाऱ्या किंमतीमुळे ग्रामीण व शहरी भागातील गरिबांना सरपण म्हणून कोळसा व लाकडे यांचा वापर करणे भाग पडत आहे.

लाकूड तसेच वनोत्पादनांची वाढती मागणी व कमी कमी होणारा पुरवठा या पेचांतून मार्ग काढण्यासाठी सामाजिक वनीकरण प्रकल्पांना प्रोत्साहन दिले जात आहे. मात्र जंगलवासी आदिवासींच्या जंगलजमीन व वनोत्पादन यावरील हक्कांवर बंधने आणण्यात येत आहेत. जंगलांचे रक्षण करण्यासाठी निमलष्करी दले उभारण्यात येत आहेत. तसेच सार्वजनिक व खाजगी जंगलांवरील सरकारचे नियंत्रण अधिक कडक करण्यात येत आहे.

वनविषयक धोरण व त्याच्या अंमलबजावणीमध्ये मूलगामी बदल केल्याशिवाय सामाजिक वनीकरणासारखे प्रयत्न यशस्वी होणार नाहीत. वनसंवर्धन व वनरक्षण यात लोकांचा सहभाग वाढवू शकेल अशा खऱ्या अर्थाने सामाजिक वननीतीची आता गरज आहे. वनविद्या व वनरक्षणासाठी व्यापक लोकचळवळ उभारण्याची गरज आहे. वनसंवर्धन व वनरक्षण यांत लोकांचा सहभाग मिळविण्यासाठी लोकांच्या वनविषयक किमान गरजा पूर्ण करू शकणाऱ्या लोकाभिमुख वननीतीची तसेच वनव्यवस्थापनाच्या विकेन्द्रीकरणाची आवश्यकता आहे.

## वननीतीविषयक ठराव

ब्रिटिश सरकारने १९ ऑक्टोबर १८९४ च्या ठरावा-

द्वारे आपले वनविषयक धोरण स्पष्ट केले. यामध्ये जंगलांवर सरकारी नियंत्रण वाढविण्यावर व सरकारचे महसूल उत्पन्न वाढविण्यावर भर देण्यात आला होता. स्वातंत्र्योत्तर भारत सरकारने १९५२ च्या ठरावानुसार राष्ट्रीय वननीती जाहीर केली. यानंतर राज्यांच्या धोरणांमध्ये अनेक बदल झाले, लोकांच्या सामाजिक, आर्थिक परिस्थितीत बदल झाले. तसेच जंगलांचे प्रमाण व गुणवत्ता यामध्येही बदल झाले आहेत, यामुळे देशापुढील नवीन आव्हानांना सामोरे जाण्याचे दृष्टीने वननीतीचा पुनर्विचार होणे आवश्यक आहे.

**पर्यायी वननीतीची उद्दिष्टे**

पर्यायी वननीती प्रामुख्याने पुढील उद्दिष्टांवर आधारित असावी.

१. पर्यावरण रक्षण व पर्यावरण संतुलन.

२. जंगलात व आसपासच्या भागात राहणाऱ्या लोकांच्या सरपण, अन्न, चारा, खते, धागे, निवारा, वनौषधी याबाबतच्या गरजा भागविणे तसेच गौण वनोत्पादने गोळा करण्यास मुभा.

३. ग्रामीण व नागरी जनतेच्या सरपण, चारा व निवाराविषयक मूलभूत गरजा पूर्ण करणे.

४. वनरक्षण व वनसंवर्धनाचे कार्यक्रम व जंगलांवर आधारित लघुउद्योगांमध्ये योग्य मोबदला मिळवून देणाऱ्या रोजगाराच्या संधी स्थानिक जनतेस उपलब्ध करून देणे.

५. जंगलातील कच्च्या मालाच्या उद्योगांच्या गरजा पूर्ण करणे.

वरील उद्दिष्टांअगोदर जंगलापासून महसुली उत्पन्न मिळविण्यास प्राधान्य देण्यात येऊ नये. बहुसंख्य लोकांच्या चारा व सरपणविषयक गरजांकडे दुर्लक्ष करून सरकारचे हित म्हणजेच राष्ट्रीय हित असे समीकरण करणे मुळातच चुकीचे आहे.

**जंगलांचे वर्गीकरण**

**कुटुंबवने** ( Family Forests )

अन्न, सरपण, चारा, खते, वनौषधी याबाबतच्या स्थानिक जनतेच्या गरजा भागवू शकतील अशी झाडे पडीक जमिनीवर वाढविण्यास भूमिहिन व लहान शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यात यावे. खालील अटींवर पडीक जमिनी त्यांना देण्यात याव्यात.

( अ ) या झाडांपासून मिळणारी फुले, फळे, पाने यासारखी वनोत्पादने या कुटुंबांना मालकी हक्काने द्यावीत.

( ब ) या जमिनींवर झाडांची नोंद ठेवण्यात यावी.

( क ) विशिष्ट अधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीनेच झाडे तोडण्यात यावीत.

( ड ) ही जमीन अन्न अथवा नगदी पिकांच्या लागवडीसाठी वापरता येणार नाही.

स्थानिक लोकांच्या मूलभूत गरजा भागवणे, ग्रामीण भागातील गरिबांना स्वयंरोजगार पुरविणे व पडीक जमिनी वृक्षावरणाखाली आणणे हा कुटुंबवनांमागचा मूळ उद्देश आहे.

**ग्रामवने** ( Village Forests )

गावालगतच्या व कुटुंबवनांखाली न आलेल्या पडीक जमिनी वनपंचायतींचे संघटन करणाऱ्या ग्रामपंचायतींकडे सोपवून त्यावर झाडे वाढवू द्यावीत. या जमिनींवरील जंगलांचे संरक्षण व व्यवस्थापन ही वनपंचयतींची जबाबदारी राहील. गौण वनोत्पादने तसेच सरपण गोळा करून विकण्याचे हक्क वनपंचायतींना असतील. यापैकी निम्मे सरपण व वनोत्पादने गावकऱ्यांच्या वापरासाठी राखून ठेवण्यात येतील.

**नैसर्गिक वने** ( Natural Forests )

काही जुनी व नैसर्गिक जंगले जतन करण्यात येतील व नैसर्गिक जंगले म्हणून जाहीर करण्यात येतील. यापैकी काही जैविक राखीव जंगले ( Genetic Reserves ) म्हणून जतन करण्यात येतील व कोणत्याही स्वरूपाच्या मानवी अतिक्रमणापासून त्यांचे रक्षण करण्यात येईल.

जैविक जंगलाव्यतिरिक्त नैसर्गिक जंगलांमधून स्थानिक लोकांना लाकूडफाटा व खाली पडलेली पाने, फळे गोळा करता येतील.

नैसर्गिक जंगले उद्‌ध्वस्त करणाऱ्या पाटबंधारे, जलविद्युत व भव्य प्रकल्पांना प्रोत्साहन देण्यात येणार नाही.

या नैसर्गिक जंगलांचे व्यवस्थापन केन्द्रीय नैसर्गिक वनसंरक्षण मंडळाकडे सोपविण्यात येईल. वनविद्येतील तज्ज्ञ तसेच या जंगलांलगतच्या प्रदेशातील जनतेच्या प्रतिनिधींना या केंद्रीय मंडळावर सदस्य म्हणून नेमण्यात यावे. नैसर्गिक जंगलांवरील खाजगी मालकी हक्क जेथे अस्तित्वात असतील तेथे ते रद्द करण्यात येऊन सर्व

नैसर्गिक जंगलांवर राज्याची मालकी असावी व त्याचे व्यवस्थापन केंद्रीय मंडळाने करावे.

**राज्यवने** ( State Forests )

वरीलपैकी कोणत्याही वर्गात समावेश नसलेली जंगले **राज्यवने** म्हणून जाहीर करपयात येतील. या जंगलांचे व्यवस्थापन वनविभागाकडे सोपविण्यात येईल. लोकांच्या सरपण व चाऱ्याच्या गरजा भागविणे व उद्योगांच्या गरजा भागविणे हा या व्यवस्थापनामागचा प्रमुख उद्देश असेल.

या जंगलांचे व्यवस्थापन त्याचसाठी निर्माण केलेल्या जिल्हा वनपंचायतींकडे देण्यात यावे. लोकांच्या गरजा भागतील तसेच औद्योगिक उपयोगासाठी वनोत्पादने पुरविता येतील या उद्देशाने त्या त्या जिल्ह्यातील जंगलांचे संवर्धन व संरक्षण करणे हे जिल्हा वनपंचायतीचे कर्तव्य असेल.

प्रत्येक जिल्ह्यातील एकूण जमिनीपैकी किमान ५% जमीन राज्य वनांखाली असेल. आपल्या भागातील जंगलांमध्ये कोणती झाडे असावीत हे ठरविण्याचे अधिकार जिल्हा वनपंचायतींकडे असावेत. जंगलाच्या संवर्धन व उपयोगासंबंधीचे सर्व निर्णय 'कृती योजना' (Working Plan) म्हणून प्रसिद्ध करण्यात येतील व त्यांची कोणालाही तपासणी करता येईल. कृती योजना केवळ कार्यालयीन उपयोगासाठी ठेवण्याची प्रचलित प्रथा रद्द करण्यात यावी.

**वननीतीच्या अंमलबजावणीचे नियमन**

हस्तोद्योग लाकूडकामाव्यतिरिक्त सजावटीसाठी लाकडाचा उपयोग करण्यात उत्तेजन दिले जाणार नाही या दृष्टीने सर्व प्रयत्न करण्यात येतील. कागद, रेयॉन यासारख्या लाकडावर आधारित उत्पादनांची निर्मिती व उपयोग काटेकोरपणे नियंत्रित केला जाईल. वृत्तपत्रे व नियतकालिके यातील जाहिरातींच्या जागांचे विशिष्ट प्रमाण वेळोवेळी ठरविण्यात येईल.

मोठ्या उद्योगांना वनोत्पादने सवलतीच्या दरांवर पुरविण्यात येणार नाहीत. वनोत्पादनाचा उपयोग करण्यास स्थानिक लघुउद्योग व घरगुती उद्योगांना प्राधान्य देण्यात येईल. वनोत्पादनांवर प्रक्रिया करणारी केन्द्रे जंगलात अथवा आसपासच्या भागात चालविण्याचे प्रयत्न करण्यात येतील.

**गौण वनोत्पादने**

समाजाच्या दुर्बल वर्गातील लक्षावधी जंगलवासी गौण वनोत्पादने विकून उपजीविका करतात. गौण वनोत्पादनांचे उत्पादन वाढेल अशा प्रकारे वनसंवर्धन करण्यात आले पाहिजे. गौण वनोत्पादने गोळा करणे व त्यांची विक्री यासाठी काही नियम अंमलात आणावेत मात्र वनोत्पादनांच्या खरेदीसाठी लिलावाची पद्धत सोडून देण्यात यावी. काही महत्त्वाची गौण वनोत्पादने एकाधिकार पद्धतीने खरेदी करण्याचे हक्क आदिवासी विकास महामंडळ व वनविकास महामंडळाकडे देण्यात यावेत मात्र ही उत्पादने गोळा करणाऱ्यांकडून य मंडळांनी थेट खरेदी करावीत व व्यापाऱ्यांना आपले एजंट म्हणून नेमू नये. तसेच या उत्पादनांच्या खरेदीच्या किंमती योग्य रीतीने ठरविण्यात याव्यात व ही वनोत्पादने गोळा करण्याच्या हंगामाअगोदर या किंमती जाहीर करण्यात याव्यात.

जंगलभागालगतच्या प्रदेशात वनोत्पादने गोळा करणे व त्यावर प्रक्रिया करणे यासाठी सहकारी सोसायट्या स्थापन करण्यास उत्तेजन देण्यात येईल.

**शेतजमिनीवर वृक्ष लागवड**

शेतजमिनीमध्ये, विशेषतः शेतांच्या बांधावर तसेच रस्ते व कालव्यांच्या दुतर्फा झाडे वाढविण्यास उत्तेजन देण्याचे सर्व प्रयत्न करण्यात येतील. शेतकऱ्यांना बीबियाणे, रोपे तसेच शेतजमिनीवर नेहमीच्या पिकांवर परिणाम न होऊ देता झाडे कशी वाढविता येतील याविषयीची माहिती पुरविण्यात येईल.

रस्ते व कालव्याच्या दुतर्फा ग्रामपंचायतींनी वाढवलेल्या झाडासंबंधीचे हक्क ग्रामपंचायतींना देण्यात येतील.

**वन्यजीवन**

विशेषतः दुर्मिळ व कमी कमी होत चाललेल्या प्राणी जातींचे रक्षण करण्यासाठी प्रयत्न केले जातील. मात्र वन्यपशू अभयारण्ये व मोठमोठी राष्ट्रीय वनोद्याने यांमुळे स्थानिक लोक उपजीविकेच्या साधनांपासून वंचित होणार नाहीत अशी काळजी घेण्यात येईल.

**गुरचराईवर बंधने**

जंगलभागात विशेषतः राज्यवनांमध्ये गुरांना मुक्तपणे चरू देण्यावर निर्बंध घालण्याची वेळ आता आली आहे. गुरांना गोठ्यात चारा देणे व कुटुंब व ग्रामवनांमध्ये

उत्तम पोषणमूल्ये असलेले गवत/चाऱ्याची लागवड करण्यास प्रोत्साहन देण्याचे प्रयत्न करण्यात येतील. नैसर्गिक तसेच राज्यवनांमध्ये गुरांना चरण्यासाठी सोडता येणार नाही, मात्र या जंगलातून स्थानिक जनतेस गुरांसाठी चारा सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्यात येतील.

### स्थलांतरित शेतीवर निर्बंध

जंगलांचे नुकसान होऊ नये यासाठी स्थलांतरित शेतीच्या पद्धतीवर निर्बंध घालण्याची वेळ आली आहे. अशा प्रकारे शेती करणाऱ्यांना लागवडीयोग्य जमिनी देऊन सर्व प्रकारची मदत त्यांना केल्यास हे साध्य होऊ शकेल. ज्या जमिनींवर वृक्षावरण नाही मात्र ज्या वनजमिनी म्हणून दाखवण्यात आलेल्या आहेत अशा लागवडीयोग्य जमिनी स्थलांतरित शेती करणाऱ्यांना देण्यात येतील.

### वनप्रशासन

वनप्रशासनाचे आजचे निमलष्करी, अधिकारशाहीचे व प्रतिबंधात्मक स्वरूप बदलून ते अनेक राज्यातील शेतकी खात्याप्रमाणे लोकाभिमुख, सल्लागार म्हणून व सहभागी स्वरूपाचे करण्यासाठी वनप्रशासनाचा एकूण नूरच बदलावा लागेल. वनसंवर्धन, वनरक्षण व वनउपयोग यामध्ये वनखाते व वनअधिकारी हेच आता एकमेव निर्णयकर्ते नसतील या प्रक्रियेमध्ये सल्लागार म्हणून भूमिका ते बजावतील. जंगल उपभोगाच्या आपल्या योजना आता वनविकास महामंडळ लोकांसमोर ठेवेल. जंगलापासून अधिकाधिक महसूल मिळविणे हे उद्दिष्ट आता बाजूला पडून पर्यावरण संतुलन व लोकांच्या भूलभूत गरजा भागवणे हे आता प्रमुख उद्दिष्ट राहील. वनप्रशासनाचे विकेन्द्रीकरण करण्यात येऊन ते आता स्थानिक जनतेस जबाबदार राहील.

### वनसंशोधन

साग, निलगिरी व पाईन यासारख्या मूल्यवान प्रजाती लोकप्रिय करून उत्पन्न अधिकाधिक वाढविण्याच्या दृष्टिकोणातून वनविद्येतील आजवरचे संशोधन चालू आहे. या सर्व संशोधनातून सरपण पुरविणाऱ्या झाडांकडे दुर्लक्ष करण्यात आलेले आहे. जनतेच्या मुलभूत गरजा भागवू शकणाऱ्या स्थानिक लोकप्रिय झाडांची लागवड व वाढ अधिक चांगल्या प्रकारे कशी करता येईल यावर या संशोधनातून भर देण्याचे प्रयत्न करण्यात येतील. आतापर्यंतचे वनविद्येतील संशोधन प्रामुख्याने केवळ वनस्पतिशास्त्र व प्राणिशास्त्र या क्षेत्रापुरतेच मर्यादित राहिले आहे व जंगलवासियांच्या गरजा व त्यांचे जंगलांशी असणारे घनिष्ठ संबंध याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहेत. ही परिस्थिती आता बदलण्यात येईल.

### वनशिक्षण

आतापावेतो वनशिक्षणाची व्याप्ती केवळ वनखात्यातील अधिकारी/सेवकांच्या प्रशिक्षणापुरतीच मर्यादित आहे. हे बदलण्याची आता गरज आहे. आता वनसंवर्धन व वनरक्षण यात रस असलेल्या सर्वांना वनशिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून देण्यात येतील. वृक्षांच्या विविध जातीसंबंधीची उपयुक्त माहिती सोप्या-सुलभ, अतांत्रिक भाषेत लोकांना उपलब्ध करून देण्याची गरज आहे वनस्पतींची लॅटीन नावे वापरण्याच्या आग्रहामुळे वनस्पतींच्या विविध प्रजातीसंबंधीचे ज्ञान केवळ काही व्यक्तिपुरतेच मर्यादित राहिले आहे. तांत्रिक नावांबरोबरच वृक्षांची स्थानिक नावे वापरण्याची तसेच सर्व जिज्ञासूंना ही उपयुक्त माहिती उपलब्ध करून देण्याची गरज आहे. प्रसारमाध्यमे, दृक्श्रवणसाधने, प्रशिक्षणवर्ग याद्वारे वृक्षविषयक लोकजागृती करण्याची आवश्यकता आहे.

### वनविषयक कायदे

१९२७ मध्ये अंमलात आलेल्या भारतीय वनकायद्यानुसार वनप्रशासन/व्यवस्थापन करण्यात येते. पर्यावरण संतुलन व लोकांच्या गरजांविषयी केवळ तोंडी सहानुभूती दर्शवून राज्याचा महसूल अधिकाधिक वाढविणे हे ब्रिटिश राजवटीचे प्रमुख उद्दिष्ट होते. १९२७ च्या भारतीय वनकायद्याऐवजी आता एक सर्वसमावेशक/व्यापक वनकायदा अंमलात येईल. या कायद्यात पर्यावरण संतुलन व लोकांच्या मूलभूत गरजा भागविण्यावर भर देणाऱ्या राष्ट्रीय वननीतीचा पुरस्कार केलेला असेल. अधिकाधिक महसूल मिळविण्यासाठी जंगलांचा उपयोग करण्याऐवजी वनसंवर्धन व वनरक्षणास प्राधान्य देण्यात येईल. वनसंवर्धन व वन रक्षणाच्या कार्यक्रमातून लोकांच्या व्यापक सहभागास अधिकाधिक वाव देण्यात येईल.

अगोदर नमूद केल्याप्रमाणे वनव्यवस्थापनाचे विकेंद्रीकरण करण्यात येईल. केंद्रीय वनमंडळाची स्थापन

[ पान २४ पहा

# समाजपरिवर्तनासाठी सामाजिक वनीकरण

## शासकीय योजना व स्वयंसेवी संघटना

**विनोद सावे**
निरीड, पालघर

या लेखात सामाजिक वनीकरणाच्या शासकीय योजनेचे स्वरूप व मर्यादा यांची चर्चा आहे व सामाजिक वनीकरणाच्या योजनेत स्वयंसेवी संघटनांचा सहभाग वाढायला हवा असे प्रतिपादन आहे. पालघर तालुक्यातील ' निरीड ' या सामाजिक वनीकरणाद्वारे परिवर्तन करू इच्छिणाऱ्या संस्थेचा परिचय करून देण्यात आला आहे. विनोद सावे हे ' निरीड 'चे पूर्णवेळ कार्यकर्ते आहेत.

### जंगलांचा ऱ्हास

आपल्या देशातील जंगले ही शासकीय मालकीची आहेत व त्यांचे रक्षण करण्यासाठी शासनाचे स्वतंत्र वन-खाते आहे. या जंगलांनी समाजाच्या उपयोगासाठी लागणारी वनसंपत्ती लोकांना द्यावी अशी रास्त अपेक्षा आहे. समाजाच्या जंगलापासूनच्या गरजा इतक्या वाढल्या आहेत की, जंगले त्या गरजा भागविण्यास असमर्थ ठरत आहेत. शिवाय जंगले ही सर्वांची मालकी आहे, वनातून वस्तू आणण्याचा आपला हक्क आहे. त्याचा दुष्परिणाम म्हणून जंगलांचा दिवसेंदिवस ऱ्हास होत चालला आहे. खाजगी कंत्राटदार, सरकार आणि स्थानिक जनता अशा तीन प्रकारे जंगलतोड होत असते. शिवाय अचानक वणवा लागणे, किंवा शिकार करण्याच्या उद्देशाने, कोळसा मिळ-विण्याच्या उद्देशाने जंगलात आगी लावल्या जातात. तर नैसर्गिक आपत्ती, पूर, भूकंप-प्रदूषण, रोगराई आणि मोकाट सोडलेली गुरेढोरे या व अशा अनेक कारणांमुळे जंगले सपाट्याने नष्ट होत आहेत. यामध्ये उपजीविकेचे साधन म्हणून सरपणाला उपयोगी पडतील अशी छोटी छोटी लाकडे विकणारा व आपल्या लहानशा झोपडीसाठी थोडीफार लाकडे वापरणारा आदिवासी हा खाजगी कंत्राटाद्वारे होणाऱ्या प्रचंड जंगलतोडीच्या मानाने अगदीच क्षुल्लक जंगलतोड करत असतो. परंतु ओरड मात्र आदि-वासींच्याच नावाने होत असते. जंगलतोडीबद्दल वरून दडपण आल्यावर आदिवासींनाच दोष दिला जातो व त्यांचा खूप छळ होतो. उलट पैसेवाले पुढारी लोक कर्म-चाऱ्यांना हवा तसा पैसा चारून मन मानेल तशी जंगलाची लयलूट करतात शिवाय लाकूड तोडण्यासाठी म्हणून स्थानिक आदिवासींनाच कंत्राटदार लावीत असल्याने चोर आदिवासी ठरतो व केवळ पोटासाठी मजुरी म्हणून प्रत्यक्षात कंत्राटदाराचे काम करावे लागत असतानाही तोंच मार खातो त्यामुळे आजही खाकी ड्रेसवाला कोणी जंगलात दिसला तरी आदिवासी लोकांचा थरकाप होत असतो ही वस्तुस्थिती आहे.

### सामाजिक वनीकरण खाते

कारणे काही का असेनात जंगले नष्ट होण्याचा वेग मात्र प्रचंड वाढतच आहे. आणि जंगलाचा हा ऱ्हास थांबविणे शासनाच्या जंगलखात्याला केवळ अशक्यच आहे. मुळात ब्रिटिशांच्या काळापासून वनखात्याचे काम हे असलेली जंगले राखणे एवढेच आहे. यामुळे जंगलाच्या जागेव्यतिरिक्त मोकळ्या जागेत जंगले लावण्याचा प्रयत्न पूर्वीपासून केला जात नाही. त्यामुळे असलेली जंगले व्यवस्थित राखत येत नाहीत व नवीन नवीन ठिकाणी जंगले वाढविली जात नाहीत. अशा परिस्थितीत जंगले नष्ट होणे स्वाभाविकच आहे. शासनाच्या फार उशीरा ही गोष्ट लक्षात आल्यावर राखीव जंगल जमिनीवर ( Reserve Forest ) झाडे लावण्यास सुरुवात झाली. परंतु त्यामुळे काही विशेष फरक पडला नाही. थोडक्यात म्हणजे जंगलाव्यतिरिक्त जमिनीवर वनलागवड केल्याशिवाय गत्यंतरच नाही ही परिस्थिती निर्माण झाल्यावर ' सामाजिक वनीकरणाची ' कल्पना पुढे आली. वनखात्याच्या ताब्यात असलेल्या नियमित वनक्षेत्राच्या बाहेरील जमिनीवर वनाची लागवड करणे म्हणजे सामाजिक वनीकरण होय.

अलीकडे वर्तमानपत्रातून आफ्रिकेतील महाभयंकर दुष्काळी परिस्थितीचे वर्णन वाचावयास मिळते. आफ्रिकेतील या दुष्काळाचे मुख्य कारण हे या देशात झालेली भयंकर जंगलतोड होय. आणि अशी जर जंगलतोड होत राहिली तर आफ्रिकेतील भयंकर परिस्थिती आपल्याकडेही दिसू लागेल. यासाठी असलेली जंगले वाचावित, समाजाचा सहभाग जंगले वाढविण्यात व्हावा या हेतूने सामाजिक वनीकरणाची निर्मिती झाली आहे.

## महाराष्ट्रातील सामाजिक वनीकरण : स्वरूप व मर्यादा

महाराष्ट्र शासनाने १९८१ मध्ये सामाजिक वनीकरण खात्याची निर्मिती केली. अमेरिकन मदतनिधीने महाराष्ट्र शासनाला सामाजिक वनीकरण कार्यक्रम राबविण्यासाठी कमी व्याजदराने सुमारे २८ कोटी रु. चे कर्ज उपलब्ध करून दिले आहे.

या निधीद्वारे महाराष्ट्रात सामाजिक वनीकरण कार्यक्रम राबविण्यासाठी जिल्हास्तरावर एक उपसंचालक, त्यास मदतनीस म्हणून दोन सहाय्यक संचालक आणि प्रत्येक तालुक्यात एक असे एकूण १० वनरोपण अधिकारी, प्रत्येक वनरोपण अधिकाऱ्यास सहाय्यक म्हणून दोन सहाय्यक वनरोपण अधिकारी याप्रमाणे एकूण २० सहाय्यक वनरोपण अधिकारी असा एकूण ३३ अधिकाऱ्यांचा क्षेत्रीय समूह एका जिल्ह्यासाठी निर्माण करण्यात आला. एकूण ४३०० खेड्यांत ८१,००० हेक्टर क्षेत्रावर लागवड करण्याचे उद्दिष्ट ठरविले आहे. या खात्याच्या मालकीची अजिबात जमीन नाही. वनखात्याकडे २०% जागा आहे. उरलेल्या ८०% जागेवर या विभागास कार्यक्रम राबवायचा आहे. यासाठी गावातील ग्रामपंचायत व लोक या सर्वांना सहभागी करणे व त्यांना वनलागवडीस तयार करणे ही महत्त्वाची कामे ह्या खात्यास करावी लागतात.

सामाजिक वनीकरणास तयार होणाऱ्या ग्रामपंचायतीच्या गुरचरण जमिनीत जमिनीच्या मगदुराप्रमाणे झाडे लावण्याचा कार्यक्रम ठरविला जातो व सुमारे ३ वर्षेपर्यंत सामाजिक वनीकरण खाते त्यावर खर्च करते. त्यानंतर सदर जमीन ग्रामपंचायतीकडे सोपविली जाते. रेल्वेच्या भोवताली, रस्त्याच्या दुतर्फा, नदी– नाले– कालव्यांच्या काठी, गावठाण भाग इत्यादी ठिकाणी झाडे लावण्यासाठी सुद्धा ३ वर्षेपर्यंत जमिनीच्या मगदुराप्रमाणे कार्यक्रम ठरवून त्यावर ह्या खात्यातर्फे खर्च होतो. व्यक्तिगत लाभार्थ्यांकडे सुद्धा ह्या खात्यातर्फे वनलागवड कार्यक्रम घेतला जातो व देखभालीसाठी त्या लाभार्थ्याला ह्या खात्यातर्फे आर्थिक लाभही दिला जातो.

## लोकांचा सहभाग कसा मिळणार ?

या सर्वांत महत्त्वाचे म्हणजे गावातील खाजगी व्यक्तींना कार्यप्रवृत्त करून त्यांच्या खाजगी जमिनीवर झाडे लागवडीस त्यांना आर्थिक, तांत्रिक साहाय्य व ज्ञान देणे हे होय. महाराष्ट्र सामाजिक वनीकरण खात्याने ठरविलेल्या एकूण ८१,००० हेक्टर क्षेत्रातील वनलागवडीपैकी सुमारे ३८००० हेक्टर क्षेत्र म्हणजे ४८ टक्के लक्ष हे ह्या खाजगी जमीन मालकाच्या जमिनीवर वनलागवड करण्याचे आहे. आणि हेच महत्त्वाचे कार्य सफल झाल्यास मोठ्या प्रमाणात वनलागवड साध्य होणार आहे. परंतु हे काम वाटते तितके सोपे नाही. त्यासाठी लोकांच्या सतत संपर्कात राहणे हे महत्त्वाचे आहे. लोकांना वनलागवडीस तयार करण्यासाठी काळवेळेचे बंधन न पाळता त्यांच्याशी संपर्क साधणे फारच आवश्यक आहे. परंतु शासनाचे कर्मचारी हे दिवसभरातील व ठरविलेल्या वेळेतच लोकांकडे जातात. शिवाय आपली नोकरी बजवावयाची म्हणून हे काम करीत असल्याने लोकांशी संपर्क साधून त्यांना तयार करणे कठीणच जाते. जोपर्यंत ह्या कार्यक्रमावर व कार्यक्रम राबविणाऱ्या यंत्रणेवर लोकांचा विश्वास बसत नाही तोपर्यंत वनीकरणात लोकांचा सक्रिय सहभाग मिळणे अशक्य आहे. आणि जर लोकांचा सक्रिय सहभाग मिळाला नाही तर कार्यक्रम यशस्वी होणे अशक्य आहे.

मुळात ग्रामीण लोकांचा वनखात्याच्या कर्मचाऱ्यांबद्दलचा व एकूणच सरकारी कर्मचाऱ्यांबद्दलचा अनुभव वाईट असतो. कारण नेहमीच ह्या ग्रामीण जनतेची फसवणूक झालेली आहे. यामुळे बाहेरून कोणी नवीन माणूस आला तर हे लोक एकतर घाबरतात तरी किंवा चिडून उठतात. प्रत्यक्ष आम्हालाही पुष्कळ गावात सुरुवातीला असे अनुभव आले आहेत. व प्रसंगी मार खाण्याचीसुद्धा वेळ आमच्यावर आली आहे. अर्थात सर्वच सरकारी माणसे वाईट असतात किंवा लोकांची फसवणूक करतात असे नाही. परंतु लोकांचा एकंदरीत तसा ग्रह झालेला असतो. यामुळे लोकांचा विश्वास संपादन

पान २६ पहा.

# राष्ट्रीय पडीक जमीन विकास मंडळ

राष्ट्रीय व पडीक जमीन विकास मंडळाचे प्रमुख ध्येय देशातील पडीक जमीन उत्पादक उपयोगात आणण्यासाठी सामूहिक कार्यक्रमाद्वारे झाडे लागवड आणि वनीकरण करणे हे आहे. हे ध्येय पूर्ण करण्यासाठी हे मंडळ इतर गोष्टींबरोबर अशासकीय संघटनांना प्रोत्साहन देऊन आर्थिक सहाय्य करील. सेवाभावी संस्था पडीक जमिनीचा विकास करण्यात विविध प्रकारे मोलाची भर घालीत आहेत हे आता सर्वांनाच विदित झाले आहे. त्यांच्याकडे विविध शक्ती आहे. त्यांचा सामान्य लोकांशी चांगला संबंध असतो व त्यांचे कार्यकर्ते बहुधा ध्येयप्रेरित असतात. बऱ्याच ठिकाणी खेड्यातील जमिनीवर गावकऱ्यांच्या सहाय्याने जंगलवाढ करण्यात अशा संस्था यशस्वी झाल्या आहेत. आणि शासकीय यंत्रणेने दर हेक्टरी वनीकरणासाठी केलेल्या खर्चापेक्षा बऱ्याच कमी खर्चात हे करण्यात आलेले आहे. या कारणामुळे राष्ट्रीय पडीक जमीन मंडळ अशासकीय संस्थेचे सहाय्य पडीक जमीन विकास योजनेत घेऊ इच्छीत आहे.

( १ ) यापूर्वी मंडळाने राज्यशासनाकडे सेवाभावी संस्थांना पडीक जमीन विकास योजनेमध्ये विविध गोष्टींत सहभागी करून घेण्याविषयी शिफारस केलेली आहे यामध्ये जमिनीची निवड करणे, गावकऱ्यांना पडीक जमीन विकास कार्यात सहभागी होण्यास प्रवृत्त करणे, गावकऱ्यांना झाडे लागवडीसाठी जमिनीचा हक्क मिळवून देण्यात मदत करणे, बँकेचे सहाय्य मिळवून देणे, झाडे लागवडीच्या कार्याचा विकास करणे व त्यासंबंधी प्रशिक्षण देणे इ. गोष्टींचा समावेश होतो.

तसेच सेवाभावी संस्थांना पडीक जमीन विकास संबंधीच्या राज्य पातळीवरील, गटपातळीवरील कमिटीवर घ्यावे अशी विनंती राज्यसरकारला करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे या कार्यासाठी अनुदानाची तरतूद, जमिनीचे हस्तांतरण किंवा मुदत करार ही कामे सहानुभूतिपूर्वक व त्वरित व्हावीत यासाठी राज्यसरकारला विनंती करण्यात आलेली आहे.

( २ ) सेवाभावी संस्थांपैकी काही गटांनी वृक्ष लागवडीसाठी लक्षणीय कामगिरी बजावली आहे तसेच त्यांच्याकडे त्यांचे उपक्रम व कार्य विस्तारित करण्यासाठी जिल्ह्यात व जिल्ह्याबाहेर कार्यकर्त्यांची अंतर्गत यंत्रणा आहे. याशिवाय अशा काही वाढत असलेल्या संस्था आहेत आणि लहान संस्था आहेत की त्यांच्याकडे कार्यप्रवृत्ती व आदर्शवाद आहे. परंतु अशा संस्थांकडे शासनाचे पुरेसे लक्ष गेलेले नाही. कारण त्यांच्याकडे आर्थिक तरतूद नाही आणि त्यांचा आवाका लहान आहे किंवा त्यांनी अलिकडच्या काळातच कार्याला सुरुवातच केली आहे. राष्ट्रीय पडीक जमीन विकास मंडळ लहान आणि मोठ्या सेवाभावी संस्थांना अशा कार्यात आर्थिक सहाय्य करून प्रोत्साहन देईल.

( येथून पुढे राष्ट्रीय पडीक जमीन विकास मंडळास ' मंडळ ' या संज्ञेने उल्लेखिले आहे. )

( ३ ) मंडळ खालील प्रकारच्या संस्थांचा आर्थिक मदतीसाठी विचार करील– ( अ ) त्या विना–फायदा तत्त्वाच्या संघटना असाव्यात ( ब ) त्या सामाजिक, सहकारी किंवा पब्लिक ट्रस्ट अशा रजिस्टर्ड असाव्यात ( क ) त्या मान्यताप्राप्त शाळा, महाविद्यालये, विश्वविद्यालये यांपैकी असाव्यात. ( ड ) फक्त अपवादात्मक बाबतीत नोंदणी नसलेल्या संस्थांना अगर व्यक्तींना झाडे लागवडीसाठी अनावर्ती अनुदान देण्यात येईल.

( ४ ) सामान्यतः पडीक जमिनीवरील वनीकरणापाशी प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष संबंधित बाबींनाच आर्थिक सहाय्य देण्यात येईल. यात वनीकरणाची तयारी सुकर करणे, प्रशिक्षण शिबिरे आयोजित करणे, पडीक जमीन वापरासंबंधी चर्चासत्रे आयोजित करणे आणि कार्यमूल्यमापनाचा अभ्यास इत्यादी गोष्टींचा समावेश आहे. मंडळ खालील गोष्टींना प्राधान्य देईल– ( अ ) रोपवाटिका तयार करणे आणि रोपे वाटणे. ( आ ) वनीकरण आणि कुरण कार्यक्रम लोकांच्या सहभागाने करणे आणि झाडे

पट्टा योजना ( इ ) लागवडीखाली आणण्याजोग्या जमिनीचा विकास किंवा पाणी साठ्याने, खारेपणाने, माती वाहून गेल्याने पुराने नुकसान झालेल्या जमिनीची दुरुस्ती करणे.

( ५ ) सेवाभावी संस्थांकडून आर्थिक सहाय्य मागणीसाठी आलेल्या प्रस्तावाचा तपासणीसाठी व मूल्यमापन करून मान्य करण्यासाठी मंडळ एक यंत्रणा उभारील. हे मंडळ सेवाभावी संस्थेने पूर्वी केलेल्या कार्याचा अभ्यास करण्यासाठी तज्ज्ञ नेमील अथवा अशा संस्थांबरोबर त्यांच्या अनुदानविषयक गरजांविषयी चर्चा करील, सभा आयोजित करील.

( ६ ) प्रस्ताव सादर करण्याचा नमुना जरी तयार केला नसला तरी प्रस्ताव स्वयंपूर्ण असावा अशी अपेक्षा आहे. त्यात संस्थेचा कायदेशीर दर्जा, कार्यकारिणी व तिचा पूर्वानुभव तसेच अलिकडच्या कार्याचा वार्षिक अहवाल यांचा समावेश असावा. तसेच पूर्वी संस्थेने कार्यान्वित केलेल्या सामाजिक वनीकरणाच्या आणि इतर प्रकल्पांची त्यात माहिती असावी. सदर प्रस्तावात दिलेल्या खर्चाची आखणी, त्याची विभागणी, जमिनीची उपलब्धता, आणि रोपांचा आणि इतर संबंधित बाबींचा पुरवठा याविषयी माहिती असावी तसेच एन. आर. इ. पी; आर. एल. इ. जी. पी. आणि बँक सहाय्य इत्यादींचा उपयोग करण्याविषयी उल्लेख करण्यास हरकत नाही.

( ७ ) मंडळ अग्रदानाचे हप्ते मंजूर करण्याविषयी सवलतीचे धोरण स्वीकारील परंतु प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कार्यान्वित होण्यावर मंडळ भर देईल.

पान २० वरून

करण्यात येईल व त्यात केंद्र सरकारातील वनअधिकारी राज्य सरकारातील वनअधिकारी तसेच वनसंवर्धन व वनरक्षणाच्या क्षेत्रात काम करणारे समाज कार्यकर्ते व तज्ज्ञ यांचा समावेश असेल. हे मंडळ पर्यावरण मंत्रालयास जबाबदार असेल. या मंडळाचे निर्णय कोणतीही गुप्तता न राखता वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येतील. वने व वनविद्या हा केवळ काही स्वयंमन्य व लठ्ठ पगारदार अधिकाऱ्यांचे राजकीयक्षेत्र म्हणून न राहता तो लोकांच्या जिव्हाळ्याचा विषय बनेल.

अनुवाद : सुधीर जोग

# पडीक जंगल जमिनींवर व्यक्ती व स्वयंसेवी संस्था यांच्यामार्फत वनीकरण योजना

**ठराव**

( अ ) पडिक जमीन विशेषतः उजाड टेकड्या यावर वनसंवर्धन करण्याची एक योजना १९७७ सालापासून अस्तित्वात आहे. परंतु या योजनेला फारसा प्रतिसाद मिळाला नाही त्यामुळे ती सुधारून व अधिक आकर्षक करून खाजगी व्यक्ती व स्वयंसंस्था यांना पडिक सरकारी जमिनीवर झाडे लावण्यास उद्युक्त करावे असा सरकारचा विचार चालू होता. त्यानुसार सरकारने ही योजना सुधारलेली आहे. ह्या योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे —

( १ ) या योजनेचे मुख्य उद्दिष्ट सरकारला उत्पन्न मिळविणे हे नसून पडीक जंगल जमिनीवर वृक्ष संवर्धन करून पर्यावरणात सुधारणा घडवून आणणे आणि वनोत्पादित उत्पादन वाढविणे हा आहे.

( २ ) नोंदणी झालेल्या शैक्षणिक तसेच इतर संस्था औद्योगिक संस्था, व्यक्ती या योजनेत भाग घेऊ शकतील. मात्र वनोत्पादित मालावर आधारलेल्या उद्योगधंद्याला त्याला लागणारा कच्चा माल निर्माण करण्यासाठी या योजनेचा लाभ घेता येणार नाही.

( ३ ) ह्या योजनेखाली किमान १० हेक्टर पडिक जंगल जमीन भाडेपट्ट्याने देता येईल. मात्र हे प्रमाण ठरविताना संस्थेच्या, व्यक्तीच्या आर्थिक व व्यवस्थापनीय कुवतीचा विचार केला जाईल. या जमिनीचा उपयोग वृक्षसंवर्धनासाठी आणि चारा वाढविण्यासाठी करता येईल. मात्र शेती तसेच खाणकामासाठी तिचा उपयोग करता येणार नाही.

(४) भाडेपट्ट्याची मुदत ३० वर्षे असेल आणि सरकारच्या निर्णयाप्रमाणे ती आणखी ३० वर्षांपर्यंत वाढविता येईल. अशी जमीन पोटभाडेपट्ट्याने देता येणार नाही.

(५) भाडेधारकाला, दर हेक्टरी ४०० झाडे, जमीन ताब्यात मिळाल्यापासून ५ वर्षांच्या आत लावावी लागतील.

(६) झाडांपासून वेळोवेळी मिळणारे, तसेच अंतिम उत्पादन पट्टेधारकाच्या मालकीचे होईल. मात्र त्यापैकी २० टक्के माल स्थानिक 'निस्तार' हक्कधारकांना जिल्हाधिकाऱ्याने ठरवून दिलेल्या किंमतीत द्यावा लागेल. तसेच दरवर्षी ग्रामपंचायतीला ठरवून दिलेला चारा विनामूल्य द्यावा लागेल. या जमिनीचे नाममात्र भाडे म्हणून दरसाल दर हेक्टरी रु. १– शुल्क द्यावे लागेल.

(७) भाडेकराराने दिलेली जमीन सार्वजनिक कामासाठी कराराची मुदत संपण्यापूर्वी सरकारला घेता येईल. परंतु त्यासाठी ३ महिन्यांची पूर्वसूचना द्यावी लागेल. तसेच भाडेधारकाने वनसंवर्धन व अनुषंगिक कामावर केलेल्या खर्चाबद्दल योग्य ती नुकसान भरपाई द्यावी लागेल.

(ब) सुधारित योजनेच्या निश्चित अटी व नियम भाडेपट्ट्याच्या मसुद्यात दिलेल्या आहेत.

(क) जुलै १९७७ च्या जुन्या योजनेऐवजी ही नवीन योजना तावडतोब कार्यवाहीत येईल आणि त्या संबंधीचे अर्ज-प्रमुख वनसंरक्षक (उत्पादन), महाराष्ट्र राज्य, पुणे हे स्वीकारतील आणि त्यांच्या शिफारशींसह सरकारला सादर करतील.

(मूळ सरकारी ठरावाचा सारांश)



पुस्तक परीक्षण

# पर्यावरणाची दशा व दिशा

**प्रकाश गोळे**
१ ब, अभिमान श्री सोसायटी
पुणे ४११००८

(भारत १९८४-८५)

दिल्लीच्या सेंटर फॉर सायन्स ॲंड एन्व्हायर्नमेन्ट या संस्थेने "दी स्टेट ऑफ इंडियाज एनव्हायर्नमेन्ट १९८४ ८५" हा अहवाल अलीकडे प्रसिद्ध केला आहे. अशा प्रकारचा त्यांनी प्रकाशित केलेला हा दुसरा अहवाल. यापूर्वीच्या अहवालात १९८२ पर्यंतची परिस्थिती आली होती. सरकारच्या योजना आणि धोरणे यांचे नागरिकांनी केलेले मूल्यमापन असे या अहवालाचे स्वरूप असले तरी ते करताना केवळ आर्थिक, तांत्रिक व सामाजिक असा विचार केलेला नाही. सरकारी योजनांमुळे निर्माण झालेले पर्यावरणाचे प्रश्न, त्या धोरणांचा देशातील निसर्गसंपत्तीवर झालेला परिणाम आणि समाजातील निरनिराळ्या थरांना भोगावे लागलेले परिणाम, यांची चर्चा या अहवालामध्ये केलेली आढळते, पर्यावरणाच्या संदर्भात एवढी विस्तृत व तपशीलवार चर्चा या आधी झाली नसावी. या अहवालाचे हे एक प्रमुख वैशिष्ट्य होय.

## विषमतेची दरी रुंदावतेच आहे

भूमी, पाणी, वातावरण, ऊर्जा, निवासयोग्य जागा, लोकस्थिती, वने, धरणे, प्राणीजगत वगैरे प्रकरणांमध्ये विषयाची विभागणी करण्यात आलेली आहे. या प्रकरणांतून संपादकांनी एक गोष्ट मोठ्या प्रभावीपणे पुढे मांडलेली आहे. ती ही की आजवरच्या कोणत्याही सरकारी योजनेचा परिणाम म्हणजे पर्यावरणाचे दूषितीकरण, निसर्ग-संपत्तीचा

पान २९ पहा

पान २२ वरून

करणे, लोकांना तयार करणे व लोकांचे सहकार्य मिळवणे ह्या गोष्टी सहजासहजी व कमी वेळेत साध्य होणे कठीण आहे. सामाजिक वनीकरण खात्यातर्फे झाडे लावणे हेच उद्दिष्ट ठरविले गेले आहे. याउलट समाजसेवी संस्था ह्या विशिष्ट ध्येय ठरवून कार्य करीत असतात. सामाजिक संस्था ह्या झाडे लावण्याअगोदर समाजाच्या अंतर्मनाला भिडू शकतात. कारण त्यांच्यासमोर झाडे लागवडीपेक्षाही माणूस कसा उभा राहील हेच उद्दिष्ट असते.

सामाजिक वनीकरण हा जनतेचा कार्यक्रम असून जनतेचा सहभाग आणि सहकार्य हा या कार्यक्रमाचा आत्मा आहे. जनतेने, जनतेचे, जनतेसाठी करावयाचे वनीकरण याला सामाजिक वनीकरण म्हणणे हे खऱ्या अर्थाने संयुक्तिक ठरते. परंतु केवळ झाडे लावणे एवढेच उद्दिष्ट घेऊन जनतेसमोर गेल्यास त्यांचा विश्वास संपादन करून त्यांचे सहकार्य मिळवणे सामाजिक वनीकरण खात्याला सहज सोपे जाणार नाही. याउलट सामाजिक संस्थांनी पुढे येऊन जर सामाजिक वनीकरणाचे काम करण्याचे ठरविले तर त्यांना सरकारपेक्षा जास्त प्रतिसाद मिळेल. कारण केवळ झाडे लावली गेली पाहिजेत हेच उद्दिष्ट न ठेवता संपूर्ण समाजाशी तनाने, मनाने पूर्णपणे एकरूप होऊन त्यांच्या अंतर्मनाला भिडण्याची शक्ती सेवाभावी सामाजिक संस्थांच्या कार्यकर्त्यांमध्ये असते. समाजसुधारणेसाठी सामाजिक वनीकरण हा कार्यक्रम घेऊन लोकांकडे गेल्यास त्यांचा उत्तम प्रतिसाद सामाजिक संस्थांना मिळेल यात काही शंकाच नाही.

वृक्षसंहार ही इतकी गंभीर समस्या होऊन बसली आहे की, केवळ वनखाते, सामाजिक वनीकरण खाते या शासनाच्या दोन्ही खात्यांनी कितीही प्रयत्न केले तरीही ह्या गंभीर समस्येतून देशाची सुटका होणे शक्य नाही. यासाठी मोठ्या प्रमाणात समाजपरिवर्तन घडवून आणणे हे महत्त्वाचे काम आहे. व समाजपरिवर्तनाचे कार्य हे सामाजिक संस्थांइतके प्रभावीपणे दुसरे कोणीही करू शकणार नाही. यासाठी सरकार बरोबरच तुम्हीआम्ही सर्वांनीच समाजातील सर्व जाणकार लोकांनी पुढे येऊन याचा विचार केला पाहिजे व कामाला लागले पाहिजे. अन्यथा सर्वनाश ठरलेला आहे.

### सामाजिक चळवळीचे महत्त्व

'Social Foresty with Social Action' सामाजिक चळवळीद्वारे सामाजिक वनलागवड कार्यक्रम राबविण्याचे काम सामाजिक संस्थांनी करावयास हवे. कोणतेही सामाजिक काम हे एकट्यादुकट्याने किंवा ५–१० लोकांद्वारे यशस्वी होऊ शकत नाही. तर लोकांची मोठ्या प्रमाणात चळवळ उभी केल्यास कोणतेही काम खऱ्या अर्थाने यशस्वी होते. एखादे काम जास्त मजूर लावून झटपट करता येते परंतु गावकरी त्या कामाकडे तटस्थ भावनेनेच पाहणार. याउलट तेच काम गावकऱ्यांच्या सहकार्याने केल्यास लोकांना त्या कामाबद्दल आत्मीयता वाटते. हे काम आम्ही स्वतः केलंय अशी भावना लोकांची होते. आणि जेव्हा एखाद्या कामाबद्दल आत्मीयता वाटते तेव्हाच ते काम टिकते. थोडक्यात म्हणजे लोकांची चळवळ उभी करून सामाजिक वनीकरणाचे काम करावयास घेतल्यास लोकांचा विश्वास संपादन होऊन लोकांचे सहकार्य मिळेल व कार्यक्रम यशस्वी होईल. यामुळे सामाजिक संस्थांना या कार्यात भरपूर वाव आहे.

### नाण्याची उलटी बाजू

आपण दरवेळेस पाहतो की, देशात हरितक्रांती झाली, भरपूर धान्योत्पादन झाले, औद्योगिक भरभराट झाली, गावोगावी वीज आली, रेडिओ, दूरदर्शनसंच आले, रस्ते, मोटारवाहने आली, प्रत्येक पंचवार्षिक योजनेत देशाच्या विकासाचा वेग २–३ टक्के ने का होईना वाढत आहे आणि देश आता कॉम्प्युटर युगात प्रवेश करण्याच्या धडपडीत आहे. हे सर्व खरे आहे परंतु त्याचबरोबर खालील गोष्टीसुद्धा खऱ्या आहेत. दरवर्षी दुष्काळ, अतिवर्षण, पाणी नसल्याने नदीनाले व पिके सुकणे, महापुरांमुळे डोंगरदऱ्या खचणे, कोसळणे, झाडे, पिके, घरेदारे, गुरेढोरे, माणसे वाहून जाणे, दरवर्षी रोगराई वाढणे, दारिद्र्य वाढणे, अशिक्षितांची बेकारी तर वाढतेच परंतु सुशिक्षितांची बेकारीसुद्धा वाढते आहे. सर्वत्र भ्रष्टाचार वाढतो आहे. शिक्षणसंस्थेतसुद्धा राजकारण्याद्वारे प्रचंड भ्रष्टाचार सुरू आहे. देशातील कोणत्याही सार्वजनिक संस्थांमध्ये स्वायत्तता राहिलेली नाही. यामुळे राजकारणावर सुद्धा लोकांचा विश्वास राहिलेला नाही.

### विकासाचा लाभ सामान्य माणसाला मिळाला का?

मुठभर श्रीमंत लोकांनीच विकासाचा व देशाच्या

विविध योजनांचा लाभ उठविला आहे. शेतीमध्ये नवीन प्रयोग होऊन हरितक्रांती झाल्याचा दावा करण्यात आला. परंतु ज्यांच्याकडे जमीन व पैसा उपलब्ध होता त्यांनीच हे प्रयोग केले. औद्योगीकरणाचा लाभही भांडवलदारांनीच उठवला. सर्वत्र विकासाच्या कार्यक्रमात अशी वस्तुस्थिती आहे की, सामान्य लोकांकडे असे कार्यक्रम पोहोचतच नाहीत. देशाच्या राजधानीत योजनांचा आराखडा तयार करून नतर त्या केंद्रीय पातळीवर राबवून देशाचा सर्वांगीण विकास साधणे शक्य नाही. उलट लोकांचा विश्वास संपादन करून लोकांच्या सहकार्याने योजनांचा आराखडा गावातच तयार करून नंतर तो गावपातळीवर लोकांची चळवळ बांधून राबविल्यासच विकासाच्या योजना यशस्वी होतील व खऱ्या अर्थाने देशाचा विकास होईल.

## निरीड संस्था

देशाच्या विकासाच्या कामाला समाजाच्या तळागाळातील लोकांपासूनच सुरुवात केली पाहिजे. त्यांचा सर्वांगीण विकास झाल्यासच देशाचा विकास होईल ह्या प्रेरणेने निरीड संस्थेने चार वर्षांपूर्वी पालघर तालुक्यात कामास सुरुवात केली. येथील आदिवासी हा अत्यंत मागासलेला आहे. त्यांचा सर्वांगीण विकास करण्याचे काम निरीडने हाती घेतले आहे. त्यासाठी अनौपचारिक शिक्षण व सामाजिक वनीकरण हे दोन कार्यक्रम निश्चित केले आहेत. ह्या दोन्ही कार्यक्रमांद्वारे आदिवासींच्या जीवनात सुयोग्य परिवर्तन घडेल असा आत्मविश्वास निरीड संस्थेला वाटतो.

सामाजिक वनीकरणाद्वारे जंगल संपत्ती तर वाढेलच परंतु आदिवासींचा वैयक्तिक फायदाही होईल. या अनुषंगाने संस्थेने सामाजिक वनीकरणाचा एक कार्यक्रम तयार करून तो येथील आदिवासींमध्ये राबविण्यास सुरुवात केली आहे. येथील बऱ्याच आदिवासींकडे शेतजमीन व गवती पडीक जमिनी आहेत. परंतु आर्थिक दारिद्र्यामुळे ह्या शेतजमिनींचा पुरेपूर लाभ ते घेऊ शकत नाहीत. शिवाय येथे मनुष्यबळही मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे, परंतु त्याचा वापर योग्य कामासाठी होत नाही. अशा ह्या गवती जमिनीवर, शेताच्या बांधावर व परसात झपाट्याने वाढणारे व पाच वर्षांत तयार होणारे उंच व सरळ जाणारे असे सुरू, सुबाबुळ, निलगिरी, अकेशिया, बांबू यासारखे वृक्ष एकरी १००० लावता येतात. पाच वर्षांत ह्यांची भरपूर वाढ होते. त्यानंतर ही झाडे कापल्यास प्रत्येक झाडापासून किमान रु. २०/– सहज मिळतात. म्हणजेच एकरी रु. २०,००० (वीस हजार रु.) ज्या जमिनीत निकृष्ट दर्जाचे एकरी १०० ते १५० रु. किंमत मिळत नसलेले सामान्य गवत होते त्याच जमिनीत एकदम एकरी ५ वर्षांत २०,०००–रु. म्हणजे वर्षाला ४०००/–रु. मिळतात. लोकांची सरपणाची व्यवस्था होते. गुरांसाठी सुबाभुळाचा पाला मिळतो. जमिनीचा पोत सुधारतो. छोटे छोटे लघुउद्योग, ग्रामोद्योग सुरू करता येतात. निलगिरी व बांबूपासून लाकडी वस्तू बनविणे, बांबूपासून अनेकविध वस्तू बनविल्या जातात. शिवाय झाडांमधील रिकाम्या जागेत पावसाळ्यात विविध प्रकारचा भाजीपाला घेणे, कडधान्ये घेणे, पावसाळ्यानंतर होणारी पिके घेता येतात. त्यामुळे जमिनीच्या कणाकणाचा पुरेपूर उपयोग करून घेता येतो.

या आर्थिक लाभाचा योग्य विनियोग करण्याचे शिक्षण अनौपचारिक शिक्षणाद्वारे दिले जाते व त्या शिक्षणात सामाजिक बांधिलकी राखण्याचा प्रयत्न केला जातो.

## लोकांचा सहभाग कसा मिळवला ?

ज्याच्याकडे शेती नाही किंवा गवती जमीन नाही परंतु सामाजिक वनीकरणाची इच्छा आहे अशा आदिवासींसाठी सुद्धा निरीड प्रयत्न करीत आहे. असा एक प्रयोग निरीडतर्फे येथील हालोली ह्या गावी केला. श्री. बाळकृष्ण जाधव ह्या आदिवासी शेतकऱ्याकडे भातशेती व गवती जमीन आहे. परंतु सर्व शेती कसणे त्याला जमत नाही. त्याच्याच शेजारी श्री. दामू, काळूराम व मधू हे इतर स्वतःची गवती जमीन नसलेले आदिवासी आहेत. ह्या चौघांनी एकत्रपणे झाडे लावण्याचे ठरविले व सर्व कार्यक्रम ठरविण्यासाठी सर्वजण संस्थेकडे आले. या आधी त्यांना तयार करण्यासाठी कार्यकर्त्यांना खूप प्रयत्न करावे लागले. बाळकृष्णाच्या ४ एकर गवती जमिनीत झाडे लावण्याचा कार्यक्रम ठरविला. चौघांनी समायिकपणे कामे करून त्यात सुमारे ४००० झाडे लावली. त्यांची वाटणी कशी करायची हेसुद्धा त्यांनीच ठरविले. एकूण ५ भाग करून एक भाग जमिनीचा व चार भाग चार जणांचे असे ठरविले. आज तेथील झाडे ही दीड वर्षांची झाली असून अत्यंत सुरक्षित आहेत. सामुहिक लागवडीचे हे उत्कृष्ट उदाहरण होय. यामुळे झाडांची व्यवस्थित देखभाल करणे सोपे जाते. अनौपचारिक शिक्षणाच्या शिबी_

राला हे लोक नियमित येतात. ही सामुहिक वनलागवड केल्यानंतर उरलेल्या वेळात श्री. दामू व श्री. काळूराम यांनी गावाशेजारच्या एका कुणब्याची दीड एकर जमीन भागिदारीत काही महिने वापरण्यास घेतली. दुसऱ्या कुणब्याकडून ऑईल इंजिन घेतले. शेजारीच ओहळ वाहत आहे त्याला छोटा बांध घालून पाणी अडवले व त्यावर मशीन बसवून त्या दीड एकर जमिनीत चवळी, वांगी, वाल इत्यादी भाजीपाला लावला. आलेल्या उत्पन्नाचे खर्च वजा करून एकूण चार भाग केले जातात. एक भाग जमीन मालकाला, एक भाग इंजिनाचा, व बाकी दोन भाग ह्या दोघांचे. डिसेंबर महिन्यात वरील भाजीपाला लावला. हे दोघे राबायला शिवाय घरातील माणसे, पिक काढणीच्या वेळेस बाहेरून रु. १०/– प्रती मजुरीप्रमाणे ३/४ मजूर लावले जातात. वसई तालुक्यातील कळंब ह्या बाजारपेठेत सदर माल विकायला नेतात. आतापर्यंत त्यांनी त्यातून किमान १२,०००/– रु. उत्पन्न काढले आहे. व अजून किमान एक महिना उत्पन्न निघेल.

पुढच्या वर्षी त्यांनी जास्त भागीदारांच्या साह्याने जास्त प्रमाणात लागवड करण्याचे ठरविले आहे. वनलागवड करतानाच इतर उद्योग सुद्धा करता येतो ह्याचे हे उदाहरण होय.

अशा प्रकारचे सामूहिक लागवडीचे प्रयत्न निरीडतर्फे इतरत्र सुरू आहेत. हालोली, दुर्वेस, बोरांडे, करळगाव, सावरखंड, टेन, बांगरचोळा, दापचरी, आवंढाणी, वेळगाव, खुटल, दामखिंड, कोंढाण, नानिवली, सिलशेत, कोसबाड, महागाव, किराट, धुकटण, देवकोप इत्यादी गावात सन १९८४ साली १५० लोकांनी आपल्या छोट्या छोट्या क्षेत्रात सुमारे ३०,००० झाडे लावली. व १९८५ साली १०० लोकांनी मोठ्या क्षेत्रात एकूण ५०,००० झाडे लावली. याशिवाय ह्या योजनेव्यतिरिक्त आदिवासेतर अनेक लोकांना निरीडतर्फे मोफत झाडे पुरविण्यात आली. श्री. बाळकृष्ण जाधव आणि समूह राहणार हालोली व श्री. कोंड्या जाऱ्या दारोठा राहणार धुकटन यांनी प्रत्येकी सुमारे ४००० झाडे लावली आहेत तर श्री. रघुनाथ निसाळ, रा. बोरांडे यांनी ३००० झाडे लावली आहेत. शिवाय १५ लोकांनी १००० ते २००० पर्यंत झाडे लावली आहेत. तर सुमारे २५ लोकांनी ५०० ते १००० पर्यंत झाडे लावली आहेत. याशिवाय शेताच्या बांधावर व परसात अनेक लोकांनी झाडे लावली आहेत.

## आर्थिक स्वावलंबन

निरीडतर्फे ग्रामपंचायतीच्या गवती जमिनीवर झाडे लावण्याचा प्रयोग ६ वर्षांपूर्वी महाराष्ट्र व गुजरात सीमेवरील देहेरी ह्या गावी केला. देहेरी ह्या गावच्या ग्रामपंचायतीने आपल्या ५० एकर वरकस जमिनीवर सुमारे ३५००० सुरूच्या झाडांची लागवड केली. आता सर्व झाडे कापण्यायोग्य झाली आहेत. झाडांची वाढ पाहता प्रत्येकी किमान २० रु. उत्पन्नापेक्षाही कितीतरी जास्त उत्पन्न ग्रामपंचायतीला आता मिळू शकणार आहे. किमान २० रु. प्रती प्रमाणे त्यांना सुमारे ७ लक्ष रु. चे उत्पन्न मिळेल. ग्रामपंचायतीने हे उत्पन्न बँकेत मुदत ठेवींमध्ये ठेवण्याचे ठरविले आहे त्यातून त्यांना दरवर्षी ७०००० रु. व्याज मिळेल. आज ह्या ग्रामपंचायतीचे वार्षिक उत्पन्न रु. २००० केवळ आहे. वनलागवडीमुळे देहेरी ग्रा. पं. ला गावाच्या विकासाची कामे हाती स्वतःहून घेता येतील. त्यासाठी त्यांना आता पंचायत समिती किंवा जिल्हा परिषदेकडे जाण्याची फारशी गरज भासणार नाही. तेथील ग्रामसभा आता गावाच्या सर्वांगीण विकासाचे कोणते प्रकल्प हाती घेता येतील त्यासंबंधी चर्चा व विचारविनिमय करू लागली आहे. निरीडच्या दृष्टीने ग्रामपंचायत आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी होणे व नवीन रोजगार निर्माण करण्याची कार्यक्षमता निर्माण होणे त्यामुळे शक्य आहे. वनलागवडीचा हा कार्यक्रम ग्रामपंचायतींना क्रांतिकारक ठरेल.

ही झाडे एकदा कापल्यास पुन्हा वाढत असल्याने पुन्हा पुन्हा लावावी लागत नाहीत. तसेच सर्व झाडे एकदम कापण्यापेक्षा ५ भाग केल्यास दरवर्षी एकेक भाग कापता येईल व सर्व भागांची कापणी पूर्ण होईपर्यंत पहिला भाग पुन्हा तयार होईल. अशा प्रकारे दरवर्षी त्याचे उत्पन्न सुरू राहील. शिवाय अनेक ग्रामोद्योग करता येतील. मिळालेल्या पैशातून इतर अनेक विकासोपयोगी कामे व उद्योग करता येतील. शिवाय ज्यांच्याकडे जमिनी नाहीत त्यांनाही येथे रोजगार उपलब्ध होईल. बांबूपासून बुरुड उद्योग करणारी अनेक कुटुंबे येथे आहेत. त्यांना बाहेरून बांबू आयात करावा लागतो. तो फार महाग असतो. त्यांनाही याचा लाभ होईल.

अर्थात हे सर्व करीत असताना व लोकांना स्वतःच्या पायावर उभे राहण्याचे ध्येय ठेवताना त्यांना चांगले वळण,

पान ४१ पहा

# वनसंवर्धनात आदिवासींना सहभागी करा

## आदिवासी जंगल परिषदेची एकमुखी मागणी

पाऊस-पाणी व शेती यांच्या समतोलासाठी, दुष्काळाला पळवून लावण्यासाठी स्वच्छ हवा व चांगल्या आरोग्यासाठी जंगलतोड थांबवावी व त्या अनुषंगाने आदिवासींना वृक्ष लागवड व संवर्धन कामात सहभागी करून घ्यावे, आदिवासींनाच उत्पादनाच्या वितरणातही सामील करून घ्यावे ह्या व इतर प्रश्नांचा विचार करण्यासाठी मुते-आकाशपूर ता. शहादे येथे श्रमिक संघटना, समाजवादी महिला सभा, मजूर संघर्ष वाहिनी, ग्राम स्वराज्य समिती, रिपब्लिकन पार्टी इ. अनेक संघटनांच्या वतीने १२ मार्च ८६ रोजी प्रचंड आदिवासी-जंगल परिषद आयोजित करणात आली.

ह्यावेळी प्रसिद्ध करण्यात आलेल्या पत्रकात कमी होत असलेले जंगल व त्यामुळे वाढते दुष्काळ बाबतीत चिंता व्यक्त केली असून ठेकेदार व बड्या व्यापाऱ्यांच्या कारवायांमुळे दरवर्षी १० लाख हेक्टर इतके जंगल नष्ट होत असून एकूण क्षेत्राच्या १० ते १२ टक्केच जंगल शिल्लक राहिल्याचे म्हटले आहे.

अलीकडे निसर्गातील समतोलांचा वापर करण्याची शेती पद्धत जवळ जवळ संपली असून जंगल, झाडे, वेगवेगळी पिके, पक्षी, कीटक यांच्या एकमेकांवर अवलंबित पद्धतीने जगण्याची पद्धत संपली आहे, असे नमूद करून जंगल–झाडी नष्ट होत जाणे हे शेतीचे बाळवंट होण्याचे सर्वात मुख्य कारण असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले आहे.

आज जंगलात राहणारे आदिवासीच जंगलाचे पाहुणे झाले असून शासन जंगलाच्या जागी ठराविक झाडांचे कारखाने उभारण्याच्या योजना आखीत आहे.

भारतातील ७ कोटी आदिवासींच्या लढ्यांचा इतिहास सरळ लिहिला गेलेला नसला तरी ही लढाई "आम्हाला आहोत तसे जगू द्या" असे ठामपणे सांगणारी लढाई होती याचा निर्देश करून तंट्या, भिल्या, खाज्या नाईक, रामदास, महाराज, गुलाम महाराज इ.चा ब्रिटीशसत्तेविरूद्धच्या संघर्षातून तर अलीकडील अंबरसिंग महाराजांच्या पुढाकाराने जागा झालेला आदिवासी समाज अधिकच जागा होऊन पुढे गेला पाहिजे असे सांगून हजारो वर्षे चाललेल्या लढाईचा शेवट नवी समानता स्थापन करण्यात व निसर्गाला सुंदर बनविण्यातच होईल तसेच कामगार–कष्टकरी–आदिवासी असा विजय खेचून आणल्याशिवाय राहणार नाहीत अशी आशाही त्यांनी व्यक्त केली आहे.

ह्या परिषदेच्यावेळी अनेक मागण्या मांडण्यात आल्या. परिषदेस ठाणे जिल्ह्यातील भूमिसेनेचे नेते श्री. काळूराम धोदडे, श्री. भाई मदाने श्री. वाहरू सोनवणे श्रीमती छायाताई सुरतवंती, भीमराव म्हस्के, कॉ. कुमार शिराळकर, विजयाताई चौक इ. कार्यकर्ते उपस्थित होते.

%

( पान २५ वरून )

ऱ्हास आणि सामाजिक विषमतेमध्ये वाढ हा होय. या संदर्भात सध्या बोलबाला होत असलेल्या सामाजिक वनीकरणाच्या योजनेचे उदाहरण बोलके आहे. या योजनेखाली स्वस्त दराने जे बी–बियाणे उपलब्ध केले, ते मुख्यतः मोठ्या शेतकऱ्यांनी उचलले. धान्योत्पादनास योग्य अशा जमिनीवर त्यांनी त्याची लागवड केली. या वृक्षशेतीतून निर्माण झालेले लाकूड रेयॉन व कागदाच्या गिरण्यांना कच्चा माल म्हणून गेले. गरिबांच्या चुलीला इंधन आणि गुरांना चारा मिळवून देण्याचा उद्देश धुळीला मिळाला. उलट वृक्षशेतीला शेतमजुराची फारशी जरूर लागत नसल्याने, अनेक शेतमजूर बेकार झाले. एकूण समाजातील विषमता कमी न होता वाढली.

मोठमोठ्या धरण–योजनांचा परिणाम असाच झाल्याचे 'धरणे' या प्रकरणात दाखवून देण्यात आलेले आहे. या प्रचंड धरणाखाली कित्येकदा लागवडीयोग्य जमीन बुडते. उत्तम जंगल पाण्याखाली जाते, किंवा त्याची तोड होते आणि हजारो लोकांवर घर–दार, आपली जमीनपद्धत सोडून निराधार होण्याची पाळी येते. धरणांचे फायदे मात्र शहरातील निवासी व उद्योग, बडे शेतकरी व बागायतदार यांना मिळतात. ज्यांच्या जमिनीवर धरण बांधण्यात येते ते पिण्याच्या पाण्यालाही महाग होतात, त्यांना आर्थिक दृष्ट्या सबळ बनविण्यासाठी कोणतीही योजना आखली जात नाही. एकूण अशा प्रकारच्या विकास–कार्यातही

गरिबांचा बळी दिला जातो आणि समाजातील विषमता आणखी वाढते.

## पर्यावरणावर आधारित नियोजन कसे असावे ?

संपादकांनी हे जे दुष्परिणाम दाखवून दिले आहेत, त्यांची चर्चा आता वृत्तपत्रे व इतर लिखित माध्यमे आणि शिक्षित लोक यामध्ये निरनिराळ्या निमित्ताने सुरू झालेली आहे. पर्यावरण व निसर्गसंपत्तीचे संरक्षण यांचा जे आग्रह धरतात त्यांना काही विशिष्ट योजना रद्द करून घेण्यात यशही मिळाले आहे. मात्र त्यामुळे तुम्हाला आधुनिक तंत्रज्ञान, त्यामुळे होणारे फायदे व येणारी सुबत्ता नको का, असा प्रश्न त्यांना विचारला जातो. यावर समर्पक उत्तर पर्यावरणवाद्यांना अजून देता आले नाही. संपादकांनीही ठाम उपाय या अहवालात कुठेच सुचविलेले नाहीत. काही ठिकाणी पर्यावरणावर आधारीत नियोजनाची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. पण असे नियोजन कसे करावे ? आधुनिक तंत्रज्ञानाशी त्याची सांगड कशी घालता येईल ? अशा नियोजनात कोणती उत्पादन व वितरण व्यवस्था अनुस्यूत आहे, ती कशी अंमलात आणावी, याचे दिग्दर्शन या अहवालात नाही.

अर्थात हा या अहवालाचा दोष अथवा उणेपणा मुळीच म्हणता येत नाही. अशा प्रकारचे विचारमंथन अजून आपल्या देशात सुरूच झालेले नाही. मात्र ते सुरू होण्यासाठी आवश्यक असा कच्चा माल किंवा तसा वैचारिक स्फोट होण्यासाठी आवश्यक ती ठिणगी या अहवालातून मिळू शकते, हे निश्चित.

अशी वैचारिक प्रक्रिया सुरू झालेली नसल्याने अहवालात काही ठिकाणी विसंगत सूर आढळतो. गरिबांना इंधन म्हणून स्वस्त दराने भरपूर लाकूड मिळाले पाहिजे असा आग्रह एका प्रकरणात अभिप्रेत आहे, तर 'वातावरण' या प्रकरणात असे दाखवून देण्यात आले आहे की वातावरण प्रदूषित होण्याचे एक प्रमुख कारण म्हणजे लाकडे जाळणाऱ्या चुलीतून बाहेर पडणारा धूर ! अर्थात सूर्यशक्तीचा वापर आणि धूरविरहित चूल तयार करण्याचे तंत्र, हे यांवर उपाय आहेत. याचाच अर्थ असा होईल की आजच्या आपल्या तंत्रज्ञानाची दिशा चुकीची आहे. तंत्रज्ञान योग्य मार्गाने गेले तर ते निसर्गविरोधी असलेच पाहिजे असे नाही. उचित तंत्रज्ञान या नावाने फॅशनेबल असलेल्या विषयाची आणखी चर्चा आपल्या देशाच्या संदर्भात या अहवालात हवी होती.

## आदिवासी : निर्सगाशी समतोल की तांत्रिक मागासलेपण ?

प्रचलित योजनांमुळे वन्य जमातींना भोगाव्या लागणाऱ्या परिणामांची चर्चा करताना असा सूर या अहवालात आढळतो की या जमातींची जीवनपद्धती निसर्गाचा समतोल राखण्यास अनुकूल अशीच आहे. अर्थात असा समतोल त्यांनी स्वतःवर विचारपूर्वक घालून घेतलेल्या बंधनांमुळे राखला जातो का त्यांच्या तांत्रिक मागासलेपणामुळे व शिक्षणाच्या अभावामुळे राखला जातो, हा वादाचा मुद्दा आहे. कारण शिक्षण व तंत्र आत्मसात झाल्यावर त्यांच्याकडूनही नैसर्गिक संपत्तीचा विध्वंस झाल्याची उदाहरणे आहेत. अर्थात याची कारणे केवळ सामाजिकच नाहीत तर जैविकही आहेत. निसर्गव्यवस्थेतही प्रत्येक जीव स्वतः कोणते तरी 'नवे तंत्र' आत्मसात करून इतरांवर मात करण्याचा प्रयत्न करीतच असतो. माणसाच्या बुद्धीची ताकद इतरांपेक्षा प्रचंड असल्याने आज माणूस निसर्गावर स्वामित्व मिळवून बसल्याचा आभास निर्माण झालेला आहे. पण शिखराच्या टोकावर फार काळ तोल सांभाळणे कठीण असते. हे सुद्धा नैसर्गिक व्यवस्थेत पाहायला मिळतेच. एकेकाळी पृथ्वीवर स्वामित्व गाजविणाऱ्या डिनोसॉरांचीच स्थिती जर काळाच्या ओघात माणसाला प्राप्त होणार असली तर माणसाकडून होणारा निसर्गाचा विध्वंस हा नैसर्गिक उत्क्रांतीचाच भाग मानावा लागेल.

अशी 'उत्क्रांती' थोपविणे माणसाच्या बुद्धीच्या आवाक्याबाहेर नाही. पण त्यासाठी मानवसमाजाने आपल्यावर कशी व कोणती बंधने घालून घ्यायची याचा विचार तातडीने सुरू होणे आवश्यक आहे असा विचार सामाजिक आणि राजकीय पातळीवर आपल्या देशात सुरू झाला तर या अहवालाचा कार्यभाग साध्य होईल.

The State of India's Environment
The Second Citizen's Report
Centre for Science & Environment
807, Vishal Bhavan,
95 Nehru Place.
New Delhi 110019

ॐ

# एका काडीची क्रांती

### उत्पादनवाढ हाच विकास !

भारतामध्ये काही प्रांतांत हरित क्रांती झाली. त्यामुळे शेतीचे उत्पादन वाढले परंतु अन्नधान्याचा प्रश्न त्यामुळे काही सुटू शकला नाही. जे पूर्वीपासून सक्षम होते तेच या हरित क्रांतीचा फायदा घेऊ शकले. मानवी जीवन दुर्लक्षून केवळ उत्पादनवाढ हा जो विकासाचा दृष्टिकोण आपल्याकडे स्वीकारला गेला आहे त्याचाच हा परिणाम आहे. या पार्श्वभूमीवर One straw Revolution ( एका काडीची क्रांती ) हे पुस्तक एक वेगळा दृष्टिकोण देणारे आहे.

### नैसर्गिक शेतीचा प्रयोग

या पुस्तकाचे लेखक आहेत मासानोबू फुकुओका. ते नव्या पद्धतीच्या नैसर्गिक शेतीचा जनक आहेत. हा जपानी शेतकरी गेली ३८ वर्षे जपानी शेती या विषयावर प्रयोग करीत आहे. आज अनेक देशांतील युवक येऊन अतिशय साध्या पद्धतीने झोपडीत राहतात. तिथे स्वत: शेती करतात, पाहतात, अनुभव घेतात व त्याप्रमाणे आपापल्या भागामध्ये जाऊन शेती करतात. आज जपान, अमेरिका व इतर देशामध्ये नैसर्गिक शेतीचे प्रयोग चालू झाले आहेत.

फुकुओका हे सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ असल्यामुळे काही काळ त्यांनी प्रयोगशाळेमध्ये पिकांवरील रोगांचे विशेषज्ञ म्हणून काम केले. वयाच्या पंचविशीमध्येच त्यांना वाटू लागले की जी शास्त्रीय प्रगती आपण करतोय ती म्हणजे रोग निर्माण करून त्यावर उपाययोजना करण्यासारखी आहे. जे मूलतः नैसर्गिक आहे, त्याचा शोध घ्यायला हवा. या एका ध्यासामुळे त्यांनी आपली नोकरी सोडली व निसर्गाचे मूळ रूप जाणून घेण्यासाठी भ्रमंती सुरू केली. एके दिवशी अनेक वर्षे काहीही न केलेल्या शेताजवळून जात असताना त्यांना गवताची काही सुदृढ रोपे, गवत आणि तणांच्या मध्ये उभी असताना दिसली. अशीही शेती होऊ शकते अशी प्रेरणा घेऊन त्यांनी ' नैसर्गिक शेती 'चे प्रयोग आपल्या शेतावर सुरू केले.

फुकुओका आपल्या नैसर्गिक शेतीला काहीही न करण्याची ( Do Nothing ) शेती म्हणतात. पारंपारिक शेती पद्धतीमध्ये अनावश्यक श्रम वाढले आहेत. प्रगतशेती तंत्रज्ञानामुळे नैसर्गिक संतुलन बिघडले आहे व त्यामुळे शेतजमीन ही त्या तंत्रावरच अवलंबून राहू लागली आहे. त्यासाठी निरनिराळी खते, अवजड यंत्रसामग्री, जंतुनाशके यांचा वापर करावा लागतो. फुकुओकांची काहीही न करता शेती म्हणजे अनावश्यक श्रम टाळून केलेली शेती आहे. निसर्गावर बरताण न करता सहकार्याने, निसर्गचक्र व पिकांची वाढ यांचा अचूक मेळ बसवून केलेला हा प्रयोग आहे.

फुकुओकांनी आपल्या नैसर्गिक शेतीमध्ये भाताचे पीक घेण्यासाठी भाताच्या बिया मातीच्या लगद्यामध्ये कालवून संपूर्ण शेतीमध्ये विखरून दिल्या. त्यावर गवत पसरून दिले व तण तसेच राहून दिले. शेतामध्ये पाणी तुंबवणे सोडून दिले. गवतावर कोंबडया चरण्यास सोडून दिल्या व या कोंबड्यांच्या लिदेमुळे गवतापासून उत्तम खत बनू लागले. जमिनीचा कस वाढू लागला. पारंपारिक कंपोस्ट खताची गरज भासेनाशी झाली. भातशेती निकोप वाढू लागली. जसजसे नैसर्गिक संतुलन वाढू लागले तसतसा किडे-कीटकांचा त्रास कमी होऊ लागला. उलट ते शेतीच्या निकोप वाढीसाठी उपकारक ठरू लागले.

किडयांचा शेतीशी असणाऱ्या आंतरसंबंधाबद्दल फुकुओका सांगतात की टोळ, कोळी, बेडूक यांचा शेतीचे संरक्षण व लागणारी पोषक द्रव्ये या दृष्टीने महत्त्वाचा भाग असतो. ठराविक काळात ते एकमेकांचा नाश करतात किंवा नाहीसे होतात. यासाठी वेगळ्या रासायनिक जंतुनाशकांची आवश्यकता नसते. या जंतुनाशकांमुळे किडे पूर्णपणे मारले जातात व त्यामुळे नैसर्गिक संतुलन बिघडते आणि पिकांवर या रसायनांचा परिणाम होतो तसेच श्रम वाढतात. रासायनिक खतांमुळे शेतजमीन निकृष्ट होऊ लागली आहे हे आता शेतीतज्ज्ञही मान्य करतात. या रसायनांचा मानवी जीवनावर दुष्परिणाम होतो तो वेगळाच. फुकुओकांच्या नैसर्गिक शेतीमध्ये वनस्पतिजन्य बुरशी टिकू लागल्यामुळे व जमिनीमध्ये गांडूळ, किडे यापासून निर्माण होणाऱ्या खतामुळे जमिनीचा कस वाढू लागला असे दिसून येते.

फुकुओका काहीही काटछाट न करता संत्र्याची लागवड करतात. संत्र्याच्या झाडाशी असणारे तण, गवत, भाजी-

पाला तसाच वाढून देतात. अशाप्रकारे वाढू दिलेल्या संत्र्याचे उत्पन्न व चव चांगली असते. संत्र्यांना रंग देणे, फळ मोठे दिसावे म्हणून कृत्रिम उपाययोजना करणे हे निसर्ग व व मानवाच्या दृष्टीने अहितकारक आहे.

### निसर्ग संतुलन

भाज्या, रानवनस्पती व किडे हे सर्व आपण खाल्ले पाहिजे असे फुकुओकांना वाटते त्यामुळे निसर्गसंतुलन कायम राहील. न सडलेले भात, भाज्या, रानवनस्पती व किडे हे माणसासाठी संपूर्ण अन्न होऊ शकेल व औषध म्हणूनही उपयोगी पडेल. अन्नधान्याचा प्रश्न हा निसर्गाच्या अकार्यक्षमतेमुळे उभा राहत नाही तर माणसाच्या बदललेल्या सवयी त्याला कारणीभूत आहेत असे फुकुओकांना वाटते.

'एका काडीची क्रांती' हे पुस्तक केवळ शेतकी ज्ञान देणारे नाही. हे पुस्तक आरोग्य, आहार याबाबत सांस्कृतिक मूल्ये व माणसाच्या ज्ञानाच्या मर्यादा दाखविणारे आहे. दुसऱ्या बाजूला भाताच्या, संत्र्याच्या आणि भाजीपाल्याच्या लागवडीचे व्यवहारी ज्ञान देणारे आहे. श्रम आणि बुद्धी यांची सांगड घालणारे आहे.

फुकुओकांची 'नैसर्गिक शेती' ही एक जीवनपद्धती आहे. जमिनीचा कस वाढविण्याबरोबर माणसाच्या अध्यात्मिक आणि शारीरिक उन्नतीचा विचार त्यात आहे. शेती करण्याच्या पद्धतीच्या बदलाबरोबरच आपला निसर्गाविषयी, अन्नाविषयी, मानवी जीवनाविषयी दृष्टिकोण बदलण्याचे या पुस्तकाचे उद्दिष्ट आहे. शेतीचे उद्दिष्ट हे अधिक उत्पादन हे नसावे तर संस्कृती जोपासणे, संपूर्ण जीवनानुभव घेणे हे असावे. निसर्ग आणि मानव यांचे नाते अधिक सुदृढ करण्यासाठी हे पुस्तक आहे.

आज आपण शेतीचा विचार करताना आधुनिक शेती तंत्राचाच विचार करतो. रासायनिक खते व जंतुनाशके यांचा जास्तीत जास्त वापर करून शेतीतील उत्पादन वाढीचा विचार करतो. यातून फक्त नगदी पिकेच फायदेशीर ठरतील. रासायनिक खतांच्या, जंतुनाशकांच्या मानवी जीवनावर होणाऱ्या दुष्परिणामांकडे आपण दुर्लक्ष करीत आहोत. जगातील सर्वच शेतीतज्ञ आता हे मान्य करू लागले आहेत. या पार्श्वभूमीवर फुकुओका नैसर्गिक शेती तंत्राचा वापर करून निसर्ग आणि मानव यात सुसंवाद साधण्याचा प्रयत्न करीत आहेत. विज्ञानाच्या आणि मानवाच्या ज्ञानाच्या मर्यादा दाखविणारे हे पुस्तक आहे. त्यामुळे आपण अंतर्मुख होतो. यासाठी प्रत्येकाने हे पुस्तक आवर्जून वाचावयास हवे.

वनस्ट्रॉ रेव्होल्यूशन
लेखक
मासानॉबू फुकोओका

प्रकाश लवेकर
बोइसर, ठाणे

---

## आमू आहिं वाघा पिल्ह्

धुळे जिल्ह्यातील आदिवासी जंगल परिषदेच्या निमित्ताने मुख्यतः खानदेशातील भिल्लांचा गेल्या दोनशे वर्षातील इतिहास सांगणारी ही पुस्तिका श्री. दिनानाथ मनोहर यांनी लिहिली आहे. बाहरू सोनवणे यांनी ती प्रकाशित केली आहे.

### इतिहास कशासाठी? कुणासाठी?

ही पुस्तिका प्रकाशित करण्यामागे या लेखक-प्रकाशक द्वयीची एक विशिष्ट भूमिका आहे. "चारपाच राज्यांत पसरलेल्या भिल्ल आदिवासींचा गेल्या शेकडो वर्षांचा इतिहास संशोधित व्हावा, आजच्या भारतीय समाजाच्या धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवनाला आकार देण्यात आदिवासींचा किती व कसा सहभाग आहे हे स्पष्ट व्हावे, उपलब्ध लिखित माहिती, लोककहाण्या, लोकगीते, यात दडलेला इतिहास स्पष्ट व्हावा." अशी त्यामागे तळमळ आहे. हा इतिहास लिहायचा कुणासाठी? याबाबत त्यांच्या मनात कुठलाही संभ्रम नाही. त्यांच्या समोरचा वाचकवर्ग आहे आजचा आदिवासी तरुण! आपल्या लढाऊ परंपरेची ज्वाला त्यांच्या मनात पुन्हा पेटावी व त्याने दबलेले, भित्रे राहू नये, हीच या इतिहासातून मिळणारी सर्वात मोठी शिकवण!

### एक आदिवासी : शंभर उपाय

"आदिवासींची स्थिती हृदयद्रावक आहे. त्यांना सेवेची फार मोठी जरूर आहे."

"आदिवासी निरागस आहे. निसर्गाचे लेकरू आहे. त्याला आहे तसेच कोणताही धक्का न लावता ठेवून द्यावे."

"आदिवासी भोळसट, आळशी, दारूडा, कामचोर आहे. तो कधीच सुधारू शकणार नाही. खितपतच पडणे हीच त्याची लायकी. पायातली वहाण पायातच बरी."

"आदिवासीला त्याच्या जंगलातून बाहेर काढणे व औद्योगीकरणाच्या रेट्यात सामील करून घ्यावे हाच त्याला सुधारण्याचा एकमेव उपाय आहे."

असे विविध उपाय मिशनरी, सरकार, समाजसेवक, सरंजामदार इत्यादींनी वारंवार सुचवले आहेत. याचा आदिवासींच्या मानसिकतेवर काय परिणाम होतो? तो या दृष्टिकोणांच्या वेढ्यात सापडतो व त्यातच फसून जाऊ लागतो. यातून स्वतःलाच जंगली, तुच्छ व हीन लेखण्याची परंपराच समाजावर लादली जाते. एकेका माणसाचे, संपूर्ण समाजाचे सत्वच सधन शाहूंच्या पायी, औद्योगिक व्यवस्थेच्या पायरीवर गहाण पडते. आर्थिक गुलामीपेक्षाही अधिक चिवट ठरते ती आपली मानसिक गुलामगिरी. स्त्री, दलित व आदिवासी हे सर्वच या एका बाबतीत समान पातळीवर येतात.

## इतिहासच गाडला जातो तेव्हा?

आपल्या परवशतेचे चित्र तर डोळ्यांपुढे ठळकपणे आले पाहिजे. पण आपल्या कोंडीची जाणीव होऊन धीरच खचायचा! 'हे असेच चालत राहणार' ही वृत्ती प्रबळ व्हायची. पण याचबरोबर दुसरेही एक चित्र डोळ्यांपुढे येत गेले तर? आपल्या समाजातले सर्वच जण असे मानहानीचे जिणे कंठायला तयार नव्हते हे सापडलं तर? आपल्या बांधवांची, आपली दीनवाणी अवस्था पाहून ज्या आदिवासींच्या मनात प्रक्षोभ झाला, त्यांना जिथे अन्याय दिसला, तिथे त्यांनी जमेल तसा प्रतिकार केला. या प्रतिकारानेच त्या काळीही समाजाला स्फुरण दिले. एकत्रित येण्याची प्रेरणा दिली. याची पावती म्हणून की काय, हे संचित पुढच्या पिढीला देण्यासाठी समाजाने, पोवाडे, लोककथा, कहाण्या, मिथ्यक यातून हा इतिहास गाथून ठेवला. पण आता आद्योगीकरण, संस्कृतीकरण, नागरी भाषा या सर्वांच्या दडपणाखाली इतिहासाची ही पारंपारिक साधने कायमची गाडली जाताहेत. तंट्या भिल्ल, खाज्या नाईक, भीमा नाईक, गुल्या महाराज, रामदास महाराज, यासारख्या वीरांच्या कहाण्या लुप्त होऊन जातील. आपला इतिहास गमावलेली माणसे भविष्याला कशी सामोरी जाणार?

## गमावलेला एकलव्याचा अंगठा परत मिळवायचा म्हणून तर!

या पुस्तिकेचे लेखक, प्रकाशक यांना चळवळीत काम करतांना आपल्या ऐतिहासिकतेचा अभाव जाणवे. यातूनच 'आपला इतिहास आपणच पुढे आणण्याची गरज आहे, ही जाण वाढीस लागली. आणि मग कॉ. रूपसिंग शेवाळ्यांनी हिंडहिंडून हे पोवाडे, कथा गोळा केले, त्यातले सार उतरवून घेतले. त्यांच्यासारख्यांच्या श्रमातून या पुस्तिकेला नक्कीच भराव मिळाला असेल.

या इतिहासाचा जन्म कुठून होतो व रोख काय असावा याबाबत लेखक-प्रकाशकाच्या मनात दुभाव नाही. हा लोकांतूनच निर्माण होणारा इतिहास लोकांपर्यंतच जायला हवा आहे. आपल्या आदिवासी अस्मितेची जाण व्हायचा आपल्या इतिहासाचा धांडोळा आपणच घ्यायला हवा आहे.

काळ्या आफ्रिकन माणसाची अस्मिता जागी होतांना त्याने आपल्या जमातीचा, टोळ्यांचा, गुलामगिरीचा, त्यातून सुटण्याकरता केलेल्या संघर्षाचा इतिहास, कहाण्या लिहायची सुरुवात केली. या इतिहासाची वर्तमानावर केवढी पकड आहे हे त्याला कळत गेले तसे त्यातून त्याच्या लढ्याला केवढेतरी ओज मिळाले. हीच गोष्ट आपल्याकडील दलित साहित्याची. या शक्तिपूर्ण आत्माविष्काराने प्रस्थापित व्यवस्थेला केवढा खोल हादरा बसला! दुर्दैवाने आपल्या महाराष्ट्रात आदिवासींची अजून या दिशेने वाटचाल होताना आढळत नाही. पण आदिवासी जंगल परिषदेच्या निमित्ताने हे बीज पेरले आहे. ते फळायला हवे आहे.

## सातपुड्याच्या कुशीत

या पुस्तिकेत त्रुटी नाहीत असे नाही पुस्तिकेच्या सुरवातीलाच भारतीय आदिवासींचे वर्णन करण्याऐवजी सरळ नकाशाच दिला तर वाचकाला सहजपणाने भौगोलिक जाण येईल. भिल्ल कुठेकुठे पसरलेत हे कळणे सोपे जाईल. केवळ खानदेशातीलच भिल्ल जमातींची विविधता, तालुकावार वसाहत नकाशातून दाखवली तर स्थानिक परिस्थिती अधिक नेमकेपणे कळेल.

या पुस्तिकेत, सातपुड्याच्या कुशीतील भिल्लांच्या गेल्या दोनशे वर्षातील इतिहासाचे महत्त्वाचे टप्पे नमूद

पान ३८ पहा

## वृत्तविशेष

# ‘ काम दो या जेल दो ’

**वडसा देसाईगंज ता. ६**

रोजगार हमीच्या कामालाही रीतसर मागणी करून चार महिने झाल्यानंतरही काम मिळाले नाही म्हणून नियमानुसार बेकार भत्ता द्या व रोजगार हमीची कामे त्वरित सुरू करा या मागणीसाठी बांधकाम व लाकूड कामगार संघटनेचे अध्यक्ष आमदार सुखदेवबाबू उईके यांच्या नेतृत्वाखालील सुमारे १२०० स्त्री-पुरुषांनी ६ फेब्रु. रोजी स्वतःला अटक करवून घेतली.

आमदार श्री. उईके यांनी स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही कायद्यांच्या अमलबजावणीसाठी आंदोलन करावे लागते ही शरमेची बाब आहे असे सांगून सप्टेंबर ८५ पासून हजारो मजुरांनी निवेदने मोर्चे, प्रत्यक्ष भेटी इ. मार्गाने कामाची मागणी करून त्याला प्रतिसाद मिळाला नाही म्हणून ‘काम दो या जेल दो’ आंदोलन करण्याची वेळ आल्याचे सांगितले.



# भीक नको हवे हक्काचे काम


महाराष्ट्रात ग्रामीण आदिवासी भागात काम करणाऱ्या संघटनांच्या वतीने ‘ रोजगाराचा अधिकार ’ हा घटनेच्या मूलभूत अधिकाराच्या अध्यायात सामील करावा व रोजगाराची हमी देणारा व रोजगार न दिल्यास बेकारभत्ता देण्याची तरतूद असलेला कायदा करावा ह्या मागणीसाठी २२ जानेवारी ८६ रोजी मुंबई येथे ‘ धरणे ’ कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमास महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागांतून सुमारे २०० कार्यकर्ते हजर होते.

त्यावेळी माननीय राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांना हिंदमजदूर सभा, जनतंत्र समाज, ग्राम स्वराज्य समिती, श्रमिक मुक्ती संघटना, निर्मिती, भूमिसेना, समता आंदोलन छात्र युवा संघर्ष वाहिनी, आदिवासी जाणीव जागृती केंद्र, इंडियन फेडरेशन ऑफ बिल्डिंग अँड वूड वर्कर्स यांच्या वतीने एक निवेदन देण्यात आले. ह्या निवेदनात महाराष्ट्र शासनास, त्यांच्या रोजगार हमी कायद्याची कक्षा वाढवून त्यात राज्यातील ग्रामीण व नागरी भागातील सर्व बेरोजगारांना सामील करण्यासाठी आवश्यक सुधारणा करण्याची शिफारस करावी तसेच संविधानात सुधारणा करून ‘ रोजगाराचा हक्क ’ हा ‘ मूलभूत हक्क ’ म्हणून सामील करावा अशी मागणी करण्यात आली असून ही मागणी केंद्र शासनास कळविण्याची विनंती केली आहे.

ह्या निवेदनाद्वारे घटनेच्या निदेशक तत्त्वावर जरी ‘ कामाचा अधिकाराचा ’ निर्देश केला असला तरीसुद्धा इतर कोणत्याही राज्याने आपल्या धोरणात सुधारणा करून महाराष्ट्र शासनाप्रमाणे ग्रामीण भागात काम मागणाऱ्यांना रोजगाराची हमी देण्याची तरतूद केलेली नाही ह्याकडे लक्ष वेधले.

या निवेदनाद्वारे आंतरराष्ट्रीय श्रम परिषदेसमोर माननीय पंतप्रधानांनी केलेल्या भाषणाकडे लक्ष वेधले आहे. १७ जून १९८५ रोजी केलेल्या या भाषणात प्रधानमंत्र्यांनी ‘ आम्ही आपले स्वातंत्र्य जन आंदोलनाद्वारे प्राप्त केले. ज्यात औद्योगिक कामगार व ग्रामीण मजदूर यांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे. ज्यावेळेस आम्ही संविधान बनविले त्यावेळी आम्ही घोषित केले की, राज्याने ‘न्यायपूर्ण व माणुसकीची व्यवस्था असलेली कामाची परिस्थिती निर्माण करावयास हवी. त्याखेरीज शेतमजूर, औद्योगिक व इतर सर्व कामगारांना जीवन निर्वाह वेतन व सन्मानजनक जीवनाची शाश्वती द्यावयास हवी ’ ही आमच्या संविधानाच्या अध्यायातील राज्य धोरणाच्या निदेशक तत्त्वातील प्रमुख कलमे आहेत ’ असे म्हटले आहे.

# भूमिसेना मोर्चा



१ जानेवारी १९८६ रोजी बोईसर, जिल्हा ठाणे येथे भूमिसेनेने संघटित केलेल्या मोर्चात प्रचंड संख्येने, लोक सहभागी झाले. या प्रसंगी झालेल्या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी श्री. नवनीतभाई शहा होते. प्रमुख पाहुणे म्हणून कामगार नेते श्री. सुरेंद्रमोहन उपस्थित होते. परशुराम टावरे, काळूराम दोधाडे, रामभाऊ वाझू, रामचंद्र गोवारी इत्यादींची भाषणे झाली.

या मेळाव्यात मांडल्या गेलेल्या प्रमुख मागण्या अशा— वर्षानुवर्षे हंगामी काम करणाऱ्या कारखान्यातील कामगाराला कायम करा. असंघटित, बांधकाम कामगार, रेल्वे यार्ड, व इतर हमाल, ट्रक हमाल, ड्रायव्हर्स, क्लीनर्स वीटभट्टी मजूर, इ. च्या मजुरीत वाढ करा व कंत्राटी पद्धत बंद करा. कंत्राटदारांच्या वाढत्या गुंडगिरीचा बंदोबस्त करा. स्थानिक आदिवासी दलित व मागास सुशिक्षित-अशिक्षित बेकारांना उद्योगपट्ट्यात नोकरीत राखीव जागा व प्राधान्य द्या. आदिवासींच्या शेतजमिनींच्या हस्तांतरासंबंधीच्या सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाची योग्य अंमलबजावणी करा; आदिवासी जमिनींचे कारखानदारीसाठी होणारे हस्तांतर तावडतोब थांबवा. पालघर तालुक्यातील आदिवासी विभागातील अपुरे रस्ते पुरे करा. शेतकऱ्यांची गवतपावळी पेंढा विक्रीतून होणारी घट थांबवा व रोजगार हमी कामे त्वरित सुरू करा. वेठबिगारांच्या पुनर्वसनातील भ्रष्टाचार दूर करा. बोईसर येथील वाढत्या प्रदूषणाला आळा घाला व हवा पाणी, जमीन यांचे रक्षण करा. जीवनमान बिघडवू नका.

* * *

## गरीब आदिवासींचा तहसीलदार, मुरबाड येथे धरणे मोर्चा

ठाणे, १३— मुरबाड तालुक्यातील ५०० हून अधिक भूमिहीन, अल्पभूधारक, शेतमजूर विशेषतः आदिवासींनी महसूल खात्याची निष्क्रियता, अनागोंदी कारभार, भ्रष्टाचार तसेच आदिवासी विरोधी धोरण यांच्या निषेधार्थ श्रमिक मुक्ती संघटनेतर्फे सोमवार दि. १३–१–८६ रोजी तहसिलदारांसमोर मोर्चा नेऊन धरणे धरले होते.

धरण्याच्या शिष्टमंडळाने सर्व उपस्थितांच्या वतीने सुमारे १२५ प्रकरणांची यादी व १९ मागण्या तहसीलदारांना सादर केल्या. शिवाय २५ ते ३० आदिवासी स्त्री-पुरुषांनी स्वतःहून धीटपणे आपली गाऱ्हाणी मांडली. तलाठी फिरती कार्यक्रमाची जाहीर होळी करण्यात आली.

# सामुदायिक लग्न समारंभ





आदिवासी जाणीव जागृती केंद्रातर्फे वेणगाव, ता. कर्जत येथे १२ जानेवारी १९८६ रोजी सामुदायिक लग्न समारंभ पार पाडला. ह्यावेळी कातकरी जमातीतील १० जोडपी विवाहबद्ध झाली.

ह्यावेळी एकात्मिक आदिवासी विकास योजनेंतर्गत प्रत्येक जोडप्याला भांड्यांचा संच व १०० रु. चा अहेर प्रभारी प्रकल्पाधिकारी श्री. दाते यांचे हस्ते देण्यात आला. श्री. शरद कुलकर्णी यांनी कर्जत भागात केंद्र करीत असलेल्या कामातून हा कार्यक्रम आयोजित केला असल्याचे सांगितले. प्रकल्पाधिकारी श्री. दाते यांनी आदिवासी समाज पुढे यावा म्हणून शासनाच्या अनेक योजना असून लग्नातील खर्च कमी करून अशा प्रकारच्या सामुदायिक लग्नाला प्रोत्साहन व संसाराला हातभार म्हणून शासन ही मदत देत असल्याचे सांगितले.

ह्या कार्यक्रमास वेगवेगळ्या संघटनांचे प्रतिनिधी हजर होते. केंद्राचे कार्यकर्ते श्री. कमळाकर हिलम यांनी हा कार्मक्रम घडवून आणण्यात विशेष परिश्रम घेतले.

श्रमिक क्रांति संघटना, तारा यांनी खैराटपाडा, मु. तारा तालुका पनवेल येथे २८ मार्च १९८६, रोजी सामुदायिक लग्न समारंभ आयोजित केला. याप्रसंगी तेरा लग्ने झाली. या समारंभास ग्रामविकास युवा संघटना व ग्रामस्थ मंडळ तारा यांनी विशेष सहकार्य दिले. यावेळी जोडप्यांना भांडी, तसेच १०० रुपयांची भेट, एकात्मिक आदिवासी विकास योजनांतर्गत प्रभारी प्रकल्पाधिकारी श्री. दाते यांच्या हस्ते देण्यात आली. संघटनेतर्फे प्रत्येक जोडप्याला ताटवाटी इ. भेट देण्यात आली.

* * *

## अंबरसिंग महाराज स्मृतीदिन

शहादे : शहादे तालुक्यातील माळदे गावी दि. २५ फेब्रुवारी रोजी अंबरसिंग महाराजांचा स्मृतिदिन साजरा करण्यात आला. ह्यावेळी घोषणांच्या निनादात मिरवणुकीने लोक समाधीस्थानाकडे आले. मिरवणुकीनंतर झालेल्या सभेत श्रमिक संघटनेची चळवळ पुढे नेण्याची फार मोठी जबाबदारी आपल्यावर असल्याचे सांगितले.

अन्याय, अत्याचार, वाढती महागाई या विरुद्ध लढण्याची आवश्यकता अनेकांनी व्यक्त केली. ह्यावेळी वाहरू सोनवणे, कॉ. रंजना कान्हेरे, गुलाब नाईक इत्यादींची भाषणे झाली.

# महिला कायदा शिबिर : मुक्काम मासवण

१५ ते १७ मार्च १९८६ च्या दरम्यान, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेने ठाणे जिल्हा आदिवासी सहज शिक्षण परिवार, मु. मासवण येथे सुमारे ४० ग्रामीण स्त्री कार्यकर्त्यांचे कायदाविषयक एक शिबीर घेतले.

या शिबिराचे प्रास्ताविक शरद कुलकर्णी यांनी केले. ते म्हणाले, गावांतून, पाड्यापाड्यांतून काम करताना आपल्या-पुढे येणारे अनेक प्रश्न सोडवण्यासाठी आपल्याला काही महत्त्वाच्या कायद्यांची प्राथमिक माहिती असणे आवश्यक आहे. कायदा हे देखील लोकजागृती व संघटनाचे एक प्रभावी हत्यार होऊ शकते ही जाण एकदा आली म्हणजे आपल्या कामाला अजून बळकटी येईल लग्नाच्या चौकटीत वा लग्नबाह्य संदर्भात आपल्यावर होणाऱ्या अत्याचारांची दाद आपल्याला मागता येते व ती मागणे आवश्यक आहे ही जाणच देणे महत्त्वाचे आहे, या उद्देशाने हे शिबीर घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

## सत्र पहिले

महिला दक्षता समितीच्या कार्यकर्त्या सुधा कारखानीस यांनी प्रथम सत्राची सुरुवात करताना समाजातील स्त्रीचे पारंपरिक दुय्यम स्थान, त्यामुळे प्रचलित झालेल्या दुष्ट रीतिरिवाजातून स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारांची मीमांसा केली हुंडाबळीसारखा प्रश्न घेऊन दिल्ली शहरात महिला दक्षता समिती कशी उभी राहिली हे त्यांनी मांडले, व संघटना बांधून अशा अत्याचारांशी लढणे कसे शक्य आहे हे दाखवून दिले. मोफत कायदा सल्ला केंद्राचीही त्यांनी माहिती दिली.

यानंतरच्या सत्रात, ॲड. पुष्पा सिंघवी यांनी हिंदू विवाह कायदा स्पेशल मॅरेज ॲक्ट याची माहिती दिली. यातील घटस्फोट व पोटगीविषयक तरतुदींबाबत शिबिरार्थींकडून आलेल्या अनेक शंकांचे त्यांनी निरसन केले. शिबिराच्या दुसऱ्या दिवशी शरद कुलकर्णी आपल्या संविधानातल्या घटनात्मक तरतुदींविषयी बोलले. याच दिवशी दुसऱ्या सत्रात पुणे लॉ कॉलेजचे प्रा. देशमुख यांनी महिलां-संबंधीच्या सर्व फौजदारी कायद्यांची माहिती दिली. दखलपात्र व अदखलपात्र गुन्ह्यांचे वर्गीकरण सांगून, स्त्रियांना अटक व तपास करण्याबाबत पोलिसांचे हक्क व त्यांची अधिकारमर्यादा काय हे त्यांनी सांगितले. एखाद्या गुन्ह्याची पोलिसचौकीत नोंदणी कशी करावी व तपासाचा आग्रह धरण्यासाठीच्या वैधानिक तरतुदी पण त्यांनी समजावून सांगितल्या. याच सत्रात त्यांनी बला-त्कारासंबंधीने कायदा विशद करून सांगितला व अशा प्रकारच्या गुन्ह्यात होणाऱ्या शिक्षेबाबत महिती दिली.

## सत्र दुसरे

यापुढील सत्रात ॲड. सुरेखा दळवी यांनी हुंडाप्रतिबंधक कायदा समजावून सांगितला. लोक त्यातून कशा पळवाटा काढतात, त्यावर त्यांनी नेमके बोट ठेवले. या कायद्यातील बदल व नव्या तरतुदी पण त्यांनी सांगितल्या. या दिवशी रात्रीच्या चर्चेत अनेक शिबिरार्थी स्त्रियांच्या व्यक्तिगत पातळीवरच्या प्रश्नांनाही तोंड फुटले. यावेळी सुरेखा दळवी यांनी त्यांना कायद्यासंबंधाने मार्गदर्शन तर केलेच, पण आपल्या व्यक्तिगत प्रश्नांच्या चटक्यातूनच आपण संघ-टनेची कडी मजबूत करण्यामागचे मर्म समजून घेतले पाहिजे, ही गोष्टही शिबिरार्थींच्या मनावर बिंबवली. महिला दक्षता समितीच्या उपस्थित कार्यकर्त्या, पुणे लॉ कॉले-जचे प्रा. देशमुख, ॲड. सुरेखा दळवी इ. सर्वांनीच शिबिरार्थींना यापुढेही कायदेशीर सल्ला देण्याचे आश्वासन दिले व स्थानिक पातळीवर कार्यकर्त्यांनी कुठे मदत घ्यावी याबाबतही शक्य तेवढी माहिती दिली.

तिसऱ्या व शेवटच्या दिवसाच्या पहिल्या सत्रात सुरेखा दळवी यांनी प्रास्ताविक केले. आदल्या रात्री झालेल्या व्यक्तिगत व गटवार बोलण्याबाबत त्या म्हणाल्या, 'या शिबिरात जसे आपल्या व्यक्तिगत प्रश्नांना तोंड फुटले ते तिथेच अडून राहू नये. आपल्या संघटना काही स्त्रियांच्याच प्रश्नावर काम करणाऱ्या नाहीत. आपल्या व्यक्तिगत जाणिवे-मुळे आपण संघटनेच्या पातळीवर, वा संघटनेबाहेर जमेल तसे या स्त्रियांचे प्रश्न सोडवत असतो. याच नेमक्या अनु भवांची देवाण-घेवाण सर्वांत व्हावी, व तिचा आपल्या संघटनाबांधणीच्या कामात कसा उपयोग होईल, व स्त्रियांचे प्रश्नही न डावलण्याची जाणीव आपल्याला कशी येईल याचा आपण विचार करावा.' यानंतर छाया सुरतवंती, नान्सी गायकवाड, शोभा मुळे, शांती जॉर्ज, सुमन ऐनकर, सरूबाई कडू, पुष्पा पांढरीपांडे इत्यादींनी कायद्याच्या चौकटीत स्त्रियांचे प्रश्न हाताळताना आपल्याला आलेले अनुभव सांगितले.


## सत्र तिसरे

यानंतरच्या सत्रात श्री. नागेश हाटकर रोजगार हमी व किमान वेतन कायद्याच्या संदर्भात बोलले. स्त्रियांसाठी असलेल्या विशेष सवलती त्यांनी सांगितल्यानंतर वाहरू सोनवणे बोलले. ते म्हणाले, 'आपल्या समाजात सर्व प्रकारचे कष्ट स्त्रीवर लादले जातात व निर्णायक क्षणी मात्र तिला दुय्यम स्थान मिळते. पुरुषी अहंकारी दृष्टिकोणातून व स्त्रीविषयक हीन दृष्टिकोनातून पुरुषाने आपली मुक्तता स्वतःच करायची आहे. आपल्यात पिढ्यान्‌पिढ्या मुरून सहजवृत्ती झालेला हा दुटप्पीपणा कणाकणाने, थेंबाथेंबाने आपल्याला नाहीसा करायला हवा आहे.

यानंतर श्री. काळूराम धोदडे बोलले. ते म्हणाले, 'पुरुष, माणूस म्हणून जेव्हा दबला जातो तेव्हा तो आपली स्थिती बोलून दाखवू शकतो. हे सर्व कळून सवरून उमजून, केवळ बोलण्याची मुभा मात्र समाजाने स्त्रीकडून काढून घेतली आहे. स्त्रीपुरुषांच्या नात्यानेच संघर्षाची अपरिहार्यता जाणवल्यावर स्त्रियांनीच आपला लढा तीव्र केला पाहिजे.'

यानंतर नान्सी गायकवाड यांनी तीन दिवस चाललेल्या या शिबिराचा समारोप केला. कायदेविषयक उपयुक्त पुस्तिका शिबिरार्थींना देण्यात आल्या होत्या. यानंतर आदिवासी सहज शिक्षण परिवारातर्फे माई केदारी यांनी आभार मानले. शिबिरार्थींच्या निवास व आहाराची तोशिस न पडू देता व्यवस्था करण्यास परिवाराच्या डॉ. सुधा रणदिवे, सुमन देशपांडे, पद्‌माताई, माई केदारी व इतरांनी आस्थापूर्वक परिश्रम घेतले.

या शिबिराच्या संयोजनात सुरेखा दळवी यांनी महत्त्वाचा वाटा उचलला होता.



पान ३३ वरून पुढे चालू

केले आहेत. हा इतिहास घडवणाऱ्या नायकांच्या गाथा आहेत. मुगल, पेशवे, ब्रिटिश व स्वातंत्र्योत्तर काळातील घडामोडी व त्यांचा आदिवासी भिल्लांवरचा परिणाम, यासंबंधाने निर्देश आहे. १८५७ च्या स्वातंत्र्यसंग्रामातला भिल्लांचा सहभाग मांडला आहे. लेखकाने प्रस्तावनेत म्हटल्याप्रमाणे ही पुस्तिका म्हणजे केवळ एक सुरुवात आहे.

## आमू आहिं वाघा पिल्

आपल्या इतिहासाचे उत्खनन करणे म्हणजे अखेरीस काय? आपले जीवन कुठून कसे खच्ची होत गेले, व त्याला गती देण्याचे काम कुणी केले या चक्राचा आस पकडणे म्हणजे आपला इतिहास आपण पारखू शकणे. पण आजवरच्या आदिवासींच्या इतिहासलेखनाची पार्श्वभूमी काय आहे? सरकारी गॅझेटातून, फिरस्त्यांकडूनच त्यांचा बराचसा इतिहास नोंदला गेला. प्राप्त परिस्थितीविरुद्ध उठाव केलेल्यांना गुन्हेगार जमाती, दरोडेखोर अशी विशेषणे चिकटवण्यात आली. पण त्याच वेळेस सरकारने त्याचे जंगलावरचे पारंपरिक हक्क कसे हिरावून घेतले व व साहू सावकारांनी त्यांच्या जागिवेवर, जीवनावर कसे निर्घृण अतिक्रमण केले हा भाग गुलदस्तातच राहिला. या पार्श्वभूमीवर आपला इतिहास कुणी लिहिला? ज्या प्रकारचा इतिहास लिहिला गेला त्यामागचे हितसंबंध कोणते होते? आपल्या इतिहासाची साधने कोणती? या इतिहासलेखनाच्या प्रक्रियेवरही या पुस्तिकेतून प्रकाश पडतो.

भील या प्राचीन नामाभिधानाखाली येणाऱ्या अनेक जमाती व टोळ्यांच्या इतिहासाचा सांधा पकडणे ही एक दुर्दम्य गोष्ट आहे. सकृत्‌दर्शनी हा एक सतत पिछेहाटीचा डोंगरदऱ्यात बिळे काढून आंतआत दडणाऱ्यांचा, रहात्या जंगलाची, परिसराची नासधूस करणाऱ्यांचा इतिहास आहे. यापार्श्वभूमी वरआपल्या अस्मितेचा इतिहास सांगणारी व 'आमू आहिं वाघा पिल्' ही ऐतिहासिकतेचे भान करून देणारी या पुस्तिकेमागची प्रेरणा महत्त्वाची.

आमू आहिं वाघा पिल् : लेखक : दिनानाथ मनोहर
प्रकाशक : वाहरू सोनवणे व रूपसिंग शेवाळे
मु. मुते, आकालपूर ता. शहादा, जि. धुळे : किंमत २ रु.

**सुषमा सोनक**

# चला बाई चला एकजूट करा

घोषणा देत, गाणी म्हणत रस्त्याने बाया जात आहेत हे दृश्य शहरासाठी नवलाईचं नाही पण खेड्यात जिथं डोक्यावरचा पदर किंचितही खाली ढळत नाही तेथे जवळ जवळ तीनशे बायांनी ५–६ मैलांचे, काही थोड्या-फार १० मैलांचे अंतर चालून येऊन गावातून मोठ्याने घोषणा देत फिरणं ही शंभर घरांच्या लोकवस्ती असलेल्या आडवळणाच्या गावासाठी कौतुकाची, नवलाईचीच गोष्ट. गडचिरोली जिल्ह्यातील कुरखेडा तालुक्यातील बेळगाव या छोट्याशा गावी या परिसरातील सर्व महिला मंडळांनी स्त्री दिनानिमित्त दि. ९ मार्च १९८६ रोजी महिला मेळावा आयोजित केला होता.

गडचिरोली, भंडारा जिल्हा या पूर्ण झाडीपट्टीत निर-निराळ्या मंडळांचं उदा. नाटक मंडळ, भजन मंडळ इ. चे बरेच पीक आहे. बहुधा याच प्रेरणेतून गावोगावी महिला मंडळेही निर्माण झाली. कुरखेडा परिसरातील नऊ महिला मंडळांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते तसेच या परिसरातील जाग्रत आदिवासी संघटनाही यात सहभागी होती.

३ जाने. १९८५ ला सावित्रीबाई फुले जयंतीच्या दिवशी या माउलीच्या कार्याची आठवण करून त्यापासून प्रेरणा घेऊन महिला मंडळ एकत्रित येण्याला सुरुवात झाली. परिसरातील सर्व महिलांमध्ये एकत्रित येण्याची चेतना यावी व स्त्रियांच्या प्रश्नावर त्यांनी स्वतः बोलतं व्हावं यासाठी हा मेळावा आयोजित केला होता. यात आसपासच्या दहा गावांतील महिला सहभागी होत्या. बायांना समान हक्क मिळालेच पाहिजेत, जंगल बचाव, मानव बचाव यासारख्या घोषणा देत सुरुवातीला गावातून मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर संमेलनाला सुरुवात झाली. गोपुरी ( वर्धा ) येथील श्रीमती सुमनताई बंग या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या.

प्रत्येक महिला मंडळातल्या किमान एका स्त्रीने तरी आपले विचार मांडावेत असे आवाहन सुरवातीला करण्यात आले. सुरवातीला जरा लाजत–बुजत घाबरत, पण हळू हळू धिटाईने काही स्त्रियांनी आपापले प्रश्न मांडले. आंधळी गावच्या द्रुपदाबाई भोंडे यांनी " स्त्रियांच्या रोजच्या जीवनात कामाचा बोजा तिला एकटीला कसा पेलावा लागतो, आमच्या भागात जंगल असूनही आप-ल्याला मोळीला चोर बनावे लागते... " अशा शब्दात आपले विचार मांडले. सौ. गेडाम, गुरबुली यांनी स्त्रियांचे हक्क व त्यासोबतच कर्तव्ये कोणती याचाही विचार व्हावा असे आवाहन केले. आदिवासी भागात आश्रम शाळेत मुलींवर होणाऱ्या अत्याचारांना वाचा फोडली. सौ. नलिनीताई माने, कुरखेडा यांनी कायदेविषयक मोफत सहाय्यता सल्लागार समितीचे स्त्रियांना कसे सहाय्य घेता येईल त्याची माहिती दिली.

शेवटी अध्यक्षीय भाषणात श्रीमती सुमनताई बंग यांनी म्हटले, " स्त्रियांना महिला मंडळ तरी करावंसं वाटणं, मेळाव्याला जावेसे वाटणे यात कुठेतरी काही ना काही कर-ण्याची इच्छा आहे आणि हे महत्त्वाचं जिवंतपणाचं लक्षण आहे. दारूच्या प्रश्नावर त्यांनी महिला मंडळांना काम कर-ण्याचे आवाहन केले. जंगलाचा प्रश्न अतिशय महत्त्वाचा आहे, त्यावरही महिला मंडळांनी काम करण्यास पुढे यावे. स्त्रियांना रोज घरातही खूप मानहानी सहन करावी लागते. मारणे, सोडून देणे यासारख्या गोष्टी तर फारच सामान्य आहेत. त्याविरुद्ध आवाज उठवला पाहिजे, त्यासाठी जातपात, पक्ष यांसारखे भेदाभेद तोडले पाहिजेत असे आवाहन त्यांनी केले.

अशा प्रकारचा मेळावा हा प्रकारच या भागात नवीन होता. त्यात स्त्रियांचा मेळावा ही तर खूपच नावीन्यपूर्ण गोष्ट. केवळ स्त्रियांसाठी, तेही कुठलेही भेदाभेद न ठेवता कार्यक्रम असेल ही शक्यताच फारशी कुणाला वाटत नव्हती. त्यामुळे ही नवी नवलाई होती. घरी परतताना, डोक्यावरून पदर घेतलेल्या, ' माणसाइत कसं बोलाच ' हा बुजरेपणा एरवी असणाऱ्या बाया दारूबंदीसाठी, जंगला-तून आणावयाच्या इंधनाच्या पाससाठी मोर्चा काढण्याची, पोलिसांनी पकडून नेले तर जेलात जाण्याची भाषा बोलत होत्या.

फार काही झाले नाही तरी निव्वळ बाई म्हणून नाही तर बाई माणूस म्हणूनच जगण्याची जिद्द हा मेळावा या ग्रामीण स्त्रियांत निश्चित निर्माण करेल.

### नव्या पर्वाची सुरुवात

अशाच स्वरूपाचा स्त्रियांचा मेळावा गडचिरोली

जिल्ह्यातच आरमोरी तहसीलमधील विसोरा या गावीही आयोजित करण्यात आला होता. या भागात रोजगार हमी योजनेअंतर्गत काम करणाऱ्या मजुरांना संघटित करणाऱ्या बांधकाम व लाकूड कामगार संघटनेतर्फे हा मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्याच्या निमित्ताने स्त्रियांच्या विविध दुःखांना वाचा फुटली आणि संघटनेच्या कामातील एका नव्या पर्वाला सुरुवात झाली आहे.

**चला बाई चला एकजूट करा**
**स्त्री मुक्तीचा देऊ लढा**

'आजवरी खाल्ल्या लाथा आता करू वर माथा' चला बाई चला एकजूट करा— स्त्री-मुक्तीचा देऊ लढा. यासारख्या घोषणांनी विसोरा हे देसाईगंज (वडसा) पासून ६ कि. मी. वरील गाव दुमदुमत गेले. जवळपास दोनहजार लोकवस्तीच्या या गावात काही मोठे शेतकरी, काही मध्यम शेतकरी व बऱ्याच मोठ्या प्रमाणात निव्वळ मजुरही आहेत. हा कार्यक्रम म्हणजे या गावातील व परिसरातील ऐतिहासिक कार्यक्रम ठरेल. कारण कुणीतरी बड्या लोकांनी कार्यक्रम ठरवावा व मजूर, गोरगरीब स्त्रीने यात जावे ही सर्वसाधारण पद्धत पण यावेळी पद्धत मोडून संघटनेच्या मजूर स्त्रियांनी मेळावा आयोजित केला व त्यात या परिसरातील सर्व स्तरातील स्त्रिया सहभागी झाल्या. जनतेतील शक्ती स्थळाच्या बदलाच्या नव्या प्रक्रियेची इथे प्रचीती आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या सुमनताई बंग व प्रमुख पाहुण्या म्हणून प्रा. कुमुदताई पावडे व प्रा. नलिनी सोमकुंवर. सुरवातीला काही सामूहिक गाणी झाली. नंतर गावोगावांहून आलेल्या कित्येक स्त्रियांनी आपली दुःखं जाहीर रीतीने मांडली सुरुवातीला भीत-भीत काहीजणी समोर आल्या. त्यानंतर ह्या स्त्रिया उत्स्फूर्तपणे स्वतःहून समोर येऊ लागल्या. एक-दोन बाया तर अध्यक्षाच्या भाषणानंतरही बोलल्या. देसाईगंज येथील कमल तंबके या बाईने तिच्या नवऱ्याने केलेला छळ व शेवटी जिवावर बेतलेला प्रसंग म्हणजे रॉकेल ओतून जाळून टाकले तरीही या बाईने नवऱ्याला पोलिसी त्रासातून स्वतःच्या बयाणाने वाचवले. अशक्य झालं तेव्हा मात्र स्वतंत्रपणे वेगळी राहते. ही करुण कहाणी मांडली.

आपली दुःखे उघडपणे कशी बोलायची, बाईने सहनच करावे लागते हा विचार रूजलेल्या बायांना बोलतं करणं थोडं कठीण गेलं तरी नंतर हुंडा, दारू, घरकामाचा व बाहेरचा बोजा, जंगलाचा प्रश्न, इंधनाचा प्रश्न, शिकावं शिकता यावं ह्याविषयाची कळकळ ह्या गोष्टी समोर आल्या. बोलायला बाया पुढे येईनात त्यावेळी संघटनेच्या एक प्रमुख व ज्येष्ठ कार्यकर्त्या गोदुबाई दुधकुंवर यांनी मेळाव्याची भूमिका आपल्या बोलीभाषेत फार समर्थपणे मांडली व रोजगार हमीच्या कामासाठी लढलो त्याप्रमाणे आपल्या आयुष्याचे सुखदुःख मांडायला बायांनी पुढे यावं असं आवाहन केलं. रोजगार हमी कर, भूमापन कर या संबंधी सरकारने चालविलेल्या जुलमाविरुद्धही अनेक स्त्रियांनी आवाज उठविला.

**स्त्री-मुक्तीची ही ललकारी**

याप्रसंगी अनेक स्त्री कार्यकर्त्यांनी आपले विचार मांडून ग्रामीण स्त्रियांच्या मनातील स्वतःचे प्रश्न समोर आणले.


प्रा. नलिनीताई सोमकुंवर यांनी प्रामुख्याने अंधश्रद्धेवर हल्ला चढवला. आपल्या वेगवेगळ्या अंधश्रद्धेमुळे स्त्रियांना बऱ्याचशा अन्यायाला, अत्याचारांना तोंड द्यावे लागते. त्यामुळे आपण शिक्षणाची कास धरून अंधश्रद्धेला तिलांजली देण्याचे आवाहन केले.

समान वेतनाची मागणी करण्याची इच्छा प्रा. कुमुदताई पावडे ह्यांनी आपल्या भाषणातून ग्रामीण स्त्रियांच्या मनात निर्माण केली.

श्री. मोहन हिराबाई हिरालाल यांनी रोजगार हमी लढ्यात स्त्रियांनी दिलेल्या सहभागाचा गौरवपूर्ण उल्लेख करून त्यांनी संघटनेची स्त्रियांच्या प्रश्नाविषयीची भूमिका स्पष्ट केली. तसेच संघटनेतील सदस्यांविरुद्ध अशी काही तक्रार असल्यास कारवाई करण्याचे आश्वासनही दिले.

कार्यक्रमात सहभागी झालेल्या प्रत्येक गावातील एक स्त्री प्रतिनिधी घेऊन एक समिती तयार करण्यात आली व त्या समितीने स्त्रियांच्या प्रश्नाविषयी कार्यक्रम घ्यावेत असा ठराव संमत करण्यात आला. काहीतरी करण्याच्या इच्छेला ह्या मेळाव्याने एक दिशा दिली आहे.

**शुभदा देशमुख**
मु. पो कुरखेडा, जि. गडचिरोली



# नको गुलामीचे जिणे

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त दि. ८ मार्च रोजी धुळे जिल्ह्यातील शिरपूर येथे महिला मेळावा घेण्यात आला. या मेळाव्याला श्रीमती गेल ऑमवेट, श्रीमती विजया चौक, ज्योत्स्ना खैरनार, रंजना कान्हेरे, इत्यादी उपस्थित होत्या. मेळाव्यात स्त्रियांच्या प्रश्नांवर ठराव मांडण्यात आले.

आदिवासी स्त्रियांना गांव पंचात बसण्याचा अधिकार असला पाहिजे. बाई बिनडोक असते. च्यांव च्यांव करते हे चूक आहे. आई ही एक शिक्षिका असून तिला बिनडोक कसे म्हणता ?

शेतावर नवराबायकोने बरोबर काम केल्यावर घरकाम-सुद्धा बरोबर वाटून घ्यायला पाहिजे. पण तसे होत नाही. भाजीपाला, लाकडे, घर साफ करणे, पाणी ही कामं बाई ती एक स्त्री असल्यामुळे करावे लागते. दोन पुरुष एकत्र राहतात. संगतीने कामाला गेले तर घर कामसुद्धा वाटून घेतात. कारण इथं ते दोन्ही समान असतात. पण नवरा-बायकोच्या संबंधात बाई ही पुरुषाची गुलाम असते. सालदाराप्रमाणे !

हे काम स्त्रीचे, ते काम पुरुषाचे, हे सर्व लादलेले आहे. मुलांना जन्म देण्यापलिकडे स्त्रीचे दुसरे काम असू शकत नाही काय ? पुरुषाला झाडू मारता येत नाही ? येतो. पण ते काम स्त्रीचे आहे. गुलामाचे आहे आणि आम्ही मालक गुलामांचे काम कसे करणार ? अशी प्रवृत्ती या विचारा-मागे असते.

आजच्या समाजव्यवस्थेत बाईकडे बघण्याचा दृष्टि-कोणच चुकीचा आहे. आदिवासींत सुद्धा. समजा एखादी बाई नवरा, सासू-सासरे त्रासाला कंटाळून माहेरी पळून जात असेल तर त्या बाईवर काय बेतले आहे, त्याचे दुःख काय हे जाणून घेण्यापेक्षा ती एकटी आहे. तिला एकटी गाठून तिला वापरून घ्यावे, हीच नीच वृत्ती पुरुषी मनात अजून जिवंत आहे. ती पुसून टाकण्यासाठी लढे केले पाहिजेत. जागृती केली पाहिजे.

पुरुष म्हणतात, बाई चुकते म्हणून आम्ही बायकोल ठेवतो. असे म्हणणाऱ्यांना आमचा सवाल आहे की, काय आयुष्यात पुरुष कधी चुकतच नाही ? चुकले तर बाई किती वेळा नवऱ्याला चुकीबाबत मारते ? नाही. कसे मारणार ? स्त्री गुलाम ! गुलाम मालकाला मारतो का ? सालदार मालदाराला त्याच्या चूकाबाबत मारतो का ? सहन करतो ! तशीच स्त्री एक गुलाम आहे अशीच समा-जाची समजूत आहे.

**छाया सुरतवंती**

टेकभिलाटी, शहादे, धुळे

पान २८ वरून

चांगल्या सवयी लागाव्यात. त्यांना उपयुक्त मार्गदर्शन व्हावे, सामाजिक बांधिलकीची भावना, एकीची भावना त्यांच्यात अंतर्भूत व्हावी यासाठी त्यांना आवश्यक ते शिक्षण दिले गेले पाहिजे. त्यासाठी सध्याच्या प्रचलित शिक्षणपद्धतीत आमूलाग्र बदल केले पाहिजेत. आताच्या शिक्षणाने आदिवासींमध्ये किंवा एकुणच समाजात विशेष परिवर्तन होणे शक्य नाही. कारण बेकारी वाढतेच आहे. यामुळे सर्वसामान्य लोकांच्या जीवनात सुधारणा घडवून आणणारे व त्याला स्वतःच्या पायावर उभे राहण्यास मदत करणारे शिक्षण त्याला द्यावयास हवे.

अनौपचारिक शिक्षणाद्वारे हे शक्य होईल.

त्यामुळे सामाजिक वनीकरण व अनौपचारिक शिक्षण याद्वारे आदिवासींची सामाजिक चळवळ वृद्धिंगत होऊन त्याद्वारे स्वतःच्या पायावर तो उभा राहील व संपूर्ण समाजपरिवर्तन होऊन खऱ्या अर्थाने देशाचा विकास होईल असा निरीड संस्थेला आत्मविश्वास वाटतो. अर्थात यासाठी बराचसा काळ जावा लागेल.




# नयना प्रेरणा ठरो !

नयना कुळकर्णींच्या निधनाने सर्वांनाच धक्का बसला. सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्यांना तिचं निघून जाणं अधिकच जाणवेल. नयनानं आपलं माध्यमिक शिक्षण पुरं केलं. पुढेही शिक्षण घेऊ शकत होती, परंतु या शिक्षणाला झिडकारून तिनं जीवन शिक्षणात उडी घेतली. आदिवासी दलित शोषितांचं जीवन तिनं पाहिलं आणि आपल्या समृद्ध अशा जीवनाला काही अर्थ नसल्याचं तिला जाणवलं अन् या शोषितांच्या कामात तिनं स्वतःला झोकून दिलं. स्वातंत्र्योत्तर काळात काही ध्येये उराशी बाळगून स्वतःला त्याकरिता झोकून देणारा तरुण विरळे! नयना अशांपैकी एक ध्येयवेडी. समताधिष्ठीत न्याय्य समाजरचनेच्या लढाईत तिनं स्वतःला झोकून दिलं. मनोर भागातील भूमिसेनेच्या चळवळीत ती ओढली गेली. त्यानंतर पुणे, कामशेत-जवळ काही वर्षे व आता मध्यप्रदेशात 'रसुलिया' येथे ती एका गटाबरोबर काम करीत असे. खते-औषधे-कीटकनाशके इ. चा वापर करून आधुनिक तंत्रज्ञानाच्या नावाखाली भारतात शेतीविकास आपण साध्य करू पाहतो. मात्र त्यातून नगदी पिकांपेक्षा आज हाती काही लागणार नाही. यापेक्षा येणारा भविष्यकाळ अनेक संकटे घेऊन उभा असेल. त्यादृष्टीनं नैसर्गिक शेतीद्वारा असा विकास साधला गेला तर येथे खरा विकास होऊ शकेल या विचारसूत्राचा धागा घेऊन जपानमधील यशस्वी अशा प्रयोगाधारे प्रयोग करून हे पटवून देण्याचं काम हा या गटाच्या कामाचा भाग. या कामात नयना गेली काही वर्षे गुंतली होती. त्याआधी शेतमजुरांच्या किमान वेतनाचे लढे, रोजगार हमीसाठीचे लढे, तसेच स्त्रियांचे अनेक प्रश्न घेऊन तिनं आदिवासी दलित स्त्रियांमध्ये काम केले. मनोर आणि आसपासच्या जंगलात ती मैलोन् मैल पायपीट करीत असे.

आपण करीत असलेलं काम हे लांब पल्ल्याचं आहे पण ते अत्यंत मूलभूत स्वरूपाचं आहे याची जाण तिला होती. इथला दबलेला, पीडित, शोषित दलित आदिवासी आपली लढाई स्वतः लढेल व ती अन्याय्य समाजरचना मोडून काढील व याकरिता त्याला संघटित केलं पाहिजे, आपल्या शक्तीची जाण करून दिली पाहिजे असं मानणाऱ्यांपैकी ती एक. त्याकरिता तिनं आपलं आयुष्य खर्ची केलं. आपल्या जीवनाला काही अर्थ प्राप्त करून दिला. जगतात सारेच, पण ध्येयवेडे होऊन जगणं वेगळंच. या अर्थानं नयना प्रेरणा ठरो!





# हाकारा लेखन सूची १९८५

## हाकारा वर्ष सहावे । अंक पहिला । जानेवारी–मार्च १९८५ । आदिवासी संघटना


| | |
|---|---|
| महाराष्ट्रातील प्रतिरोधात्मक चळवळी | शरद कुलकर्णी |
| किसानसभा : आर्थिक मागण्यांचा गाभा | |
| कष्टकरी संघटना : सतत संघर्षाची भूमिका | |
| जागृत आदिवासी संघटना | सतीश गोगुलवार |
| जागृत भाऊबंदी संघटना : संस्थेकडून संघटनेकडे | प्रदीप गायकवाड |
| श्रमिक क्रांती संघटना | |
| इंदरवेलीचे जागरूक आदिवासी | शैलजा देवगावकर |
| आदिवासी संघटना चर्चासत्र : अहवाल | रमाकांत पाटील |
| आदिवासी परंपरा जपाव्या | गीता साने |
| कविता | भुजंग मेश्राम |
| पुस्तक परिचय / आदिवासीज ऑव्ह ठाने, बंद दरवाजा | सुधीर जोग |
| संस्था परिचय / जाणीव संघटना | |
| वृत्तविशेष / भटक्या विमुक्त संघटनेचे ठराव | |


## हाकारा । वर्ष सहावे । अंक दुसरा । एप्रिल–जून । जमीन हस्तांतर


| | |
|---|---|
| कविता / फसल | सर्वेश्वरदयाल सक्सेना |
| आदिवासी जमीन हस्तांतर : कायदा व न्याय | शरद कुलकर्णी |
| Maharashtra Act No XIV of 1975– Bare Act | |
| पोलिस म्यॅनुअलमधील बदल | |
| अनुसूचित जातीजमातींना कायदेविषयक मोफत सहाय्य | |
| हस्तांतरित जमिनींबाबत मुख्यमंत्र्यांना निवेदन | |
| कथा / मुखिया मुडलेंगाचा गाव / डोरिस लेसिंग | अनुवाद/ विद्या बापट |
| मुलाखत / बारक्याची जमीन गेली पाटलाच्या घशात | अनुवाद/सुषमा सोनक |
| वहिवाट व रेकॉर्ड ऑव्ह राइटसूचे कायदे | अशोककुमार कुलकर्णी |
| पुस्तक परीक्षण / हक्कनोंद | मधुकर आठवले |
| जमीनमालकी व हस्तांतरण मार्गदर्शिका | सुषमा सोनक |
| संस्था परिचय / वेरळा डेव्हलपमेंट सोसायटी | सुधीर जोग |
| वृत्तविशेष / कायदेविषयक सहाय्य व सल्लाशिबिर | विजय साठे |
| पुस्तकसूची / जमीनहस्तांतर | |


## हाकारा । वर्ष सहावे । अंक तिसरा । जुलै–सप्टेंबर । आदिवासी महिला


| | |
|---|---|
| आदिवासी स्त्रियांच्या समस्या व संघर्ष | मीरा सावरा |
| विश्वास बसेल तुमचा यावर | कुसुम नारगोळकर |
| महिला कार्यकर्त्यांचे चर्चासत्र : अहवाल | सुषमा सोनक |
| मी, कुसुम सोनवणे | शब्दांकन / रमाकांत पाटील |

Registered with the Registrar of News Papers of India Under Ne. 35835/80

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन.

कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण.

शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकाच व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडवून आणणे.

मानव विज्ञान व सामाजिकशास्त्रे यांच्या शिक्षकांना व विचारवंतांना मुख्यतः आदिवासींबाबत अभ्यासकांना, एकत्र आणणे.

मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन, प्रकाशन.

या उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशाचे मूर्त स्वरूप म्हणून 'हाकारा' सुरू करण्यात आला आहे. परिषदेचे सदस्यत्व स्वीकारून आपणही या कार्यात सहभागी व्हावे.

## मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व

| | |
|---|---|
| आजीव सभासद | २०० रुपये |
| परिषद वार्षिक सभासद | २० रुपये |
| आदिवासी कार्यकर्ते सभासद | १५ रुपये |

परिषदेच्या सभासदांना 'हाकारा' विनामूल्य पाठविला जातो.

आपले सदस्यत्व आणि वार्षिक वर्गणी कृपया खालील पत्त्यावर 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' (द महाराष्ट्र असोसिएशन ऑफ अँथ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस) यांचे नावे पाठवावी. चेक पाठविल्यास अधिक दोन रुपयांची वटणावळ पाठवावी. मनिऑर्डर पाठविल्यास फॉर्ममागे कृपया आपले पूर्ण नाव व पूर्ण पत्ता लिहावा.

**पत्रव्यवहाराचा पत्ता**
**रा. के. मुटाटकर**, सचिव
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद,
६४/२, आनंद पार्क, औंध, पुणे ४११ ००७

**आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा आहे.**